मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

गवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

कै० ह. ना. नेने स्मृति-अंक

:

पांडे

जानेवारी १९५५
किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी वर्ष ९ जानेवारी १९५१ अंक १० वा

माझे भाचे कै० हरिभाऊ नेने

श्रीपाद महादेव माटे

कै. हरिभाऊ नेने हे माझे भाचे होत. ते माझ्याहून सुमारें सहा वर्षांनी लहान होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून मला अतिशय दुःख झालें. हरिभाऊ हे अगदी निगर्वी, मनमिळाऊ आणि अश्राप असे होते. त्यांनी कोणाला दुखविलें असेल, असें मला वाटत नाही. लहानपणापासूनची त्यांची ही वृत्ति शेवटपर्यंत टिकून राहिली होती, असें नागपूरचे माहितगार लोक सांगतात. मला वाटतें ते १९१७ सालीं नागपुरांत आले असावे. तेव्हापासूनच्या काळांत त्यांची आणि माझी गाठ एखाद्या वेळीं पडे. आणि तेंहि ते पुण्यास आले म्हणजे ! तीन वर्षांपूर्वी मी नागपुरास आलों होतों; तेव्हाच काय ती पुण्याच्या बाहेरची माझी आणि त्यांची गाठ ! त्यामुळे प्रौढवयांतील त्यांच्या बुद्धीचा आणि मनाचा झालेला आविष्कार मला तपशिलानें माहित झाला नाही. त्यांचा विद्याव्यासंग मात्र ग्रंथरूपानेच पुढे येत असल्यामुळे तो माझ्या परिचयाचा होत आलेला होता. त्यांचा तो व्यासंग पाहून मला स्वाभाविकपणेच अतिशय आनंद होई. आणि आमच्या दुर्गा आक्काचा मुलगा ऐवढा व्यासंगी पंडित निघाला म्हणून मला अभिमान वाटे. गाठ पडली म्हणजे महानुभाव वाङ्मयासंबंधाने ते माझ्याशीं पुष्कळ बोलत बसत. आणि मराठी वाङ्मयाच्या आरंभस्थानीं झालेली विचारांची आणि भावनांची चलविचल त्यांच्या तोंडून ऐकत बसणें फार मनोरंजक वाटें. असा हा अगदी सीधा, सरळ मनाचा आणि व्यासंगी आप्त नाहीसा झालेला पाहून मला पुनःपुन्हा वाईट वाटतें.

नागपुरास आल्यापासून त्यांच्या मित्रांनी त्यांचे केलेलें वर्णन ऐकून आणि तरुणभारतांत त्यांच्या संबंधीचें आलेलें लिखाण वाचून मला खरोखरच गहिवर येऊं लागला. अशा या अश्राप माणसाला ऐवढें लवकर ओढून नेण्याचें मृत्यूला काय कारण घडलें हें सांगवत नाही. येथल्या एका मित्रानें सांगितलें की, एकच दिवस आधी बोलत असतांना हरिभाऊ म्हणाले, "माझ्या मनाला पूर्ण समाधान आहे, मी संतुष्ट आहें." हरिभाऊंचा स्वभाव, या त्यांच्या उद्गारांत चांगला प्रतिबिंबित झाला आहे.

हरिभाऊंचें घराणें अगदी बाळबोध. गरिबींतून वाढत आलेल्या आणि प्रयत्नांच्या बळावर सुखी होऊं लागलेल्या माणसाला दैवानें थोडें जास्त दिवस जिवंत ठेवावें असें वाटतें. पण हें आपलें मत दैवाला पसंत नसतें. हरिभाऊंचे वडील अगदी गरिबींत वाढले आणि सुखाचा पेला जो तोंडाला लावतात तोंच मरून गेले. सातान्यास आम्हा माटे मंडळींचें एक आवाड आहे. मी सांगतों ती हकीकत फार वर्षांची आहे. या आवाडांत आमचे नातेवाईकांचीं १०–१२ घरें होतीं. हरिभाऊंचे वडील ह्या आमच्या आवाडांत आणि नगरच्या

घरांत मिळून वाढले. याचा अर्थ काय हें कल्पनेनें ओळखावें. शब्दाने सांगण्याची मला भीड वाटते. ते फार चलाख, सद्गुणी आणि सचोटीने वागणारे होते. या सर्व मंडळींच्या उपयोगी पडत पडत त्यांनी विद्याभ्यास केला आणि तेव्हाची सरकारी नोकरीची एक लहानशी परीक्षा होती ती त्यांनी दिली. पास होतांच सगळ्या आवाडांत त्यांचें मोठें कौतुक झालें आणि आमच्या चुलत्याने आपली दुर्गा नांवाची मुलगी या हुशार मुलास देऊन टाकली. मुलगा शिकलेला आहे, चांगला फटाकडा आहे ऐवढेंच त्यांनी पाहिलें. लोकांच्या अपेक्षेप्रमाणे श्री. नेने हे नोकरींत भराभर वाढले आणि लवकरच महालकरी झाले. लहानशा तालुक्याच्या मामलेदाराला महालकरी म्हणत असत. दुर्गाबाई फार नशीबाच्या निघाल्या असें सर्वांना वाटू लागलें. आणि तें खरेंच होतें. तथापि दुर्दैव हें कोठून तरी या महालकऱ्याकडे कपटीपणाने पाहत होतें. महालकरी भागांत फिरत असतांना कोणत्याशा एका गावीं गेले. तेथें पटकीचा उपद्रव चालू होता. तेथें नारायणराव यांना वाखा झाला आणि एक–दीड दिवसांतच ते नाहीसे झाले.

नारायणरावांनी सातारा जिल्ह्यांत पाटण येथें घर बांधलें होतें व मला वाटतें थोडासा कांही जमीन–जुमला केलेला असावा. पाटणची विद्या संपल्यानंतर दुर्गाक्का मुलांना घेऊन पुण्यास रहावयास गाल्या. सारे मिळून आम्ही तिला अकरा चुलतभाऊ होतों. परंतु आमचीहि अशीच दाणादाण उडाली होती. मुलें पोटाशीं घेऊन दुर्गाक्कानें पुण्यास मोठें नेंकीनें दिवस काढले. कोणाची याचना केली नाही. नवऱ्यानें जें कांही थोडेंबहुत ठेवलें होतें त्याच्यावरच तिनें कसें ना कसें भागविलें. आणि हरिभाऊंना लहानाचें मोठें केलें.

हरिभाऊंच्या दोन बहिणींपैकी श्रीमती वेणूताई ह्या नागपुरांतील सूतिकागृहांत फार वर्षें फार उपयुक्त कामगिरी करीत राहिलेल्या आहेत. हरिभाऊंच्या दुसऱ्या धाकट्या भगिनी गोंदिया येथे दिवेकरांकडे दिलेल्या आहेत. एम. ए. झाल्यानंतर हरिभाऊंनी पुणें सोडलें आणि ते नागपुरास आले. त्यांच्या परिस्थितींत अर्थातच चांगला फरक पडला. पण दुर्दैव असें की, ज्या प्रेमळ आणि कष्टाळू आईने या मुलांचें संगोपन एवढ्या धैर्यानें केलें तिला हरिभाऊंचा सुखाचा प्रपंच पाहण्याचें भाग्य लाभलें नाही. ती साधारणतः गरीबींतच निघून गेली. हरिभाऊंना या साऱ्या गोष्टींचें स्मरण खचितच होतें. आणि त्यांच्या मनावर या प्रापंचिक आपत्तींचा परिणाम फार झालेला होता. त्यांचा स्वभाव इतका मृदु आणि सरळ व..याचें हेंहि कारण असेल. हरिभाऊंचीं मुलें सुखांत नांदत आहेत. तसेंच त्यांनी दीर्घकालपर्यंत नांदत रहावें अशी माझी इच्छा आहे. श्रीमती वेणूताई आणि सौ. द्रौपदी दिवेकर यांचें दुःख मात्र शेवटपर्यंत कमी होईल असें मात्र मला वाटत नाही. इकडे कोणाला माहीत नसेल म्हणून ही घरगुती हकीकत मुद्दामच दिली आहे. माझा विद्वान भाचा दिवंगत झाला हें पाहून मला फार दुःख होतें.

श्री. काकासाहेब गाडगीळ यांची श्रद्धांजलि

वि. वि. श्री. हरिभाऊ नेने यांचेबद्दल आजच्या वर्तमानपत्रांत वाचलें. कुटुंबियांना माझा दुखवटा कळविणें. वि. सा. संघाचें नुकसान तर फारच झालें.

नवी दिल्ली, ता. २४–११–५४ न. वि. गाडगीळ

खुलासा

गेल्या अंकांतील श्रीपाद डोंगरे यांचा लेख 'अमृत' मासिकाच्या डिसेंबर १९५३ च्या अंकांतून उद्धृत केला आहे. संपादक 'अमृत' यांचे आम्ही आभारी आहों. —संपादक

अनुक्रमणिका

कै. हरिभाऊ नेने

वा. वि. मिराशी

ता. २२ नोव्हेंबर १९५४ रोजीं वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचें देहावसान झालें. श्री. हरिभाऊ नेने यांच्या आकस्मिक व अकाली निधनानें नागपुरांतीलच नव्हे, तर मध्यप्रदेशांतील सर्व मराठीभाषी सुशिक्षित जनतेला दुःखाचा आघात जाणवला. नागपुरांत त्यांचा अनेक सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व संशोधनपर संस्थांशीं जिव्हाळ्याचा संबंध होता. त्यामुळे येथील जनतेला त्यांच्या आकस्मिक निधनानें पराकाष्ठेचें दुःख व्हावें यांत नवल नाही; पण नागपुराबाहेरहि जबलपूर, अमरावती, खामगांव, भंडारा इत्यादि ठिकाणांच्या सुशिक्षित लोकांशीं त्यांचा विविध नात्यांनी संबंध आला होता. त्यांच्या शैक्षणिक व संशोधनपर ग्रंथांनी तर ते मध्यप्रदेशांतच नव्हे, तर अखिल महाराष्ट्रांतही सुपरिचित होते. त्यामुळे त्यांच्या मृत्यूचें दुःख सर्वांनाच जाणवलें. प्रस्तुत श्रद्धांजलींत त्यांच्या चरित्राचा व विविध कार्यांचा थोडक्यांत परिचय करून द्यावयाचा आहे.

कष्टमय विद्यार्थिदशा

हरिभाऊंचा जन्म मुंबई राज्याच्या सातारा जिल्ह्यांतील पाटण या गावीं ८ डिसेंबर १८९२ या दिवशीं झाला. त्यांचे वडील तहसीलदार होते. ते हरिभाऊ दहा वर्षांचे असतांच निधन पावले. त्यामुळे कुटुंबाचा सर्व भार त्यांच्या मातुश्रीवर पडला. हरिभाऊ व त्यांच्या दोन लहान बहिणी अशा तीन मुलांना घेऊन त्यांच्या शिक्षणाकरिता त्या पुण्यास येऊन राहिल्या. मिळवता मनुष्य दिवंगत झाल्यावर एवढ्या कुटुंबाचा भार सहन करणें व मुलांच्या शिक्षणाची योग्य ती तजवीज करणें त्या माउलीला किती कठीण झालें असेल, याची आपणास कल्पनाहि करवत नाही. अशा परिस्थितींत धीर न सोडतां मिळेल तें काम करून त्यांनी मुलांचें पालनपोषण केलें. मुलांच्या शिक्षणांत हरिभाऊंच्या वडिलांचे स्नेही श्री. रामचंद्र वामन पेठे, डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, यांचे त्यांना साहाय्य झालें. त्यांनी हरिभाऊंकडून घरींच एका [illegible]ंत तीन इयत्तांचा अभ्यास करवून घेऊन नंतर ते [illegible] वर्षी त्यांना पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये चौथ्या इयत्तेंत घातलें. हरिभाऊ बुद्धिमान असल्यानें त्यांना शाळेंत प्रथमपासून नादारी (फ्रीशिप) मिळूं लागली. कुटुंबाच्या पोषणाकरिता व आपल्या शिक्षणाकरिता आपल्या मातुश्रीला किती कष्ट पडतात तें पाहिल्यावर हरिभाऊंनीहि चौथ्या इयत्तेपासून शिकवण्या व इतर कामें करून आपल्या मातुश्रीला शक्य ती मदत करण्यास आरंभ केला. हरिभाऊंच्या उत्तरकालीन आयुष्यांतील निरलसतेचें व अविश्रांत परिश्रमांचें बीज ह्या त्यांच्या बालपणाच्या परिस्थितींत सापडतें, यांत संशय नाही.

कॉलेजांतील सहाध्यायी

हरिभाऊंना मॅट्रिकच्या परीक्षेंत चांगलें यश मिळाल्यामुळे फर्ग्युसन कॉलेजांत त्यांना शिष्यवृत्ति मिळूं लागली व त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय झाली. इंटरमध्ये असतां हरिभाऊंवर दुःखाचा दुसरा घाला आला. ज्या मातुश्रीने त्यांना हालअपेष्टा सोसून वाढविलें होतें, ती निधन पावली व हरिभाऊ असहाय झाले. या परिस्थितींत पुण्याचे डॉ. गणपतराव

सहस्रबुद्धे यांनी त्यांना बहुमोल साहाय्य केलें. त्यायोगें त्यांना आपला शिक्षणक्रम पुरा करतां आला. शाळेंतील व कॉलेजांतील त्यांच्या साहाध्यायांमध्ये प्रा. ना. सी. फडके, प्रा. विश्वासराव भट, श्री. म. दा. साठे, श्री. म. गो. इनामदार, श्री. रसाळ हे होते. यांपैकी शेवटले तिघे नोकरीच्या निमित्ताने या प्रांतांत आले. हरिभाऊंचा व त्यांचा स्नेह उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला. सुप्रसिद्ध साहित्यिक प्रो. बापूसाहेब माटे हे हरिभाऊंचे मामा होत.

हरिभाऊ बी. ए. च्या वर्गांत गेले त्या वर्षी मुंबई विद्यापीठांतील शिक्षणक्रमांत बदल होऊन ऑनर्स कोर्स सुरू झाला. १९१४ सालीं बी. ए. ऑनर्सची पहिली परीक्षा झाली, तिच्यांत हरिभाऊ उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाले. पुढे पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत शिक्षकाची नोकरी धरून ते एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. या कालांत त्यांचा व माझा प्रथम परिचय झाला. आमचे एक समान स्नेही, आता दिवंगत झालेले, मिरजेचे श्री. पारखी यांच्याबरोबर हरिभाऊ एम. ए. परीक्षेच्या पाठ्यपुस्तकांविषयी कांही माहिती विचारण्यासाठी मजकडे डेक्कन कॉलेजांत आले होते. प्रथम भेटींतच त्यांचा ऋजु स्वभाव व अभ्यासु वृत्ति यांनी माझें मन आकृष्ट झालें. पुढे दैववशात् आम्ही दोघेही या प्रांतांत नोकरीच्या निमित्ताने आल्यावर परस्परांचा जास्त संबंध येऊन ओळखीचें मैत्रींत रूपांतर झालें. असो.

स्वाभिमानी वृत्तीमुळे मध्यप्रदेशांत आगमन

पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरीं शिक्षकाची नोकरी असतां ती सोडून त्याच प्रकारच्या नोकरीसाठी विशेष लाभ नसतांहि हरिभाऊ इतक्या दूर कां आले, हें कोडें मला बरेच दिवस पडलें होतें. गेल्या महिन्यांत सहज गोष्टी निघाल्या असतां त्यासंबंधी विचारतां हरिभाऊ म्हणाले, "मी एम. ए. पास झाल्यावर नूतन मराठीमध्ये माझी झालेली नोकरी लक्षांत घेऊन मला कायम केलें जाईल व पगारांतहि योग्य ती बढती मिळेल अशी मला अपेक्षा होती. पण तें बाजूलाच राहून माझ्यानंतर नोकरीला लागलेल्या एका शिक्षकाला कायम करण्यांत आलें; व त्याचा पगारहि वाढविण्यांत आला. या अन्यायाची चीड येऊन मी पुणें सोडण्याचें ठरविलें; व या प्रांताच्या शिक्षणखात्याकडे अर्ज केला. या प्रसंगाने मी इकडे आलों." या घटनेवरून हरिभाऊंच्या स्वाभिमानी वृत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो.

'अगत्वा खलनम्रताम्'

या प्रांताच्या शिक्षणखात्यांतील हरिभाऊंची बहुतेक नोकरी नागपुरासच पटवर्धन हायस्कूलमध्ये झाली. ते इंग्लिश व संस्कृत विषयांत एम्. ए. झाले होते, पुढे मराठीचा अभ्यास वाढल्यावर त्यांनी मराठी विषयांतही एम्. ए. पदवी घेण्याचें ठरविलें; व मुंबई विश्वविद्यालयाची ती परीक्षाहि ते उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले. त्यापूर्वी स्पेन्स् ट्रेनिंग कॉलेजांतून अलाहाबाद विद्यापीठाची शिक्षणशास्त्रविषयक एल्. टी. परीक्षाहि ते पास झाले होते. पटवर्धन हायस्कुलांतील अध्यापनकार्यामुळे उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक झाला होता. कै. नीळकंठराव भवाळकर यांच्याशीं स्नेह झाल्यावर महानुभाव वाङ्मयाचें परिशीलन सुरू होऊन कांही ग्रंथ व लेख त्यांच्या साहाय्याने व कांही स्वतःच प्रसिद्ध करून त्यांनी संशोधक म्हणूनहि कीर्ति मिळविली होती. इतके गुण संपादन केल्यावर संधि आली असतां आपणास कॉलेजांतील प्राध्यापकाची जागा मिळावी, अशी त्यांची अपेक्षा असणें साहजिक आहे. अशा दोन तीन प्रसंगीं त्यांनी अर्जही केले होते पण त्यांत त्यांस यश आलें नाही. शाळेंत शिक्षकाची नोकरी एकदा पत्करल्यावर अंगीं कितीहि गुण असले तरी वरिष्ठ पद मिळविणें कठीण जातें, याचा अनुभव त्यांना आला. दैव हेंहि त्यांच्या अपयशाचें दुसरें कारण असावें. कारण एकदा निवडणूक कमिटीने मराठी प्राध्यापकाच्या जागेसाठी त्यांची शिफारस केली असतांहि तत्कालीन अधिकाऱ्यांस ती पसंत न पडल्यामुळे कांही तांत्रिक दोष काढून त्या कमिटीचेंच विसर्जन करण्यांत आलें, असें म्हणतात. तथापि या प्रसंगाने निराश न होतां त्यांनी आपलें सामाजिक व संशोधनकार्य चालू ठेवलें. हरिभाऊ गुणी असले, तरी मितभाषी होते. अधिकारीवर्गाची खुशामत करून आपली बढती करून घेण्याची त्यांची

प्रवृत्ति नव्हती. म्हणून शाळाखात्यांतील वरिष्ठ जागाहि त्यांच्या नोकरीच्या अखेरी अखेरीपर्यंत त्यांस मिळाली नाही. पण त्याचा विषाद त्यांनी कधीहि मानला नाही. "अकृत्वा परसन्तापमगत्वा खलनम्रताम्। अनुल्लंघ्य सतां मार्गे यदल्पमपि तद्बहु ॥" या सुभाषितांत वर्णिल्याप्रमाणे दुसऱ्यास त्रास न देतां, कोणाची हांजी हांजी न करतां व सज्जनांचा मार्ग न सोडतां जें कांही मिळेल त्यांत ते संतुष्ट असत.

अखेर मिळालेली बढती

शेवटीं १९४६ मध्ये नोकरीचें एक दीड वर्ष उरलेलें असतांना, प्रथम जबलपूरच्या ट्रेनिंग कॉलेज-मध्ये प्राध्यापक म्हणून व नंतर सहा महिन्यांनी अमरावती येथे नवीनच काढण्यांत आलेल्या पुरुषांच्या डिप्लोमा इन्स्टिटयूटच पहिले प्राचार्य म्हणून त्यांची नेमणूक झाली. एखादी नवी शिक्षण संस्था चालविणाऱ्या प्रमुखाला प्रथम प्रथम अतिशय काम पडतें विविध प्रकारच्या कार्याचा प्रारंभ करावा लागतो. हरिभाऊंनी पटवर्धन हायस्कूलमध्ये एक दोन प्रसंगीं स्थानापन्न मुख्याध्यापकाचें काम केलेलें असल्यामुळे त्यांना त्या कामाची पूर्ण माहिती होती. त्यांनी अल्पावधींतच आपल्या नवीन संस्थेची घडी नीट बसवून आपल्या सहाध्यापकांचा तसेंच शिक्षक विद्यार्थ्यांचा आदर व प्रेम संपादन केलें. पुढे मध्यप्रदेश शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे त्यांचा अमरावतींतील नोकरी दोन वर्षे आणखी लांबली. शेवटीं ते १९५० च्या एप्रिलमध्ये सेवानिवृत्त झाले. त्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनी त्यांच्या गौरवपर 'धूमकेतु' नियतकालिकाचा 'प्राचार्य नेने विशेषांक' प्रसिद्ध करून त्यांच्याविषयींचा आपला आदर व प्रेम व्यक्त केलें. या अंकांत प्राचार्य नेने यांच्या गुणवर्णनपर त्यांचे चौदा स्नेही, सहाध्यापक व विद्यार्थी यांचे लेख व कविता आल्या आहेत. त्यांत त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू वर्णिले आहेत व मनोरंजक आठवणी दिलेल्या आहेत.

नागपुरांत ३० वर्षे केलेलें कार्य

सन १९१७ पासून १९५४ पर्यंत मधलीं तीन चार वर्षे सोडल्यास हरिभाऊंचें नागपुरास सतत वास्तव्य होतें. या काळांत राजाराम वाचनालय, भिडे कन्याशाळा, सहकारी संस्था, सूतिकागृह, शारीरिक शिक्षणमंडळ, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, अभिनव नाट्यमंदिर, महाराष्ट्र साहित्य परिषद, सार्वजनिक उत्सव मंडळ विदर्भ साहित्यसंघ इत्यादि अनेक संस्थांत त्यांनी उत्तम प्रकारची कामगिरी केली. शाळाखात्यांतला शिक्षक म्हणजे तीस तीस तास शाळेंत काम करून व घरीं विद्यार्थ्यांच्या वह्यांचे गठ्ठे तपासून बेजार झालेला असावयाचा. पण अशाहि परिस्थितींत हरिभाऊंनी किती विविध प्रकारांनी विद्येची व या प्रांतांतील जनतेची सेवा केली हें पाहिलें म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होतें. ते इतकें कार्य करूं शकले, याचें कारण त्यांची निरलस वृत्ति आणि ज्ञानार्जनाविषयी व सार्वजनिक कार्याविषयी त्यांची आंतरिक तळमळ हेंच होय. 'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्' या संस्कृत सुभाषितांतील विद्यार्जनविषयक उपदेश त्यांच्या अंगीं पूर्णपणे बाणला होता. त्यांनी इतकें कार्य केलें, पण त्याविषयी अहंकाराचा एकहि शब्द त्यांनी कोठेहि काढला नाही, यांत त्यांची थोरवी आहे. आमचे एक स्नेही सार्वजनिक कार्यांत किती तास खर्चिले याचा हिशोब ठेवीत असतात. हरिभाऊंनी असा हिशोब ठेवला असता तर त्यांच्या सार्वजनिक सेवेच्या तासांची बेरीज लक्षावधि झाली असती. पण त्यांनी त्याबद्दल कधीहि उद्गार काढले नाहीत किंवा कोणत्याहि संस्थेंत अधिकारपदाच्या लालसेने प्रवेश केला नाही. पडेल तें काम निःस्वार्थी बुद्धीने करीत राहावयाचें, हा त्यांचा नेहमीचा बाणा. त्यामुळे त्यांचा कोणाशींहि खटका उडला नाही व कोणी त्यांचा हेवा केला नाही. ते खरे अजातशत्रु होते.

विविध वाङ्मयसेवा

हरिभाऊंच्या सार्वजनिक संस्थांतील सेवेचा परिचय त्यांचे इतर स्नेही करून देतील. येथे मी फक्त त्यांच्या वाङ्मयसेवेचा व संशोधनकार्याचा थोडक्यांत परिचय करून देणार आहे. हरिभाऊंनी लिहिलेल्या पुस्तकांचे व लेखांचे तीन विभाग करतां येतात—(१) शालोपयोगी, (२) शिक्षणशास्त्रविषयक आणि (३) संशोधनपर. या तीनहि विभागांतील त्यांची कामगिरी स्पृहणीय झाली आहे.

(१) शालोपयोगी पुस्तकें—१९२३ सालीं या प्रांतांतील हायस्कुलांत मराठी माध्यम सुरू झालें, त्या वेळीं संस्कृत विषय शिकविण्याकरिता योग्य पुस्तकांची उणीव भासूं लागली. डॉ. भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांचीं मराठी भाषांतरें उपलब्ध होतीं, पण त्यांतील पद्धति विद्यार्थ्यांस नीरस व कंटाळवाणी वाटे. हरिभाऊंना लहानपणापासून इतरांस शिकविण्याचा अनुभव होता. ट्रेनिंग कॉलेजांत त्यांना शिक्षणतत्त्वांचा उत्तम परिचय झाला होता. व त्यावर त्यांनी 'शिक्षणकला व मानसशास्त्र' या नांवाचें पुस्तकहि लिहिलें होतें. इतर विषयांच्या अध्यापनांत ज्या शिक्षणतत्त्वांचा अवलंब करण्यांत येतो, त्याचा संस्कृत विषयाच्याहि अध्यापनांत उपयोग करून तो विषय विद्यार्थ्यांस सुबोध व मनोरंजक करावा, या हेतूने त्यांनी संस्कृत पहिलें पुस्तक (१९२५) व संस्कृत दुसरें पुस्तक (१९२८) हीं दोन पुस्तकें लिहिलीं. या दोन्ही पुस्तकांच्या चार पांच आवृत्त्या आतापर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यावरून तीं लिहिण्यांत हरिभाऊंचा हेतु साध्य झाला, असें म्हणण्यास हरकत नाही. याखेरीज त्यांनी 'संस्कृतपुष्पहार' नामक संस्कृत वेंच्यांचें पुस्तक तयार केलें होतें, ते या प्रांतांतील हायस्कुल सर्टिफिकेट परीक्षेस पाठ्य पुस्तक म्हणून कांही वर्षे नेमलें होतें.

(२) शिक्षणशास्त्रविषयक—हरिभाऊंच्या शिक्षणकला व मानसशास्त्र' या पुस्तकाचा उल्लेख मागे आला आहे. या पुस्तकाची रूपरेखा व कच्ची प्रत १९२४ सालींच तयार झाली होती. पण त्याच्या प्रकाशनाचा योग येण्यास त्यानंतर सहा वर्षे लागलीं. या पुस्तकांत हरिभाऊंनी शिक्षणकला व मानसशास्त्र यावरील इंग्रजींतील प्रमाणभूत ग्रंथांचें परिशीलन करून व मराठींतीलही तद्विषयक ग्रंथ व लेख अभ्यासून बनलेलीं आपलीं मतें स्वतंत्रपणे मांडलीं आहेत. या ग्रंथाला अलाहाबाद विद्यापीठाचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक रामभाऊ रानडे यांची प्रस्तावना लाभली आहे.

संशोधनकार्य

(३) संशोधनपर ग्रंथ व लेख—वरील ग्रंथांपेक्षा महानुभावीय व इतर संशोधनकार्यांमुळेच हरिभाऊंचें नांव या प्रांतांत व इतरत्र असलेल्या विद्वानांस परिचित झालें; व त्यांच्या योगेंच त्यांची कीर्ति चिरकाल टिकेल. कै. नीळकंठराव भवाळकर या विद्वान, साक्षेपी बहुश्रुत व संशोधनप्रिय गृहस्थांच्या सहवासांत हरिभाऊंचें लक्ष महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वळलें. महानुभावपंथाचे लोक आपले ग्रंथ इतरांस दाखविण्यास तयार होत नसत. पण भवाळकर–नेने या जोडीने आपल्या संशोधनविषयक आस्थेने व चिकाटीने कांही महानुभावांचें प्रेम संपादन करून महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासास प्रारंभ केला. त्याचें पहिलें फळ "श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रें, भाग पहिला" या ग्रंथाच्या रूपाने सन १९३१ मध्ये बाहेर पडलें. हा ग्रंथ भवाळकर व नेने या दोघांच्या नांवावर प्रसिद्ध झालेला आहे. यांतील प्रस्तावनेंत भवाळकरांनी हरिभाऊंच्या भागाविषयीं लिहितांना पुढील उद्गार काढले आहेत. "त्यांनी (हरिभाऊंनी) सांकेतिक लिपीचा अभ्यास करून प्रत्येक हस्तलिखित स्वतः तपासलें आहे; व प्रायः दुर्बोध, कित्येकदा अस्पष्ट व अनेकदा अशुद्ध अशा लिपि व भाषा आत्मसात करण्याच्या उत्साहांत त्यांनी आपली दृष्टि मध्यंतरीं बिघडवून घतली...... भाषाविषयक टीपा सर्वस्वी त्यांच्याच आहेत व या दिशेने प्राचीन मराठी ग्रंथांचें अध्ययन करण्याची प्रथा पाडण्याचें श्रेय त्यांना देणें योग्य व न्याय्य होय." या ग्रंथाने हरिभाऊंचें नांव संशोधक म्हणून सर्वांस परिचित झालें. यानंतर आचारस्थळ, लक्षणरत्नाकर, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध), लीळाचरित्र इत्यादि अनेक महानुभावी ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यापैकी दृष्टांतपाठाखेरीज इतर सर्व हरिभाऊंनी एकट्यांनी संपादून प्रसिद्ध केले आहेत. या सर्व ग्रंथांस उपोद्घात, टीका, टिप्पण्या इत्यादिकांनी परिष्कृत केलें आहे.

मध्यप्रदेश संशोधन मंडळांतील कार्य

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अधिवेशन नागपुरास भरलें, त्या प्रसंगीं मध्यप्रांत (आता मध्यप्रदेश) संशोधन मंडळाची स्थापना होऊन १९३३ सालीं मकरसंक्रांतीस त्याच्या कार्यास आरंभ झाला. मंडळाच्या संस्थापकांमध्ये कै. भवाळकर व नेने हे प्रमुख होते, किंबहुना त्यांच्यासारख्या ख्यातनाम संशोधकांचें

साहाय्य नसतें, तर इतरांस ती संस्था काढण्याचें धैर्य क्वचितच झालें असतें. पुढे मंडळाच्या सभांत व वार्षिक दिन प्रसंगीं हरिभाऊंनी अनेक निबंध व टिप्पणें वाचलीं. आरंभीं आरंभीं या सभांना चांगलाच रंग येई. नागपुरांत महानुभावीय वाङ्मयाच्या चिकित्सक अभ्यासाची ती प्रभात होती. त्या वेळीं त्या वाङ्मयाच्या स्वरूपाविषयी, काळाविषयी व कर्तृत्वाविषयी भिन्न भिन्न मतें प्रचलित असल्यामुळे हरिभाऊ आपल्या निबंधांत, भाषणांत प्रतिपक्षांच्या आक्षेपांना उत्तर देण्याकरितां प्रमाणांमागून प्रमाणें मांडीत व श्रोत्यांची खात्री करण्याकरितां त्यांना प्रत्यक्ष पोथ्या दाखवीत. त्यांचें भाषण दोन दोन तास चाले. त्यावेळचा त्यांचा अभिनिवेश व महानुभावी वाङ्मयावरील त्यांचें निस्सीम प्रेम पाहून त्यांचे मित्र त्यांना थट्टेने 'महानुभाव' म्हणूं लागले; व कांहींना तर ते महानुभाव पंथाची दीक्षा घेतात काय अशी भीति वाटूं लागली.

महानुभावीय वाङ्मयाचें संशोधन हरिभाऊंच्या इतकें कोणीच केलें नाही

याशिवाय भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलन प्रसंगीं प्रतिवर्षी त्यांना निमंत्रण येई; व तेही एखादा निबंध पाठविण्यास चुकत नसत. अशा निबंधांपैकी कांही त्या मंडळाच्या त्रैमासिकांत प्रकाशित झालेले आहेत. आणि अन्वयस्थळ, वृद्धाचार व लक्षणरत्नाकर यांवरील लेख मंडळाच्या स्वीय ग्रंथमालेंत (क्र. ४४) समाविष्ट केले आहेत. दृष्टान्तपाठ हा भवाळकर-नेने यांनी संपादिलेला ग्रंथ मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाला आहे. लीळाचरित्राचा 'एकांक' नामक प्रथम भाग विद्यापीठाच्या परीक्षेस लावला असल्यामुळे त्याच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. महानुभावीय वाङ्मयाचे सुप्रसिद्ध संशोधक प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांनी एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे "महानुभावीय वाङ्मयाचें आस्थेवाईकपणाने संशोधन करून ते प्रसिद्ध करण्याचें कार्य हरिभाऊंच्या इतकें कोणीच केलें नाही."

ज्ञानेश्वरीचा अभ्यास

महानुभावीय वाङ्मयाप्रमाणे ज्ञानेश्वरी हाहि हरिभाऊंचा आवडता ग्रंथ होता; व त्याचें परिशीलन ते सदैव करीत असत. अहमदनगरच्या वाङ्मयोपासक मंडळाने १९३४ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'श्रीज्ञानेश्वर-दर्शन' ग्रंथांत (भाग १, पृ. २९-५३) हरिभाऊंचा 'ज्ञानेश्वरकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण' या विषयावर विस्तृत लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून त्यांच्या ज्ञानेश्वरीविषयक खोल अभ्यासाची प्रतीति येते.

डॉक्टरेट मिळावयाला हवी होती

हरिभाऊंचें संशोधनकार्य इतकें विपुल आहे की, त्याचा चतुर्थांशहि त्याला व्यवस्थित रूप देऊन कोणत्याहि विद्यापीठाला डॉक्टर पदवीकरितां त्यांनी सादर केले असतें, तर त्यांना ती पदवी सहज मिळाली असती. याविषयी मी त्यांना अनेकदा सुचविलें होतें. तेहि तसें करीन असें म्हणत असत. पण व्यावसायिक व सार्वजनिक कामांच्या गर्दीत त्यांना तें करण्यास पुरेशी फुरसत मिळाली नसावी. अशा प्रकारच्या पदवीने मनुष्याची योग्यता वाढत नाही. अशा पदवीपेक्षा मनुष्य जें संशोधनकार्य करतो त्याचें महत्त्व जास्त असतें, अशीहि त्यांची भावना झाली असेल.

विदर्भ साहित्य संघाची सेवा

१९५० सालीं सेवानिवृत्त झाल्यावर नागपुरासच उर्वरित आयुष्य घालविण्याचा संकल्प करून ते येथे स्थायिक झाले. यानंतरचा त्यांचा बहुतेक वेळ विदर्भ साहित्य संघाच्या सेवेंत गेला. गेल्या तीन चार वर्षांत झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या प्रगतीसाठी ज्यांचे अविश्रांत परिश्रम कारणीभूत झाले आहेत त्यांमध्ये हरिभाऊंची गणना प्रामुख्याने करावी लागेल. ते त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद व चिटणीस होते. त्यांनी केलेले परिश्रम व त्यांची साहित्यसेवा लक्षांत घेऊन विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी या वर्षाच्या अध्यक्षपदासाठी त्यांची अविरोध निवड केली; व त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें गेल्या एप्रिल महिन्यामध्ये विदर्भ साहित्य मंदिराचें उद्घाटन मोठ्या थाटाने झालें. लवकरच होऊं घातलेलें अचलपूरचें विदर्भ साहित्य संमेलनहि त्यांच्या अध्यक्षत्वाखाली निर्विघ्नपणे पार पडेल व त्यांच्या अध्यक्षीय भाषणाने त्यांच्या साहित्यसेवेवर कळस चढेल याविषयी कोणासहि शंका नव्हती. कारण हरिभाऊंची

प्रकृति उत्तम दिसत होती. पण ईश्वरी संकेत निराळा होता. नोव्हेंबर महिन्याच्या आरंभीं विदर्भ साहित्य संघांत झालेल्या 'महाभारतसार' ग्रंथाच्या प्रकाशन समारंभांत ते उपस्थित होते. पण त्यानंतर त्यांच्या प्रकृतींत बिघाड उत्पन्न झाला; व दोन आठवड्यांच्या अल्पावधींत रोगानें त्यांचे शरीर पोखरून काढलें. प्रकृति अत्यंत क्षीण झाली असतांहि त्यांनी विदर्भ साहित्यसंघाच्या अध्यक्षपदाचें कार्य चालू ठेवलें. अगदी शेवटल्या दिवशींहि (ता. २१-११-५४) आपल्या निवासस्थानीं कार्यकारी मंडळाची सभा भरवून चर्चा केली; व रात्रीं त्यासंबंधीच्या कागदपत्रां-वर स्वाक्षरीहि केली. त्याच रात्रीं पहाटे त्यांचें देहाव-सान झालें. अंगीकृत कार्याचें अगदी शेवटच्या क्षणापर्यंत परिपालन करणारे त्यांच्यासारखे कर्तव्यनिष्ठ गृहस्थ क्वचितच आढळतील.

कौटुंबिक आपत्ति

हरिभाऊंना कौटुंबिक जीवनांत दुर्दैवाचे अनेक आघात सहन करावे लागले. त्यांच्या मातापित्यांच्या निधनाचा उल्लेख मागे आला आहे. त्यानंतर सुमारें पंधरा वर्षांपूर्वी त्यांची सहधर्मचारिणीहि स्वर्गवासी झाली. त्या वेळीं त्यांची शेवटची मुलगी विजया केवळ दोन वर्षांची होती. या प्रसंगीं त्यांच्या भगिनी श्री. वेणूताई यांनी त्यांना धीर देऊन त्यांच्या संसाराची व मुलामुलींच्या संगोपनाची सर्व जबाबदारी स्वीकारिली व त्यांना मनःस्वास्थ्य मिळवून दिलें. हरिभाऊंच्या हातून जी साहित्यसेवा व समाजसेवा होऊं शकली, तींत श्री. वेणूताईंचाहि बराच मोठा वांटा आहे.

बहुगुणी कार्यकर्ता हरपला

हरिभाऊ बहुगुणी होते. तरुणपणीं त्यांना कुस्तीचा नाद होता. वेताच्या मल्लखांबावरचें त्यांचें आश्चर्य-कारक काम नागपुरास पाहिलेलें अनेकांना आठवत असेल. ते अभिनयकुशल होते. सहकारी संस्थेच्या विद्यमानें झालेल्या अनेक नाट्यप्रयोगांचें त्यांनी दिग्दर्शन केलें होतें, इतकेंच नाही, तर त्यांत स्वतः कामहि केलें होतें. वक्तृत्वांत-विशेषतः विनोदी वक्तृत्वांत-त्यांची बरोबरी करणारे क्वचितच आढळतील. कोट्या कर-ण्यांत त्यांचा हातखंडा होता. सभेच्या शेवटीं हरिभाऊ आभार मानतांना कोणती कोटी करतात याविषयी श्रोत्यांचें कुतूहल असे. विद्वत्ता, संशोधकत्व, वक्तृत्व, कलाभिज्ञता इत्यादि गुणांप्रमाणेच साधेपणा, मनमिळाऊ वृत्ति, आनंदी स्वभाव, निरपेक्षता इत्यादि गुणांचें मधुर मीलन हरिभाऊंच्या ठिकाणीं वसत असल्यामुळे त्यांच्या अकालीं निधनानें आपला जिवलग स्नेही दिवंगत झाला, असें वाटून सर्वांस अपरिमित दुःख व्हावें, यांत नवल नाही.

माझे 'काका' कै. ह. ना. नेने

सौ. सुशीला भालचंद्र आपटे

"वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वन्द्याः॥"

सदासर्वदा हसतमुख असणारे, प्रेमळ अंतःकरणाचे व मधुर भाषण करणारे माझे 'काका' म्हणजे जणूं वरील सुभाषिताचें प्रात्यक्षिकच होतें ! काकांच्या निधनानंतर त्यांना निरनिराळ्या संस्थांतर्फे जे सन्मान-पूर्वक हार अर्पण करण्यांत आले, मोठमोठ्या प्रतिष्ठित विद्वज्जनांनी गौरवपूर्ण जीं भाषणें केलीं, वर्तमानपत्रांनीं जे गुणवर्णनपर अग्रलेख लिहिले व आमच्या घरीं दुखवटा प्रदर्शित करणाऱ्या पत्रांचा जो ढीग पडला होता यावरूनच समाजांत काकांबद्दल केवढें प्रेम होतें व ते सर्वांना किती वंदनीय होते हें निदर्शनास येतें.

१९१७ सालीं फर्ग्युसन कॉलेजमधून मराठी व संस्कृत या दोन विषयांत एम्. ए. होऊन काका नाग-पुरास आले. शिक्षणक्षेत्रांत त्यांनी शिक्षक, सुपरिंटेंडेंट व प्रिन्सिपॉल या नात्यानें ज्ञानदानाचें अविरत कार्य करून त्यांत आपलें सारें आयुष्य वेचलें. आळसाला

त्यांनी आपल्या जीवनांत कधीच थारा दिला नाही. त्यामुळेच त्यांच्या हातून कामाचे ढीगच्या ढीग पार पडले. रागासारख्या महान् शत्रूला त्यांनी जिंकलं होतं! आम्हां मुलांवर काका रागावल्याचें कधी स्मरतच नाही मला. आमच्या हातून जर चुका झाल्या तर जमदग्नीचा अवतार धारण न करतां किंवा कधी छडीचा उपयोग न करतां ते आपल्या मृदु भाषणांनी निरनिराळीं उदाहरणें देऊन चुका पटवून देत. शाळेंतील अभ्यास शिकवतांना पुष्कळदा कठीण विषय म्हणजे–गणित माझ्या डोक्यांत लवकर शिरावयाचा नाही. तरी त्यांच्या तोंडून कधी त्यावद्दल अपशब्द बाहेर पडावयाचा नाही. "अग! एकदा नाही समजलं म्हणजे केव्हाच येणार नाही असं थोडंच आहे? आपण प्रयत्न करावा–" असंच ते म्हणत. प्रत्येक गोष्टींत धीर देत.

'मृदूनि कुसुमादपि' असं काकांचं अंतःकरण होतं. अतिशय भावनाप्रधान होते ते! सासरीं गेल्यावर नमस्कार करावयास गेलें की ते वर बघत. अश्रू लप-विण्याचा प्रयत्न करीत. स्टेशनवर पोहचविण्यास तर ते टाळतच! त्यांचीं पत्रें सुद्धा भावनेने कांठोकाठ भर-लेलीं असत. काकांचं पत्र आलं की ५-७ वेळां वाच-ल्याशिवाय माझं समाधान होत नसे. पत्र वाचतांना प्रत्यक्ष तेच बोलताहेत असा भास होई. दोन वर्षांपूर्वी मी अशीच माहेरीं गेलें असतांना काका अमृतानुभवामधील कांही ओव्यांचा अर्थ समजावून सांगत होते. गुरूंच्या कृपेचं माहात्म्य त्यांत वर्णन केलं होतं माळ्याचें रूपक देऊन "माळ्यानें जरी झाडांना मनमुराद पाणी घातलं, त्यांची जोपासना केली तरी फुलांना बहरण्यासाठी–फुलोरा येण्यासाठी वसंताचं आगमनच व्हावं लागतं... तसं गुरुकृपेवाचून सर्व व्यर्थ आहे..." त्यांचा कंठ इतका दाटून आला, आनंदाश्रू वाहूं लागले, त्यांना पुढे वाचवेना! मला त्या क्षणीं काकांवद्दल–त्यांच्या थोर व प्रेमळ अंतःकरणावद्दल इतकी धन्यता वाटली की त्याचं वर्णन करणं माझ्या अल्पमतीला शक्य नाही असे किती तरी प्रसंग माझ्या मनश्चक्षूसमोर उभे राहातात.

'उत्कट ज्ञानपिपासा' हा त्यांच्या जीवनाचा प्रामु-ख्यानें चमकणारा पैलू होता. मुलांच्या दंगलींत, पाहुण्यांच्या गडबडींत व इतर कार्यांच्या गोंधळांत वेळ मिळेल तेव्हा ते विनतक्रार वाचत किंवा लिहीत बसत. ९ वर्षांपूर्वी मी, माझी ताई व एकुलती एक वहिनी अशा तिघी घरांत बाळंतिणी होतों. मी व वहिनी दोघी पहिल्यांदाच बाळंतिणी असल्यामुळे बारशाचा कार्यक्रम थाटाचा होता. मे महिना म्हणजे नागपूरचा अगदी उन्हाळ्यांतला कडक! बारशामुळे पाहुण्यांची गर्दी, कामाची घाई आणि तान्ह्या मुलांचे सप्तसुरांतील आवाज! माजघर थंड म्हणून सर्वांचे तळ आमच्या खोलींत. इतक्या गोंधळांत काका आपले निवांतपणानें माझ्या बाजेजवळ ज्ञानेश्वरी वाचत बसले होते. मला त्यांची इतकी गंमत वाटली आणि मी म्हटलं सुद्धा 'काका! असल्या वातावरणांत तुम्हांला सुचतं तरी कसं वाचायला?' ते फक्त हसले. हें हास्य आमच्या नेहमी-च्याच परिचयाचं होतं. नवख्या माणसाला मात्र आश्चर्य वाटायचं. त्यांची अभ्यासू वृत्ति आम्हां मुलांना लाज-विणारी होती. अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे माजी व्हाइस चान्सेलर प्राध्यापक रा. द. रानडे यांचीं कांही वर्षांपूर्वी नागपूरांत व्याख्यानें झालीं. व्याख्यानाचा गोषवारा टिपून व्याख्यानानंतर काकांनी त्यांना दाखविला. तत्त्वज्ञाना-सारख्या गहन विषयावरचा गोषवारा एकहि मुद्दा न गाळतां—सुटतां लिहिलेला बघून प्राध्यापकांना आनंद वाटला. प्रा. रानडे यांच्याशीं भेटीचा सुयोग आला असतांना मला त्यांनी काकांवद्दलची हकीकत सांगितली. फर्ग्युसनमध्यें असतांना काकांचे ते गुरु होते. आपल्याला जेवढं माहीत तेवढंच ते सांगणार हाहि काकांचा वाखाणण्याजोगा गुण गुरुवर्यांनी व्यक्त केला. काकांच्या 'शिक्षणकला व मानसशास्त्र' या पुस्तकाला प्रा. रानडे यांनी लिहिलेली प्रस्तावना त्यांचा विद्याव्यासंग दर्शविते.

विद्वत्ता व कला यांचं वहुधा वैरच आढळतं. पण काकांच्या ठिकाणीं विद्या व कला यांचा उत्कृष्ट संगम पहावयास मिळे. त्यांच्या मनमिळाऊ व गोड स्वभावा-प्रमाणे परमेश्वराने त्यांना सुरेल आवाजाची देणगीहि दिली होती. लग्नकार्यांत आपल्या मधुर पण खड्या आवाजांत काका रागदारींत श्लोक म्हणत. घरांत तर नेहमीच गुणगुणत. काका नेहमीच पहाटें उठून ज्ञाने-

स्वरी, महानुभावांच्या पोथ्या कांही ना कांही तरी वाचत. तो नादमधुर आवाज अजूनहि माझ्या कानांत घुमतो. कुठे गाण्याची बैठक असली की काका तांबडं फुटेपर्यंत एकतानतेनें वसत. त्यांची नाटचाची आवड तर औरच.

नेहमी गर्दीचें व गडबडीचें काकांचें जीवन सेवा-निवृत्तीनंतर अधिकच झालें. काकांचें कपडयांकडें कुठून लक्ष असणार ? कपडे मळले असले तरी तसेच कोट टोपी चढवून केव्हा ते पटकन् बाहेर जात आम्हाला कळतहि नसे. आम्ही मुलं मोठीं झाल्यावर आणि आता नातवंडानींच म्हटलं की 'काका, कपडे मळले आहेत. दुसरे घाला' आणि अगदी हातांतच आणून दिले तर ते घालणार, त्यांतूनहि वेळ नसेल तर म्हणत 'अग ! कोण काय बोलणार ?' विद्वत्ता व टापटीप यांचा छत्तीसाचा आकडाच असतो जणू कांही !

काका अतिशय विसरभोळे होते. बाहेर जातांना हटकून टोपी किंवा चष्मा सापडायचा नाही. मग सर्वांनी धावपळ करावी. चष्मा नेमका पुस्तकांच्या ढिगाऱ्यांत कुठे तरी दडलेला असावयाचा. कुठे जेवणाचें आमंत्रण असले किंवा जरूरीचें पत्र वगैरे टाकावयाचें असल्यास घरांत ते सर्वांना त्याविषयी आठवण करण्यास सांगत.

'पुस्तकांतील किडा' ज्याला म्हणतात तसे काका नव्हते. लहानपणापासून तों साठीच्या वयांत सुद्धा त्यांचा व्यायाम कधी चुकला नाही. त्यांची शरीरयष्टी तरुणांना लाजविणारी होती. त्यांचा देह वाळलेला किंवा ते अंथरूणावर पडलेले कधी आठवतच नाही. कुस्ती, मलखांब इ. व्यायामांत त्यांना सुवर्णपदकें मिळालीं आहेत. कॉलेजमध्ये असतांना पंजाबी पहेलवानाला चीत केल्याची हकीकत म. म. दत्तोपंत पोतदार ह्यांचे तोंडून ते आमचे घरीं बदलापूर येथे आले असतांना सांगितल्याचें ऐकलें आहे. त्यांचीं सुवर्णपदकें व इंग्रजी दुसरींतील सुवाच्य मोत्यासारखें अक्षर असणारी निबंधाची वही आम्ही मुलांनी त्यांची आठवण म्हणून जपून ठेवली आहे.

काका विदर्भ साहित्य संघाचे एकमताने निवडून आलेले अध्यक्ष होते. त्यांनी मरणापर्यंत आपलें काम चोखपणाने बजावलें. काकांच्या प्रकृतीकडे बघून व त्यांचा काम करण्याचा उत्साह बघून आम्ही मुलं इतक्या लवकर आणि आकस्मिपणे प्रेमळ पित्याच्या छत्राला मुकूं असं स्वप्नांतहि वाटलं नव्हतं ! कीर्तीच्या उच्च शिखरावर असतांना त्यांना मानाचं मरण आलं. सोनं झालं त्यांचं ! 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' असं ते नेहमी म्हणत आणि तसंच मरण त्यांना आलं ! काकांच्या विशाल, विशुद्ध व विमल जीवनाचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून त्याप्रमाणें वागण्याची सुबुद्धि परमेश्वर मला देवो व त्यांच्यासारख्या देवमाणसाच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच त्या जगन्नियंत्या प्रभूजवळ नम्र प्रार्थना !

[वि. सा. संघाचे दिवंगत अध्यक्ष हरिभाऊ नेने यांच्या भगिनी सौ. **द्रौपदीबाई दिवेकर** चिटणीस, ग्रामसुधार बालमंदिर, गोंदिया, यांची 'बंधुराया !' ही भावपूर्ण कविता व हरिभाऊंची स्नुषा सौ. **मंगला मनोहर नेने** यांचा हृदयस्पर्शी लेख खाली देत आहोंत. **—संपादक**]

बंधुराया [अभंग]

काळाची झडप बंधुराया पडे ।
दुःख आवरेना वार्ता येतां ।।
कष्टी होतां बहु वदला ना कांही ।
आता मम आसूं कोण पुसे ? ।।
क्षणोक्षणीं वाटे दिव्य रत्न गेलें ।
कसें हरपलें कळेचिना ।।
कृष्णसखयाचें द्रौपदिवर प्रेम ।
तैसें तुझें प्रेम हरिभाऊ ।।
राखुनिया कीर्ति बंधुराया गेला ।
गुण आठवतां संपेचिना ।।
धवल तुझें प्रेम धवलचि भाव ।
धवल गा गान गात राही ! ।।

—द्रौपदी दिवेकर

अनुक्रमणिका

आमचे आदर्श 'काका'

सौ. मंगला मनोहर नेने

२२ नोव्हेंबर १९५४ चा दुर्दैवी काळ–दिवस उजाडेल अन् आमचे प्रिय काका आम्हाला सोडून जातील याची थोडी कल्पनाहि आम्हाला स्पर्शली नाही. २० नोव्हेंबरला काकांना मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये हलविण्याचा विचार करण्यांत आला; पण दुसरा दिवस रविवारचा असल्याने, २२ नोव्हेंबरला सकाळीं ८ वा. काकांना हॉस्पिटलमध्ये न्यायचें निश्चित झालें होतें. म्हणून आम्ही पुढील तयारींत गुंतलों होतों, तेच विचार मनांत घोळत होते. परंतु त्या आधी सोमवार ता. २२ ला पहाटे ३-४५ वा. काकांचा अगदी आकस्मिक अंत झाला! ता. २१ ला सायंकाळपासून काळ काकांच्या भोवतीं घोटाळत असेल, संधीची वाट पहात असेल याची कांहीच जाणीव नव्हती. शत्रूलाहि मित्र मानून सदैव शांत व गंभीर रहाणारे काका मृत्युक्षणापूर्वीहि शांत होते. यमाचे दूत त्यांचेशीं रस्सीखेच करीत असतांहि ते निश्चल होते. अखेरीस काळाने काकांवर झडप घातली आणि त्याचेसवें शांततेनेच ते निघून गेले!

काका फारच दयाळू आणि मृदु अंतःकरणाचे होते. आपल्यासाठी कुणाला त्रास व्हावा, किंवा यत्किंचित्‌हि दुःख व्हावें याची कल्पनादेखील त्यांना सहन होत नसे. स्वतः दुःख, कष्ट सहन करून दुसऱ्याला सुख देतां येईल तर अवश्य द्यावें, इतरांचें भलें करण्यासाठीच झटावें आणि कुठे कसलीहि खळखळ न करतां सरळ अन् स्वच्छ धोरण ठेवावें हें काकांचें ध्येय होतें. आपल्या ध्येयाच्या पूर्तीसाठी ते शेवटपर्यंत जागरूक राहिले. तसें पाहिलें तर काका केवळ १५–२० दिवसच आजारी होते. पण या आजारांत त्यांनी बाहेरच्या मंडळींनाच काय परंतु आम्हा घरच्या मंडळींनासुद्धा त्रासाची जराहि झळ पोंचूं न देतां, ममतेनं आणि प्रेमळपणानं वागविलं. मृत्यूच्या कांही क्षणापूर्वी ते म्हणाले, "किती वेळ जागणार आहांत तुम्ही? मला बरं वाटेल आता. जा. झोपा पाहूं तुम्ही." इतकी काळजी ते घेत होते. वस्तुतः मरणापूर्वी त्यांनी आम्हाला कांही सांगावं. परंतु त्यांना आपलं आता लवकरच देहावसान होणार असं मुळीच वाटत नसावं!

कै. काकांच्या विशाल आणि उदात्त जीवनाबद्दल लिहायला शब्द अपुरेच आहेत. अथांग सागराप्रमाणं ते शांत अंतःकरणाचे होते व त्यांत अनेक मूल्यवान रत्नें दडलीं होतीं. ज्यांना जितकीं हवीं तितकीं तीं निवडावीं. जेवणाच्या वेळेसच काय ते मार्मिक कोट्या आणि सात्त्विक विनोद करीत. त्यांच्या कोट्या अन् विनोद कांहीतरी बोधप्रद धडाच शिकवीत. हास्यविनोदाचा एवढा वेळ सोडला की काका शांत नि गंभीर असत. संबंध दिवस लेखन, वाचन आणि संशोधन यांत ते गढलेले असत. रोज अगदी पहाटे म्हणजे तीन साडेतीनच्या सुमारास ते नियमितपणे उठून स्नानादि प्रातर्विधि उरकीत व मग आपल्या कामाला जे लागत ते रात्री नऊदहावाजेपर्यंत सारखे खपत. त्यांना आम्हा घरच्या मंडळीशीं वेळ काढून कांही बोलायला अवकाश मिळत नसे. आमच्या सासूबाई त्यांना म्हणत असत, "एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीविषयी तुमच्याशीं बोलायचं तरी कोणत्या वेळीं?" त्यावर ते निर्मळ हास्य करून उत्तर देत, "आयुष्यांत प्रत्येक क्षण महत्त्वाचाच असतो. प्रत्येकानं त्या क्षणाचं महत्त्व लक्षांत घ्यावं आणि आपल्या शुद्ध मनाला पटेल तसं करावं."

सोज्वळ आणि ममताळु प्रकृति ही काकांना ईश्वरदत्त देणगीच होती. त्यामुळे ते इतरांचीं मनें कितीहि तप्त झालीं तरी सहजतेने शांत करीत. लहान लहान बालकांच्या भांडणापासून तों मोठ्या व्यक्तींच्या तक्रारीपर्यंत ते अगदी शांतपणें ऐकून घेऊन प्रत्येकाला अशा गोड शब्दांत सल्ला देत की वेडेवाकडें तोंड करून परतायची कुणावर पाळीच येत नसे. काकांचे प्रेमळ समजुतीचे व धीराचे बोल ऐकून तप्त मन शांत होई व चेहऱ्यावर आनंद उसळून येई. त्यांच्या या सात्त्विक नि निर्मळ स्वभावामुळे मला 'सासरा' म्हणून जो दरारा किंवा भीति वाटायला पाहिजे तसें या क्षणापर्यंत कांहीच जाणवलें नाही. सासुरवास म्हणून इतर घरांत सुनेला जो जाच किंवा त्रास होतो व ती बापडी हैराण होते असें मी जें कांही ऐकत आलें त्याचा

मागमूसहि मला माझ्या सासुरवाडींत लागला नाही. याचें मुख्य कारण म्हणजे माझ्या आईप्रमाणे असलेल्या कनवाळू स्वभावाच्या सासूबाई आणि मायेचे छत्र असलेले माझे आदर्श सासरे हे होत. मला कुठेहि कांही जाणवलें तरी डोक्यावर काकांचें छत्र सतत आहे, प्रापंचिक उन्हाचे थोडेहि चटके बसले तरी त्यांची शीतल छाया मजवर आहेच हीच माझी समजूत होती, नव्हे स्वानुभवच आला होता. काकांच्या याच शीतल नि उत्साहवर्धक छायेखाली आजपर्यंतचें माझें आयुष्य अगदी फुलपाखराप्रमाणें गेलें–कौटुंबिक जीवन नंदनवनाप्रमाणे सुखकारी वाटलें.

आत्मस्तुति किंवा मोठेपणा असे शब्द काकांच्या शब्दकोशांतच नव्हते. त्यांनी कितीहि मोठं काम केलं तरी नम्रपणा धारण करून स्वतःकडे कमीपणाच घेत. इतकेंच नव्हे तर 'आज्ञा करा. होईल ती अल्पस्वल्प सेवा करूं' असंच म्हणत. विदर्भ साहित्य संघाचें अध्यक्षपद कायम असल्याचा निकाल ऐकून त्यांची बरीचशी मित्रमंडळी त्यांना भेटायला येऊन अभिनंदन करूं लागली तेव्हा ते उद्गारले, "अहो, हा विजय तो कसला नि अभिनंदन तें काय ! 'हरिभाऊ' म्हणून कुणी प्रेमानं हाक मारली की तोच माझा खरा विजय, खरं अभिनंदन ! आपल्या अंतःकरणाची पवित्र साक्ष असली की सारंच कांही कमावलं ! आयुष्यांत विरोधासाठी विरोध कधी पत्करला नाही–कधी पत्करणार नाही आणि कुणी विरोध करतोच म्हटलं तर आपण हात जोडून सेवेला हजर असावं म्हणजे झालं !"

अशा उदात्त विचारसरणीचे आमचे काका होते. त्यांची रहाणी तरी किती साधी ! विचारांचा डामडौल नाही की रहाणीचा डामडौल नाही. चंदनासारखा आपला देह झिजविणं अन् फळाची कसलीहि अपेक्षा न बाळगणं हेंच त्यांचं कर्तव्य. अशा अनेक थोर गुणांची सुंदर मूर्ति असलेले आमचे काका आम्हांला एकाएकी सोडून गेले ! देवाला चांगलीं माणसं आवडतात म्हणून हाक येतांच ते सरळ तत्क्षणीं निघून गेले असावेत !

कै. नेने यांच्या कोट्या व विनोद

मित्रवर्गांत हरिभाऊंच्या कोटया फार प्रसिद्ध होत्या. हरिभाऊंच्या सभांमधील भाषणांत किंवा खाजगी बोलण्यांत कोटया नेहमीच असत; व सध्या हरिभाऊंची आठवण होतांच त्यांच्या मित्रवर्गापैकी प्रत्येकास त्यांच्या निदान दोन तीन तरी कोटया सहज आठवतील. अशा वेळींच अशा कोटयांचा संग्रह करण्याचें कोणीं मनांत आणल्यास ह्या विनोदी कोटयांचा एक बराच मोठा संग्रह होणें शक्य आहे.

माझ्या कानावर असलेल्या अशा कोटयांपैकी सुरुवात म्हणून चार दोन मी खाली देत आहें. त्यांपैकी कांहींचा जाहीर भाषणांतून उल्लेख झालेला आहे.

शाळा सुरू होण्याची घंटा वाजत होती. हरिभाऊ घाईघाईने शिक्षकांच्या खोलींत शिरत होते व इतर शिक्षक बाहेर पडण्याच्या तयारींत होते. त्यांतील एकाने हरिभाऊंना छेडण्यासाठी म्हटलें, "हरिभाऊ, घंटा वाजते आहे." हरिभाऊंनी उत्तर केलें, "आगमार्थं तु देवांना गमनार्थं तु राक्षसाम् ।"

बरेच दिवसांनी एक मित्र हरिभाऊंना रस्त्यांत भेटले; आणि हसत नमस्कार करीत म्हणाले, "हरिभाऊ आज तुमची गाठ पडली हा केवळ ॲक्सिडंटच." "तुम्ही मला पाहिलंत आणि हसलांत, अक्षी आणि दंत यांनी केलेलें कार्य तोच ॲक्सिडंट" हरिभाऊ म्हणाले.

हरिभाऊंच्या शब्दविग्रह करून अर्थोत्पत्ती करणाऱ्या या कोटयांवरून त्यांना त्यांच्या मित्रवर्गांत 'व्युत्पत्ती प्रदीप' असेंहि नांव मिळालें होतें.

अभिनव नाटय मंदिराच्या स्थापनेच्या दिवशीं नियोजित अध्यक्ष श्री. गरुड होते. पण ते येऊं न शकल्याने हरिभाऊंचें नांव अध्यक्षपदाकरिता सुचविलें गेलें.परंतु आपण कांही श्री. गरुडांच्या बरोबरीचे नाही असें विनयाने सुचविण्यासाठी त्यांनी आपल्या भाषणाच्या सुरवातीसच "प्रासादशिखरस्थोपि काको न गरुडायते" या सुभाषिताचें स्मरण श्रोत्यांस दिलें; त्या विनयशील उच्च विनोदाची आठवण त्या श्रोत्यांपैकी कोणीहि कधीच विसरणार नाही.

श. वा. रानडे

कै० हरिभाऊंच्या सहवासांतील चार दिवस

ना. ग. डबीर, गोंदिया

१९४८ च्या गोंदियाच्या विदर्भसाहित्यसंघाच्या रजत संमेलनापासून कै. हरिभाऊंच्या परिचयास सुरवात झाली. विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यकारिणींत माझा प्रवेश झाल्यानंतर परिचयाचें रूपान्तर स्नेहांत दिवसें-दिवस वृद्धिंगत होत गेलें. महाराष्ट्रीयांनी चालविलेल्या मित्रमंडळाच्या गीताजयंति व गणेशोत्सव यांच्या विद्यमाने जेव्हा जेव्हा कै. हरिभाऊंना गोंदियाला भाषण देण्याकरिता आमंत्रण आम्ही धाडत असूं, त्या त्या वेळीं आपुलकीने गोंदियाला ते आल्याशिवाय कधीहि राहिले नाहीत. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे प्रभृति विदर्भ साहित्यसंघाच्या प्रमुख कार्यकर्त्या मंडळीइतकेंच गोंदिया शाखेवर कै. हरिभाऊंचें प्रेम होतें. आपल्या साधेपणाने, सौजन्याने व विद्वत्तेने येथील लोकांचीं मनें त्यांनी आकर्षित करून घेतलीं होतीं व त्यांच्यांतील व येथील लोकांतील आपपरभाव लुप्त झाला होता.

गेल्या वर्षीच्या केंद्रीय निवडणुकींतील निरनिराळ्या घटनांनी येथील बराचशा लोकांना विदर्भ साहित्यसंघासंबंधाने जो एक उबग व तिटकारा उत्पन्न झाला होता व कार्याविषयी औदासिन्य पसरलें होतें, तें दूर करण्याकरिता कै. हरिभाऊंना लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथिनिमित्ताने येथे येण्याचें निमंत्रण दिलें व त्यांनी तें स्वीकारलें. त्यादिवशीं नागपूरला मध्यप्रदेशाचे राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली होणारा टिळकपुण्यतिथीचा प्रमुख कार्यक्रम बाजूला सारून येथे दिनांक ३१ जुलैलाच ते अत्यंत अगत्याने आले. त्याप्रसंगीं ते ३१-७-५४ पासून ३-८-५४ पर्यंत आमचे घरींच उतरले होते. त्या चार दिवसांत त्यांनी टिळक पुण्यतिथिनिमित्त व स्वाध्यायमंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगीं भाषणें दिलीं. तीं भाषणें हितोपदेशच ठरतील. औदासिन्याचें पटल दूर सारलें गेलें. नवीन कार्यकर्त्यांत त्यांनी चैतन्याचे स्फुलिंग चेतविले व तरुणांना कार्यप्रवण केलें. जी संघटना राजकारणी डावपेचांमुळे विलयास जाऊं पहात होती तिला आपल्या उपदेशामृताने खतपाणी देऊन जीवंत केलें. कै. हरिभाऊंचें आगमन झालें नसतें तर बहुधा येथील शाखेची इतिश्रीच झाली असती असें वाटतें. येथील कार्यकर्त्यांमध्ये संजीवनी ओतून कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची वाण नाही असें आपल्या स्नेहार्द्र व कळकळीच्या वर्तनाने दाखवून दिलें. विदर्भ साहित्यसंघाच्या शाखेच्या दप्तरांत पडून असलेल्या महत्त्वाच्या लेखांची छाननी करून नागपूरला गेल्याबरोबर गोंदिया तहसिलींतील मराठी शिक्षणावर कसें आक्रमण होत आहे ह्या लेखाला प्रसिद्धि देऊन राज्यपुनर्घटना समितीच्या आगमनप्रसंगीं गोंदियाकडे सर्व मराठी भाषीयांचें लक्ष वेधून घेण्यास मदत केली.

गोंदियासारख्या महाराष्ट्राच्या पूर्वसीमेवरील प्रदेशातर्फे राज्य पुनर्घटना समितीसमोर मराठी भाषिकांची बाजू मांडली जावी याकरिता या मुक्कामांत त्यांनी अविश्रांत खटपट केली. बऱ्याचशा लोकांच्या भेटी घेतल्या. बालाघाटच्या मंडळींना येथे बोलावण्यांत येऊन त्यांना निवेदनासंबंधाने सूचना करण्यांत व त्यांच्यातर्फेहि राज्यपुनर्घटनासमितीसमोर निवेदन करविण्यांत कै. हरिभाऊंचा प्रमुख भाग होता. तसेंच गोंदियातर्फे राज्यपुनर्घटनासमितीसमोर निवेदन मांडविण्यांत त्यांचेंच प्रोत्साहन व मार्गदर्शन कारणीभूत झालें.

त्यांच्या ह्या चार दिवसांच्या सान्निध्यामुळे कै. हरिभाऊंचें अत्यंत जवळचें विविधदर्शन झालें व त्यांच्या सौजन्याचा, प्रामाणिकपणाचा, कळकळीचा व

अनुक्रमणिका

विद्वत्तेचा ठसा आमच्या कुटुंबांतील लहानापासून थोरापर्यंत इतका उमटला की ते आमच्या कुटुंबांतील एक व्यक्तीच या दृष्टीने आम्ही सर्व त्यांच्याकडे आकर्षिले गेलों. त्यांनी आम्हां सर्वांना नागपूरला त्यांच्या पाहुणचाराचा लाभ घेण्याचें अत्यंत कळकळीचें व प्रेमाचें निमंत्रण दिलें होतें. परंतु कालाचा महिमा अगाध आहे. येथून जातेवेळीं त्यांचा अंतकाळ इतका जवळ आहे असें आम्हांला कधीहि वाटल नाही. अध्यक्ष या नात्याने जिंकलेलें अपील याबाबत अभिनंदनाचें पत्र पाठविल्यानंतर त्या निणर्याचा आस्वाद घेण्यापूर्वीच ते हा इहलोक सोडून जातील असें आम्हास वाटलें नव्हतें. आम्ही त्यांच्याकडे नागपूरला जाण्याच्या विचारांत असतांनाच त्यांच्या मृत्यूची दुर्दैवी बातमी कळली. तें ऐकून आमच्या घरच्या मंडळींना इतकें तीव्र दुःख झालें की आपल्या कुटुंबांतील एक व्यक्ति दिवंगत झाली.

साहित्यसंघटनेंतील महत्त्वाच्या जागा केवळ विद्वत्ता व साहित्यक्षेत्रांतील श्रेष्ठता या गुणावरच भरल्यास त्या संघटना बलशाली होतीलच असें हमखास वाटत नाही. तर त्या गुणांच्या जोडीला माणुसकी सौजन्य व दुसऱ्यांचीं मनें आपल्या निर्मळ चारित्र्याने आकर्षित करून व जिंकून घेणारींच माणसें हवींत. कदाचित् विद्वता व साहित्यिक जगांतील श्रेष्ठता या गुणद्वयांतील किंचित् उणीव निभून जाईल. परंतु माणुसकी, सौजन्य व निर्मळ चारित्र्य ह्या प्रस्थानत्रयींवरच साहित्यिक संघटनेचें मुद्दा रोपट्याचे कसदार व छायाप्रधान वृक्षांत रूपांतर होईल, एरवी नव्हे. आणि हेंच नेमके विरळ गुण कै. हरिभाऊंत होते व यांतच त्यांचें एकमेव वैशिष्ट्य होतें.

प्रवासांतील सोबती

डॉ. श. गो. तुळपुळे, पुणें विद्यापीठ

गेल्या ऑक्टोबरमध्ये नागपुरास गेले वेळीं हरिभाऊ नेने यांची गाठ पडली, तेव्हा मी त्यांना सहज म्हटलं "मी वऱ्हाडांत भांदक, रिद्धपूर अशा गावीं कांही शिलालेखांचे ठसे घेण्यासाठी थोडा फिरणार आहें. तेव्हा तुम्ही बरोबर येतां कां ! आलांत तर फार बरं होईल. कारण मला या प्रांताची विशेष माहिती नाही आणि तुम्ही रिधपूरला अनेकदा गेलेले असल्याने तुमच्या सहवासाचा मला पुष्कळ उपयोग होईल." यावर हरिभाऊंनी फारसे आढेवेढे न घतां 'शक्यतों करून येतों' असं म्हटलं आणि आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं नागपूरच्या स्टेशनवर भेटायचं असं ठरलं. मी मात्र मनांतून थोडा साशंक होतों. कारण एकतर त्यांचं वय झालेलं मला दिसत होतं; आणि दुसरं म्हणजे रिधपूर मला नवं असलं तरी त्यांना जुनंच होतं. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहतों तों हरिभाऊ माझ्या आधीच आपल्या प्रवासी वेषांत नागपूर स्टेशनवर हजर! क्षणभर या साहेबी पोशाखांत मी त्यांना ओळखलंहि नाही. आणि मग येथून आमचा जो एकत्र प्रवास सुरू झाला, ते जवळ जवळ तीन दिवस-रात्र आम्ही बरोबर होतों. गाडीनं नागपूर सोडल्यावर हरिभाऊ म्हणाले, "डॉक्टर, आज मी खरोखर येणार नव्हतों कारण संघाचीं आणि इतरहि कामं बरींच होतीं. पण एकाच विचारानं सारीं कामं बाजूला ठेवून आलों अन् तो हा की, 'या निमित्तानं जुन्या शिलालेखांचे ठसे कसे घेतात हें प्रत्यक्ष पहावयास मिळेल आणि संशोधनाच्या एका नवीन क्षेत्रांत प्रवेश होईल. आजवर मी महानुभावी वाङ्मयाचं संशोधन पुष्कळ केलं, परंतु या साधनाकडे माझं लक्षच कधी गेलं नाही. तो योग अनायासें आला हें पाहून मी आज तुमच्याबरोबर निघण्याचं ठरविलं."

आम्ही दुपारीं भांदकला पोचलों तेव्हा बारा वाजून गेले होते. जेवणाची सोय अर्थात् नव्हतीच. तेव्हा अधिक वेळ न घालवितां सरळ एक बंडी करून गावांत गेलों अन् हवे ते दोन शिलालेख शोधून त्यांचे ठसे घेतले. ठसे घेण्याचें हें काम चालूं असतांना हरिभाऊ आपलं वय आणि अधिकार हे सारं विसरून मला प्रत्येक गोष्टींत मोठ्या आस्थेनं मदत करीत होते.

लेल असलेली शिळा पाण्यानं धुवून स्वच्छ करणं, इतकंच काय, पण विहिरींतून पाणी आणणं यासारखीं कामंसुद्धा त्यांनी आणि मी मिळून केलीं. मी कितीहि नको म्हटलं तरी ते ऐकतच ना. त्यांचं आपलं एकच म्हणणं की, "कुठलंहि काम शिकायचं म्हणजे अगदी पहिल्यापासून शिकलं पाहिजे." याप्रमाणे आम्ही तो दिवस भांदकला काढला आणि दुसऱ्या दिवशीं रिधपूर गाठलं. महंत श्री. गोपीराजबाबा यांनी आमच्यासाठी एक बंडी चांदूरबाजारला पाठविली होती, पण तिची आमची चुकामूक झाली. अन् हो ना करतां करतां आम्ही एकदाचे रात्रीं ९ वाजतां रिधपूरला येऊन पोचलों. पोंचताच श्री. गोपीराजबुवांनी हरिभाऊंना प्रेमालिंगन दिलें आणि क्षणभर दोघांनाहि गहिवरून आलें. रिधपुरांत हरिभाऊ अगदी घरच्यासारखे वागत होते असें मला दिसलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोपीराजबुवांनी स्वतः बरोबर येऊन रिधपुरांतील सारीं स्थळें आणि 'संबंधी ओटेगोटे' सारें मला दाखविलें तेव्हा हरिभाऊ त्यांच्या बरोबरीनं सारा इतिहास सांगत होते. एका जुन्या महानुभावी काव्याचं प्रकाशन करण्यासाठी म्हणून त्यांनी गोपीराजबुवांकडून कांही पोथ्या बरोबर घेतल्या आणि आम्ही रिधपूरचा निरोप घेतला. गोपीराजबुवा स्वतः गावाच्या शीवेपर्यंत आम्हाला पोचविण्यासाठी म्हणून आले आणि प्रत्यक्ष निरोप देतांना त्या दोघांचेहि डोळे पाणावलेले मी स्वतः पाहिले. आपली ही अखेरची भेट असेल असं या दोघा महानुभाव महंतांपैकी एकालाहि वाटलं नसेल! असो. परतीच्या वाटेवर अमरावतीस श्री. अग्निहोत्री यांचा पाहुणचार घेतला आणि रात्रीच्या गाडीनं मी पुण्याकडे आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे हरिभाऊ नागपूराकडे याप्रमाणे रवाना झालों.

हरिभाऊंनी महानुभावांची सांकेतिक लिपी अभ्यासकांच्या तरुण पिढीला शिकविण्यासाठी म्हणून पुण्याला महिनाभर येऊन रहावें आणि विद्यापीठांत किंवा साहित्य परिषदेंत एक अभ्यासवर्ग चालवावा असं आमचं प्रवासांत ठरलं होतं. त्याप्रमाणे मी पुण्यास आल्यावर त्याची व्यवस्था करण्याच्या उद्योगांत होतों तेवढ्यांत, दिवाळी संपतांच मला त्यांचं नागपुराहून एक पत्र आलं. हें पत्र हरिभाऊंनी आपल्या मुलीकडून लिहविलं होतं. पत्रांत त्यांनी म्हटलं होतं, "आपल्या सहवासांत माझे दोन दिवस फार आनंदांत गेले. किंबहुना भांदकला आपण शिलालेखांचे ठसे घेतले तेव्हा मी सारं कांही विसरून गेलों होतों. आपण मराठीच्या अभ्यासाची एक नवीन दिशा मला दाखविली याबद्दल मी आपला ऋणी आहें. मी महानुभावी लिपीचा वर्ग चालविण्यासाठी पुण्यास येईन असं म्हटलं खरं, पण रिधपूराहून आल्यापासून मी पोटांतील कांही विकाराने अगदी निजून आहे. सारी दिवाळी अशीच गेली. मात्र यांतून मी लौकरच बरा होईन आणि पुढील पत्रीं अभ्यासवर्गाच्या कार्यक्रमाविषयी मी आपणांस सविस्तरपणें लिहीन." माणूस एक चिंतितो तर दैव दुसरंच कांही चिंतीत असतें हेंच खरं! कारण हें पत्र आल्यानंतर लौकरच हरिभाऊ वारल्याची बातमी मी वर्तमानपत्रांत वाचली. ती वाचून मी सुन्नच झालों. हरिभाऊ एवढ्यांत जातील असें स्वप्नांतही नव्हतें, कारण रिधपूर–भांदकच्या प्रवासांत त्यांचा काटकपणा आणि कणखरपणा माझ्या चांगला अनुभवास आला होता. तेव्हा क्षणभर हरिभाऊ गेले या बातमीवर माझा विश्वासहि बसेना. पण दोनच दिवसांनी श्री. गोपीराजबुवांचें पत्र आलें. त्यांनी लिहिलें होतें, "चि. हरिभाऊ नेने वारल्याचें ऐकून मनास धक्का बसला. त्यांच्या जाण्याने आमचे सर्व मनोरथ धुळीस मिळाले. त्यांच्यासारखें महानुभाव वाङ्मयाचें संशोधन करणारा दुसरा मिळणार नाही. पण झाल्या गोष्टीस इलाज नाही. आपण यत्न केला पाहिजे. गरुडाचें उड्डाण जमलें नाही तरी होईल तेवढें उडण्यास हरकत कोणती?" गोपीराजबुवांचा हा अभिप्राय मोठा मार्मिक आहे असं मला वाटतं; कारण खरोखरच महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासाचें क्षेत्र हरिभाऊंच्या मृत्यूमुळं पोरकं झालं आहे.

त्यांचा आणि माझा प्रथम परिचय झाला तोहि योगायोगानंच. १९४० सालीं माझा Ph. D. चा प्रबंध लिहून पूर्ण झाला. तेव्हा माझे मार्गदर्शक कै. तात्यासाहेब केळकर मला म्हणाले, "तुम्ही आपलं काम नागपूरकडे नेने किंवा प्रो. कोलते यांच्यासारखे महानुभाव वाङ्मयाचे अभ्यासक आहेत त्यांना दाखवा

आणि त्यांची मान्यता घेऊन या" गुरुवर्यांच्या या सूचनेप्रमाणे मी आपल्या प्रबंधाचें हस्तलिखित बरोबर घेऊन नागपुरास गेलों आणि हरिभाऊंना भेटून येण्याचा उद्देश सांगितला. तेव्हा ते नोकरींत होते. तरीपण दोन-तीन दिवसांत त्यांनी माझ्या प्रबंधांतील महानुभाव वाङ्मयासंबंधीचा भाग काळजीपूर्वक वाचला आणि माझ्याच हातीं तात्यासाहेब केळकरांना एक पत्र दिलें. त्यांत त्यांनी म्हटलं होतं, "श्री. तुळपुळे यांच्या प्रबंधांतील मला समजणारा भाग मी वाचून काढला व त्यांच्याशीं चर्चाहि केली. मी सुचविलेल्या किरकोळ सुधारणा करण्याचें त्यांनी आनंदाने कबूल केलें. एकंदरींत त्यांचें काम मला पूर्णपणे पसंत आहे." सहज विषय निघाला म्हणून सांगतों की प्रो. कोलते यांच्याहिकडे मला हेंच सौजन्य अनुभवास आलें. त्यांनीहि हरिभाऊंच्या इतक्याच मोकळेपणाने आपली मान्यता तात्यासाहेब केळकरांना पत्राने कळविली. दहादा आढेवेढे घेऊन आणि जरतारी भाषा वापरून आपला अभिप्राय मोठ्या कष्टाने नमूद करणारे विद्वान् कोणीकडे, आणि सरळ मनाचे, तेव्हा विशेष प्रसिद्ध नसलेले दोन आस्थेवाईक अभ्यासक कोणीकडे, हा विचार माझ्या मनांत आल्यावाचून राहिला नाही.

असो, हरिभाऊंचें चरित्र तर संपलें. त्यांनी करून ठेवलेलें कार्य मात्र मागे राहिलें व तें चिरकाल राहील. कारण त्यांत हरिभाऊंनी आपली बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता ओतलेली आहे. महानुभाव वाङ्मयाच्या अभ्यासाचा पायाच त्यांनी रचला असें म्हणण्यांत मुळीच अतिशयोक्ति नाही. ते अधिक जगते तर अभ्यासकांना त्यांचा फार मोठा लाभ करून घेता आला असता, खुद्द हरिभाऊंच्या मनाचीहि उभारी फार मोठी होती, पण एक हिंदी संतकवि म्हणतो त्याप्रमाणे 'झूटी मनकी दौर' हेंच शेवटीं खरें. असो, जे मागे राहिले त्यांनी झडझडून अभ्यासाच्या वाटेस लागावें आणि हरिभाऊंच्या ऋणांतून अंशतः तरी उत्तरदायी व्हावें हीच त्यांच्या चरणीं आपली श्रद्धांजली.

तुझ्या अनृत वचनांत—

तुझ्या अनृत वचनांत
आता किती दिन राहूं
परतल्या पाखराची
वाट किती वेळ पाहूं

तुझ्या माझ्या हृदयाचें
गीत उडे वाऱ्यावर
विखुरल्या वाऱ्याला अन्
किती वेळ साथ देऊं

दिन ढळे, सांज झाली
सांज दाटे नयनांत
सांज दाटे हृदयांत
किती वेळ वाट पाहूं

गगनाच्या गाभाऱ्यांत
दिवे प्रकाशले तेजें,
परी माझ्या हृदयांत
अंधःकार किती साहूं

तुझ्या फसव्या प्रतीक्षेंत
आता किती वेळ राहूं ?

श्रीपाद कावळे

अनुक्रमणिका

क वि ता

सुख दुःख

होतें सुख
नाही कशाला म्हणूं
होतें दुःखहि
दुसरें अंगच जणूं
सुख होतें हिरवें हिरवें
हसहसणारें
काळचा काळ्या मातींत उभें
सुख होतें झुळझुळणारें
पाझरणारें
खडकांतुन, स्वच्छ निरागस
सुख होतें कंठांत साखरी
चिवचिवणारें
भय उरांत झाकियलेलें
सुख होतें रंगारंगांतुन
घमघमणारें
काट्यांतुन वेलीवर फुललेलें
सुख होतें पक्व फळांतुन
रसरसलेलें
पिकल्या पर्णफुलांचा जीवनरस प्यालेलें
सुख होतें स्वप्नांत रात्रीच्या
मोहविणारें
तळपत्या उन्हानंतरचें
सुख होतें सुखांतहि
हुरहुरणारें
दुःखांतच लपलेलें छपलेलें
होतें सुख
नाही कशाला म्हणूं
हीतें दुःखहि
दुसरें अंगच जणूं.

—राजा मंगळवेढेकर

अभेटींची भेट

शब्द आणि कृती
खास भेटतील
संकल्प नि सिद्धी
खास जुळतील
धन नी दारिद्र्य
निज हात हातीं
घालून होतील
संसारीं संगातीं
फुलेल फुलेल
जडांत चैतन्य
अवकळेंत ती
कांतीहि वदान्य
स्वर्ग आणि पृथ्वी
एकत्र येतील
संशय–सत्याची
सांगड घडेल
अन्याया खालच्या
मूढ निश्चेष्टाला
पेटवील जाणा
क्रांतीशाली ज्वाला
येणार एकत्र
तम आणि द्युती
जुळतील पोटीं
क्षुधा आणि तृप्ती
अभेटींची भेट
निश्चित घडेल
अभावांत भाव
नवा सापडेल
हताश सुरांच्या
यंत्र–नाविन्याला
कधी उमजेल
आशेचा निर्वाळा ?

--अनन्त आठले

शब्द नको ते

शब्द नको ते वरकरणी
नुसती माझी करण्यासाठी
मनधरणी;
जर असेल उत्कट कांही
तें तसें राहूं दे
अबोल अस्फुट मूक चिरंतन
तुझ्याच अंतःकरणीं–!
तव नयनांतिल सलज्ज आर्जव
आलें कधीच ध्यानीं;
नको तयाला घालूं आता
कृत्रिमतेने शब्द गवसणी.
नकोत मजला मम प्रश्नांचीं
स्पष्ट उत्तरें वा स्पष्ट दुजोरा
तो फक्त असावा तुझिया;
मदीर नेत्रीं
अन् आळसटलेल्या कोमल गात्रीं–!
भाव असावे मानी
अन् अबोल तरीहि शब्दांविण जें
म्हणत असावें अतृप्तीने पाणी पाणी.

—श्रीकान्त सदावर्ते

आडवा छेद

सूक्ष्मदर्शकीं होतों पाहात
गांडूळाचा अडवा छेद
गरगरले परि माथें उलटें
कशाचाहि मग कळे न भेद !
कंठ शोषुनी करिते पोट
"भूक ! भूक !" हें आर्त क्रन्दन !
कंठ शोषुनी बुद्धीही करि
"भूक ! भूक !" हें आर्त क्रन्दन !
वसे उद्याचा हा शास्त्रज्ञ
उरीं लावुनी ध्येयच मग्न
अश्रुबिन्दुमधि विरघळुनी पण
गेलें सारें मृगजळ स्वप्न !
असंख्य भावी शास्त्रज्ञांना
उदर करितसे फक्त कारकुन
बंड पुकारी जर हें मानस
हाय शृंखला टाकी जखडुन !
पिंजऱ्यांतला पंचानन हा
पिसाळलेला असे भयंकर
रक्तशोषका सावधान रे,
चिडलेला हा सर्व जगावर !
—अता जगाचा अडवा छेद
घेइल जइं नरडीचा घोट,
क्रूर सूड हा करील शान्त
माझी बुद्धी, माझें पोट !

—निशिकान्त करकरे

जीवन लहरी

—१—

तव पडदा अलगद मी
उचलोनी पाहियलें
नयनांना वाटे या
रूप तुझें मज दिसलें
तोंच तुझ्या हातांनी
मुखकमलहि झाकोनी
रूपाहून लाज तुझी
दाखविली मजला तूं !

—२—

सहवासीं आज तुझ्या
समाधान लाभावें
हरवलेंहि अंतर जें
न सापडे, न धुंडावे
नच जीवन घडवावें
नच जीवन मिळवावें
समाधान एवढेंच
सहवासीं लाभावें !

—योगेश्वर अभ्यंकर

प्रा. जोगकृत तांबे-काव्यप्रशास्ति (?)

पां. व. गाडगीळ

[मागील अंकावरून पुढे चालू]

केवळ संग्रह प्रसिद्ध होणार या कल्पनेने प्रोत्साहन मिळून काव्यरचना होत नसते. जोग बोवांचे 'ज्योत्स्नागीत' व 'निशागीत' हे दोन काव्यसंग्रह १९२६ व १९२८ सालीं प्रसिद्ध झालेले आहेत. मग या प्रकाशनांमुळे प्रोत्साहन मिळून जोगांनी भरपूर काव्यरचना का केली नाही ? महाराष्ट्र काव्यवाटिकेंत 'निशिगंधा'चा सुवास का दरवळला नाही ? "आज काव्येतिहासामध्ये उल्लेख करण्यापलीकडे त्यांना (काव्यसंग्रहांना) महत्त्व उरलेलें नाही " असें स्वतःच्या काव्यरचनेबद्दल जोगांना उद्‌गार काढावे लागले याचें कारण काय ? पुढील काव्यकर्तृत्वाच्या अभावाचें कारण काय ? आपल्या अंगीं असलेल्या कविप्रतिभेचा पुरापुरा उन्मेष त्यांनी का दाखविला नाही ? प्रतिभेच्या विलासाला पूर्ण 'वाव' मिळाला असतांना जोग महाराजांनी काव्यरचना कां केली नाही ? तांबे यांच्यासारखे अभिजात कवि स्फूर्तीच्या आवेगांत काव्यरचना करीत असतात. महाराष्ट्रांत 'हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता' या कोटींतील कवि बहुत आहेत. जोग म्हणतात की, १९३५ सालीं अखेरचा बहर येऊन तांब्यांनी तीस कविता लिहिल्या. मध्यंतरीं कविता कां लिहिल्या नाहीत, काय कारण घडलें असावें, याचा जोगांना मोठा प्रश्न पडला आहे. कोणत्या वर्षी बहर आला, कोणत्या वर्षी काव्यरचनेच्या दृष्टीने अवर्षण आलें, हें काय काव्यसमीक्षण आहे ? जोगांनी तांब्यांची कुंडली मांडून त्यांच्या काव्याचें परीक्षण केलें नाही हेंच आमचें नशीब !

प्रस्तावनेच्या पंधराव्या छेदकांत जोगांनी असें विधान केलें आहे की, तांब्यांच्या ठिकाणीं 'भोग कुणा सुटले' ही वृत्ति निर्माण होऊन सामाजिक रूढीविरुद्ध बंड करून उठण्याची बुद्धि तांब्यांना झाली नाही. 'भोग कुणा सुटले' या कवितेंत कवीची आस्तिक्यबुद्धि प्रगट झालेली आहे. या आस्तिक्यबुद्धीमुळे व परमेश्वरावरील श्रद्धेमुळे तांब्यांना सामाजिक रूढीविरुद्ध बंड करून उठण्याची बुद्धि झाली नाही असें जोगांना म्हणावयाचें आहे. आस्तिक्यबुद्धीमुळे कवि मवाळ बनला तर त्याने रुद्रास आवाहन केलेंच नसतें आणि केवळ अज्ञेयवादामुळे कोणचाहि कवि बंडखोर झाल्याचें महाराष्ट्रांत तरी उदाहरण दिसत नाही. 'रुद्रास आवाहन' या कवितेसारखी प्रभावी कविता महाराष्ट्रांतील तथाकथित 'बंडखोर' व 'पुरोगामी' कवींनी लिहिली आहे काय ? केशवसुत व त्यांच्या गोत्रांतील मंडळीपैकी कोणीहि इतकी प्रभावी व स्फूर्तिप्रद कविता लिहिलेली नाही. जोगांना 'रुद्रास आवाहन' या कवितेंत तांबे क्रांतीस बोलावीत असल्याचा नुसता भास होतो. जोगांनी मराठींतील क्रांति-गीतांचा निर्देश केला असता तर बरें झालें असतें. मग कोणच्या गीतांत क्रांतीस खरें आवाहन आहे किंवा कोणत्या कवितेंत कवि क्रांतीस बोलावीत असल्याचा भास आहे हें ठरवितां आलें असतें. कांही अत्याधुनिकांना केशवसुतांच्या 'तुतारी' कवितेंत कवीच्या बंडखोरीचा नुसता भासच होतो, कारण शेवटीं

> संप्रति दानव फार माजती
> देवांवर झेंडा मिरविती !
> देवांच्या मदतीस चला तर !

अशी रूढ सुरासुरांच्या संग्रामाची कल्पना आलेली आहे. व तसेंच तांबे यांनी ज्याप्रमाणे 'भोग कुणा सुटले !' असे उद्गार काढले त्याचप्रमाणे केशवसुतांनी

"धिःकार या जगीं इच्छित न मिळे कांही
म्हणुनी तुझे पायीं भिक्षांदेहि"

अशी परमेश्वराची करुणा भाकली आहे. या 'बंडखोर बंबवाल्याने'

देवा दीनानाथा
तुझे पायीं माथा वाहियेला !

असे उद्गार काढले आहेत; तर तांब्यांनी

स्मरूनि हरी वागेल जो तया
भोग असुनि मिटले !

असे उद्गार काढले आहेत. अस्तिक्यबुद्धि ही क्रांतिकारी वृत्तीला मारक आहे असें जोगांना म्हणावयाचें आहे काय ? केशवसुतांच्या बंडखोरीबद्दल तसेंच म्हणतां येइल. तांबे यांनी रूढीभंजन केलें नाही, समतेचा उद्घोष केला नाही, प्रचलित सामाजिक व्यवस्थेविरुद्ध लिहिलें नाही इत्यादि आरोप करणाऱ्या या टीकाकाराला त्यांच्या काव्याचें मर्मच कळलें नाहीं हेंच खरें ! तांबे यांच्या काव्याचा या दृष्टीने विचार करणें म्हणजे त्यांच्या काव्याचें रहस्य विसरणें होय. तांबे हे सौंदर्यवादी कवि होते. त्यांच्या काव्याचें रसग्रहण ज्याला सौंदर्यवाद कळलेला नाही अशा टीकाकाराला करतां येणार नाही. आणि मग जोगांसारखा गृहस्थ कांहीतरी शेरे देत बसतो. 'फार झाल्यास परमेश्वराच्या रुद्ररूपास आवाहन केलें म्हणजे झालें' अशी टवाळी जोगांनी केलेली आहे. अशा तऱ्हेने केशवसुत, माधव ज्यूलियन अथवा कोणच्याहि सन्मान्य कवीबद्दल लिहितां येईल. तांबे यांच्या कवितेचा आत्मा ज्यांना समजला नाही अशा टीकाकारांकडून त्यांच्या काव्याचें रसग्रहण होणें शक्य नाही. तांबे यांच्या काव्याचें मर्म कळण्यास उच्च कोटीची रसिकता अंगीं असावी लागते. ज्यांचा जन्म कवितांची वर्गवारी, कवितांचा कालानुक्रम, कवितांच्या चाली, इत्यादि गोष्टींची जंत्री लिहिण्यांत गेला त्यांना तांबे यांची कविता सहज समजणें शक्य नाही. तांबे यांचे कला आणि काव्य यांजवरील गद्यलेख जोगांनी पुन्हा एकदा वाचल्यास त्यांना तांब्यांच्या काव्याचें व इतकेंच काय कोणच्याहि काव्याचें मर्म कळेल.

जोगांच्या शेवटच्या परिच्छेदाकडे आता वळूं. जोग म्हणतात, "तांबे यांनी मराठी कवितेकरिता काय केलें ? जाणीवपूर्वक कांही नाही." हा संबंध छेदक खोडसाळ, छद्मी भाषेंत लिहिलेला आहे. तो वाचकांनी मूळांतूनच वाचावा. संपूर्ण प्रस्तावनेंत जोगांनी तांबे यांच्या काव्याचें सशास्त्र समीक्षण केलेलें नाही. 'अर्वाचीन मराठी काव्य' या १९४६ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ग्रंथांतील तांबे यांच्या काव्यासंबंधीच्या मतांचेंच पुनरुच्चारण या प्रस्तावनेंत त्यांनी केलेलें आहे. काव्याची मूलगामी टीका करण्याऐवजी मराठी कवितेकरिता कोणी किती केलें याचाच विचार जोगांच्या टीकालेखनांत जास्त दिसतो. तांब्यांच्या काव्याने रसिकांना आनंद होतो तो कां होतो ? तांबे यांच्या काव्यांतील सौंदर्यदर्शन रसिकांना प्रिय कां होतें ? याची कारणमीमांसा करणें हेंच काव्यसमीक्षणाचें उद्दिष्ट आहे. तांब्यांनी 'काव्याकरितां काव्य' लिहिलें, 'स्वतःच्या समाधानार्थ काव्य' लिहिलें व म्हणून मराठी कवितेकरिता जाणीवपूर्वक कांही केलें नाही ही टीका असमंजसपणाची व अज्ञानाची निदर्शक आहे. मराठी कवितेकरितां जाणीवपूर्वक कांही करणें म्हणजे काय ? मराठी कवितेंत अमकें नाही तेव्हा तें मी करणार असें म्हणून कोणी काव्यरचना करतो काय ? मराठी कवितेंत रूढिभंजन नाही तेव्हा तें मी करतों अशा हेतूने केशवसुतांनी कविता लिहिली काय ! मराठी कवितेंत निसर्गप्रेमाची कविता नाही ती मी लिहितों अशा कल्पनेने बालकवींनी कविता लिहिली काय ? मराठी कवितेंत देशभक्तिपर कविता नाही म्हणून विनायकाने कविता केली काय ? मराठी कवितेकरिता कांही तरी प्रयत्नसाध्य केलें पाहिजे म्हणून आजपर्यंत मराठी कवींनी कविता लिहिली काय ? काव्याने सुधारणा होते या मतावर तांब्यांचा विश्वास नव्हता. हेतुपुरस्सर काव्य तांब्यांनी लिहिलें नाही. तांब्यांसारख्या सौंदर्यवादी कवीच्या काव्याचें परीक्षण करतांना निराळेच निकष लावावे लागतात. तांब्यांच्या कवितेचा आत्मा समजण्यास तांब्यांसारखें सौंदर्यवादी मन पाहिजे. तांब्यांची सौंदर्यानुभूति समजण्यास त्यांच्यासारखेंच तरल, संवेदनाक्षम मन पाहिजे. आणि म्हणूनच तांबे

(पुढील मजकूर पान २८ वर)

बा रा ब्बा स

रा. वि. काळी

पार लेगरक्विस्ट (Par Lagerkvist) नामक स्वीडिश औपन्यासिकाची ही एक कलाकृति असून या कादंबरीला १९५१ सालीं नोबेल पारितोषक मिळालें आहे. लेखकाचा जन्म दक्षिण स्वीडनमध्ये १८९१ मध्ये झाला. त्याची बाराब्बास (Barabbas) कादंबरी १९५० मध्ये प्रकाशित झाली व पुढच्याच वर्षी तिला नोबेल प्राइझ मिळालें. यावरून व या कादंबरीचें आतापर्यंत आठ युरोपीय भाषांत अनुवाद झाले आहेत म्हणून तिचें साहित्यांतील स्थान महत्त्वाचें आहे.

कादंबरीचें कथानक

बाराब्बासचा जन्म समाजाच्या तळांतील गाळांत झाला. लुटारूंनी एका स्त्रीचें रस्त्यांत अपहरण केलें. त्यानंतर झालेल्या अवैध संभोगांतून, व्यभिचाराच्या कर्दमांत त्याचा जन्म झाला. बाराब्बासचा जन्मदाता कोण हें त्याला, त्याच्या आईला किंवा त्याच्या जन्मदात्यालाहि अवगत नव्हतें. त्याच्या , आसन्नप्रसवा मातेला वेश्यागृहांतून हाकून लावलें तेव्हा रस्त्याने चालतां चालतां बाराब्बासचा जन्म व तिचा मृत्यु एकदमच झाला. अशा जघन्य व निकृष्ट श्रेणींत जन्मलेला बाराब्बास पुनश्च लुटारूंच्या टोळींत शिरून तोच धंदा करूं लागला. तेथे त्याचें एलियाहु (Eliahu) नामक एका म्हाताऱ्या लुटारूशीं भांडण झालें. एलियाहुने बाराब्बासवर शस्त्राचा आघात केला तो नेमका त्याच्या डोळ्याखाली लागून बाराब्बास कायमचा कुरूप झाला. त्याच भांडणांत बाराब्बासने म्हाताऱ्या एलियाहूला पर्वत–गुहेंतून खाली फेकून दिलें. एलियाहू तात्काल गतप्राण झाला. हा एलियाहूच बाराब्बासचा जन्मदाता होय. जन्मापासून असें निर्घृण जीवन जगत आल्यामुळे त्याच्या मनोवाटिकेंत कोमल भावनांचा अंकुरच रुजूं शकला नाही, उलट समाजाविरुद्ध विद्रोह, ईश्वराविषयी विद्वेष इ. कालभुजंग त्याच्या मनांत सळसळूं लागले. दऱ्याखोऱ्यांत, वनाजंगलांत लूटमार, डाके, नरहत्या, स्त्रीहत्या करतां करतां तो पकडला गेला व त्याला मृत्युदण्डाची शिक्षा झाली.

त्याच सुमारास रोम सरकारने येशु ख्रिस्ताला क्रूसावर चढवून जीवें मारण्याची शिक्षा दिली तेव्हा तत्कालीन निर्बंधानुसार त्याच्या बदलीं बाराब्बासला बंधमुक्त करण्यांत आलें. अनपेक्षित व अचानक सुटका झाल्यामुळे बाराब्बास एकदम चमकला ! आपल्या ऐवजीं होणाऱ्या येशूचें क्रूस–मरण त्याने चोरून व लपून अवलोकन केलें. तें सारें दृश्यच त्याला पहायला मिळालें. डोक्यावर क्रूस घेऊन वध्य–भूमीकडे जातां जातां येशू रस्त्यांत मूच्छित पडला, त्याच्यावरोबर जात असलेली त्याची आई कुमारी मेरी व इतर दोन-तीन स्त्रियाहि Golgotha वध्यभूमींत येत होत्या–तेव्हाचा मेरीचा चेहरा–सारें सारें त्याने न्याहाळलें. येशूला क्रूसावर लटकवून रोमन काराधिकारी जवळच बेदरकारपणे खेळायला बसले, थोड्या वेळांत येशूचें मस्तक मोडून त्याच्या छातीवर पडलें, त्या प्रसंगीं त्याला जी भयंकर यातना झाली असेल याचा विचार मनांत येऊन, मेरीच्या मुखावरील भाव पाहून बाराब्बासचें अंतःकरण थरारलें. अन्तसमयीं प्रखर उन्हामुळे येशूला तहान लागली. तेव्हा अधिकाऱ्यांनी एका काठीला ओल्या स्पंजाचा तुकडा बांधून तो त्याच्या तोंडांत कोंबला. त्याला दारूचा वास येत होता म्हणून येशूनें तोंड वळविलें तेव्हा ते निर्दय अधिकारी हो हो करून खिदळले ! सारेंच दृश्य निर्मम होतें ! एकाएकीं भर दुपारीं गाढ अंधःकार पसरला, सूर्याचें तोंड काळवण्डून गेलें आणि येशूने प्राणत्याग केला. त्यानंतर एकदम प्रकाश उजळला, झाडाझाडांवरून पाखरें किलबिलूं

लागली! चाण्डालांनी येशूचा मृतदेह क्रूसावरून खाली उतरवला, जवळच एक खड्डा खणून त्यांत फेकून दिला व वर एक धोंडा आदळून तो खड्डा बंद केला!

लपून बाराब्बासने हें सारें दृश्य पाहिलें. आपल्या बदलीं येशूच्या वाटचाला आलेल्या यातना आपल्याला भोगाव्या लागल्या असत्या–त्या सर्व यातना त्याने डोळयाने पाहिल्या व मनाने अनुभविल्या. या घटना–दृश्यामुळे त्याच्या मनावर कसाकसा परिणाम होत गेला याचें हृदयंगम व हळुवार वर्णन या कादंबरींत लेखकाने केलें आहे. आस्ते आस्ते बाराब्बास त्या वध-स्तंभापासून परतला. यानंतर मदिरामदिराक्षीच्या सह-वासांत तो काल कण्ठूं लागला. तरी एक प्रकारची अपरिचित विमनस्कता त्याला मधून मधून ग्रासूं व व्यापूं लागली. वरील घटनेनंतर तिसऱ्या दिवशीं तो पुनः वधस्थलीं गेला. त्या दिवशीं येशु कबर–स्थानां-तून उठून स्वर्गांत प्रवेश करणार हें त्याने ऐकलें होतें. तें पाहण्याकरितां तो तेथें आला. तेव्हा एका ओठ तुटक्या स्त्रीची व त्याची भेट झाली. ती तेथें धुळींत बसलेली त्याला दिसली. कबरीजवळ जाऊन त्याने पाहिलें. कबरीवरील धोंडा बाजूला सरला होता व आंत येशूचा मृतदेह नव्हता. पण येशूला कबरींतून बाहेर निघतांना त्याने कांही पाहिलें नाही. ओठ-तुटी स्त्री म्हणाली पण मी त्याला बाहेर निघतांना पाहिलें. ज्वालामय आवरण घेऊन एक देवदूत हातांत शस्त्र घेऊन स्वर्गांतून अवतरला, त्याने त्या शस्त्राने धोंडा बाजूला सारून येशूचा मृतदेह उचलून तो स्वर्गांत चालता झाला असें ती सांगूं लागली. बाराब्बास विमूढ व अवाक् झाला. येशूचें महाप्रस्थान त्या स्त्रीला दिसलें व मला का दिसलें नाही याचा तो विचार करूं लागला. आत्मपरीक्षणानंतर त्याला वाटलें येशूच्या महाप्रस्था-नावर विश्वास ठेवून आपण आलों नाही–फक्त त्याचें महाप्रस्थान होणार की नाही हें पडताळण्याकरिता आपण आलों. पण ती स्त्री त्या घटनेवर विश्वास ठेवून आली–तिच्या भावनापूत व विश्वास्य दृष्टीला येशूचें महाप्रस्थान अगोचर राहिलें नाही–असें त्याला वाटलें. येथून बाराब्बासच्या मानसिक परिवर्तनाला प्रारंभ झाला. वास्तवतेंतून तो भावनेच्या व विश्वासाच्या प्रांगणांत हळूहळ पदार्पण करूं लागला. त्याने तिला विचारलें–येशूला तूं ईश्वराचा पुत्र समजतेस, तर त्याच्या कोणत्या उपदेशाचें तूं पालन करितेस? तिनें जमिनीकडे अधोवीक्षण करून उत्तर दिलें–पारस्परिक प्रीतिभाव–माणुसकी! साऱ्या जन्मांत लूटमार, खून–खराबी करण्यांत सरावलेल्या बाराब्बासला परस्पर बन्धुभाव, प्रीति हा एक नवीनच संदेश वाटला. ज्या येशूने त्याच्या बदलीं प्राणदान केलें त्याने हा संदेश दिला होता! त्या संदेशाची सत्यता तो नाकारूं शकला नाही. यानंतर त्याची लाझारस (Lazaras) शीं भेट झाली. लाझारस म्हणाला–मृत्यूनंतर मी कबरींत होतों तेव्हा प्रभु येशुख्रिस्त पुनश्च मृत्युलोकांत आला व त्याने मला जीवदान दिलें. क्रूसावर मेलेला येशुख्रिस्त उठून स्वर्गांत गेला एवढेंच नव्हे तर तो मेल्या माण-साला संजीवित करतो हें ऐकून त्याला खरें वाटेना!

येथून बाराब्बासच्या चरित्रांत हळूहळू परिवर्तन सुरू झालें!

रोमच्या एका नागरिकाने त्या कर्तितोष्ठ (Hare-lip) स्त्रीविरुद्ध सरकारांत फिर्याद गुदरली. येशूला ईश्वरपुत्र संबोधून त्याच्या महाप्रस्थानाचा प्रचार करून ती (प्रचलित) धर्माचा द्रोह करीत आहे, तिला मृत्यु-दण्ड द्या अशी त्याने मागणी केली. न्यायालयांत तिनें या आरोपाची कबुली दिली तेव्हा एका खड्डयांत ढकलून तिला दगडांनी मारण्याची शिक्षा अधिकाऱ्यांनी फर्मा-विली. एका इसमाने दगड मारून तिचा कपाळमोक्ष केला. बाराब्बास जवळच अज्ञातपणे पहात होता. त्याने तावडतोब दगड मारणाऱ्या व्यक्तीस कण्ठस्नान घातलें. 'तो पहा–तो पहा–तो मला दिसतो' असें भक्तिभावानें उद्‌गारीत, जणूं काय कोणाच्या तरी पोषाखाचें चुंबन घेण्याचा आविर्भाव करीत, त्या स्त्रीने प्राण सोडला. रात्रीच्या गडद अंधःकारांतून, दगडांच्या ढिगांतून तिचा मृतदेह उचलला व आपल्या बलिष्ठ बाहूंत धरून तो पहाड, अरण्य, वाळवंट तुडवीत तुडवीत तिला घेऊन तिच्या जन्मस्थानीं आला. त्या ठिकाणीं तिने जन्म दिलेल्या जन्म–मृत मुलाची कबर होती. त्या कबरींत त्या मुलाशेजारीं त्याने तिला निजविलें व संशयात्म्या–प्रमाणे तो मनाला विचारूं लागला—मृताला संजीवित

करणारा तिचा प्रभु–येशुख्रिस्त त्या स्त्रीच्या रक्षणाकरिता धावून का आला नाही ?

यानंतर पुनः तो लूटमारीच्या धंद्याला लागला व पकडला गेला तेव्हा त्याला गुलाम म्हणून एका तांब्याच्या खाणींत राबायला पाठविण्यांत आलें. त्या खाणीच्या गभीर गव्हरांत बाराब्बास साहाक नामक दुसऱ्या गुलामाबरोबर राबूं लागला. दोघांनाहि एकाच साखळीनें बांधण्यांत येई, दोघेहि एकत्र खात, पीत, काम करीत व निजत. बोलतां बोलतां, बाराब्बासला येशूचा साक्षात्कार झाला आहे, असा साहाकला विश्वास वाटूं लागला. अशा पुण्यवंताबरोबर आपण आहोंत या भावनेने त्याला खाणींतील कष्टमय जीवन दुःसह वाटेनासें झालें. एकदा तो देवाची प्रार्थना करायला बसला तेव्हा नवीनच बदलून आलेला मजुरांचा मुकद्दम तेथें आला व तूं कोणाची प्रार्थना करीत आहेस ? तुझ्या प्रभूचें नांव काय ? तो प्रभु काय करतो ? इ. प्रश्न साहाकला विचारूं लागला. त्या सुमारास शेतमजुरीकरिता एक गुलाम पाठविण्याची त्या मुकद्दमाला गरज भासली. तेव्हा त्याने साहाकला शेतावर काम करायला जाण्यासाठी विचारलें. साहाक म्हणाला, 'मी एकटा जात नाही. मी ज्याच्या बरोबर एकत्र राहातों, खातों, पितों, काम करितों त्या बाराब्बासलाहि या खाईंतल्या नरकांतून मुक्त कराल व शेतीवर पाठवाल तर मी जातों.' त्याचें सौहार्द–गुलामांत आढळून न येणारी बंधुता–पाहून मुकद्दम विस्मित झाला. नंतर साहाक व बाराब्बास शेतावर काम करूं लागले. या उपकाराबद्दल बाराब्बासने साहाकचे आभार मानले तेव्हा साहाक म्हणाला, 'ईश्वरपुत्र येशूने तुझी मुक्तता–उद्धार – केला आहे.' बाराब्बास श्रद्धेच्या आवर्तांत गिरक्या खाऊं लागला.

शेतावरील मजुरांत एक भोकणा (एकचक्षु) गुलाम होता. त्याला साहाकने येशूचें महत्त्व, त्याची दयाशीलता याचें सरळ मनाने विवरण केलें व स्वतःच्या गळ्यांतील बिल्ला दाखविला. त्या बिल्ल्यावर एका बाजूने 'सीजर' चें व दुसऱ्या बाजूने येशूचें (Christos Jesus) नांव लिहिले होतें. त्या भोकण्यानें चुगली केल्यावर रोमच्या अधिकाऱ्यानें साहाक व बाराब्बास दोघांनाहि बोलावून विचारलें–तुमचा प्रभु सीजर की येशु ? साहाक उत्तरला–'येशु'. त्याबरोबर त्याला प्राणदण्डाची शिक्षा देऊन क्रुसावर मारण्यांत आलें. बाराब्बास म्हणाला–माझा येशूवर विश्वास नाही. माझा कोणी प्रभु वा ईश्वर नाही. अधिकाऱ्याने खुष होऊन बाराब्बासला आपल्या खास तैनातींतील गुलामांत भरती केलें व त्याच्या बिल्ल्यावरील येशूचें नांव तरवारीनें खरवडून टाकलें. बाराब्बासने साहाकचाहि अंत चोरून व व्यथित अंतःकरणाने अवलोकन केला. तेव्हा तो पहिल्यांदाच त्या वध्यभूमींत ईश्वराची प्रार्थना करूं लागला व हाताने तोंड झाकून मनसोक्त रडला.

अधिकाऱ्याच्या तैनातींत बाराब्बासला शारीरिक कष्ट विशेष झाले नाहीत पण त्याच्या मनाला शांति नव्हती. खरवडलेल्या येशूच्या नांवाचा बिल्ला त्याला तापलेल्या लोखंडाप्रमाणे चटके देऊं लागला. रात्रीच्या काळ्याकभिन्न अंधारांत कोणी तरी त्याच्याशीं प्रार्थना करीत आहे असा भास होत होता. कोणी त्याला विचारीत होतें–'तूं कोणाकरिता प्रार्थना करतोस ? त्याने ऐकलें–तुझ्याच करिता ! या सुमारास सीजरने ख्रिस्त्यांव जादुटोण्याचा (Witchcraft) आरोप लादून अनन्वित अत्याचार आरंभिले. ख्रिस्त्यांना एकमेकांना भेटणें व उघडपणे प्रार्थना करणें अवघड झालें. एके दिवशीं गुलामांच्या संभाषणावरून बाराब्बासला समजलें की मार्कस ल्यूसियसच्या द्राक्षांच्या मळ्यांतल्या यहुद्यांच्या कबरस्थानांत (Catacomb) ख्रिस्त्यांची भूमिगत सभा भरणार आहे. त्या सभेला तो त्या अंधाऱ्या रात्रीं बुरखा घेऊन गेला. वाटेंत एका धनगराने त्याला सभेची जागा दाखविली. तेथें त्याला प्रथम एक प्रकाशाचा स्रोत दिसला पण लगेच अंधार पसरला. चारी बाजूला त्यानें कानोसा घेतला पण त्याला तेथे चिटपाखरूं आढळलें नाही. सभोवार कबरी व त्यांत मृतदेह निजले होते ! हे मृतदेह केव्हा तरी संजीवित होतील ही गोष्टहि त्याच्या मनांतून पार नाहीशी झाली होती. बराच वेळ वाट पाहून श्रान्त देहाने व क्लांत मनानें तो बाहेर पडून चालूं लागला. ख्रिस्त्यांची सभा कां भरली नाही याचा तो विचार

करीत होता. तोंच त्याला रस्त्यांत 'आग' 'आग' असा गलका ऐकूं आला. लगेच 'ख्रिस्ती' 'ख्रिस्ती' असा आवाज त्याने ऐकला. त्याला वाटलें, 'ख्रिस्त्यां'चा प्रभु अवतीर्ण होऊन जुन्या विश्वाचा संहार करीत आहे, नवीन सृष्टि निर्माण करीत आहे. त्या कार्याला हातभार लावणें कर्तव्य समजून एक पेटती चूड हातीं घेऊन तो घराघराला आग लावूं लागला.

वास्तविक हें आगीचें षड्यन्त्र रोमन अधिकाऱ्यांनीच रचिलें होतें. आगीचा आरोप लादून ख्रिस्त्यांना निर्वासित करण्याचा सीजरचा उद्देश होता. त्यानें साऱ्या ख्रिस्त्यांना पकडलें. त्यांत बाराब्बासहि पकडला गेला. या षड्यंत्राची बातमी आगाऊच लागल्यामुळे ख्रिस्त्यांनी सभाच भरविली नव्हती. ते म्हणूं लागले—हा आमच्यावर वृथा आरोप आहे. घरादारांना आग लावण्याचा येशूचा संदेश नाही—ते कधीहि असें करणार नाहीत. पण बाराब्बासनें प्रांजलपणानें तो आरोप स्वीकारला. त्याबरोबर ख्रिस्त्यांनी त्याला नाकारलें. तो ख्रिस्ती नव्हे असें ते म्हणूं लागले. त्यांनी त्याच्या गळ्यांतील बिल्ला तपासला—तेव्हा त्याच्यावर खरवडलेलें येशु ख्रिस्ताचें नांव त्यांना आढळलें. बाराब्बासला व ख्रिस्त्यांना क्रूसावर चढवून मारण्याची शिक्षा झाली. बाराब्बास सगळ्यांच्या अखेरीस एकटाच क्रूसावर चढला आणि मरणापूर्वी सभोवारच्या अंधःकाराला उद्देशून म्हणाला—'तुझ्याकरिता व तुझ्यासमीप मी आत्मसमर्पण करीत आहें !'

व येथेंच या कादंबरीचा शेवट झाला आहे.

ऑंद्रे जीद (Andre Gide) ची प्रस्तावना

सुविख्यात फ्रेंच मनीषी ऑंद्रे जीद यानें या अभिनव कादंबरीला प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेंतील त्याचा पुढील अभिप्राय सूचक आहे—

"It is the measure of Lagerkvist's success that he has managed so admirably to maintain his balance on a tight rope which stretches across the dark abyss lying between the world of Reality and the world of Faith."

'वास्तववाद व श्रद्धावाद या दोहोंमध्ये जी एक अंधःकारमय दरी पसरली आहे त्यावरील तारेची कसरत करतांना लेगरक्विस्टनें असामान्य तोल सांभाळला आहे व यांतच त्याच्या कुशलतेची यशो-संपदा आहे.'

जीदचा भावार्थ असा दिसतो की जगांत वास्तवतेबरोबरच श्रद्धाशीलता ही असतेच. वास्तवता (Reality) केव्हा तरी नष्ट होणारच—ती नश्वर आहे. श्रद्धाशीलता हें ईश्वराचें राज्य आहे. या राज्यांत प्रवेश करायला भगवंतावरील विश्वासाचें व श्रद्धेचें पाथेय हवें. ईश्वर पार्थिव वस्तूंप्रमाणे इंद्रियगोचर नाही म्हणून श्रद्धेनेच त्याचा मागोवा काढतां येणें शक्य आहे. श्रद्धेनेच ईश्वर जाणतां येईल व ज्ञानदीप उजळेल. बाराब्बासप्रमाणे मानव वास्तववादी व संशयात्मा आहे. तो नास्तिक (Agnostic) आहे. येशू, कर्तितोष्ठ रमणी, साहाक यांचे हृदयविदारक मृत्यु पाहूनहि बाराब्बासच्या हृदयांत श्रद्धेचा व विश्वासाचा उदय झाला नाही. तो कठोर वास्तववादीच राहिला. लाझारसचा पारस्परिक प्रीतीचा संदेश मिळाल्यानंतरहि तो अविचलित राहिला. बंधुभावाचा संदेश जर खरा आहे तर ज्या येशूवर ती रमणी भक्ति करीत होती व ज्याच्या खातर तिने आत्मोत्सर्ग केला, त्या येशूनें स्वतः येऊन तिला का वाचविलें नाही ? तें त्याला शक्य नव्हतें काय ? एक गोष्ट मात्र त्याच्या अंतःकरणांत खोल रुजली—येशू, रमणी, साहाक यांनी वेगवेगळ्या परिस्थितींत आत्मयज्ञ केला; ते सर्व परस्परांवर प्रीति करीत होते. त्यांच्यांत बंधुभाव होता, म्हणूनच भगवंतावरील नितान्त प्रीतीमुळे-श्रद्धेमुळे त्यांनी हास्यमुखानें मृत्यूला आलिंगन दिलें. वास्तवतेंतून श्रद्धाशीलतेकडे ऊर्ध्व-गमन हेंच बाराब्बासच्या कथेचें सार आहे ! बाराब्बास पूर्णतया श्रद्धाशील झाला की नाही, येशूला त्यानें जाणलें की नाही, की नास्तिक्यांतच त्याचा अंत झाला याचा खुलासा न करतांच लेगरक्विस्टने या समस्यामूलक कथानकाचा शेवट केला आहे !

× × ×

आंद्रे जीद पूर्वी कम्युनिस्ट मतांचे होते. त्यांच्या मतांत आता परिवर्तन होऊन ते पक्के कम्युनिस्ट–विरोधी झाले आहेत. पूर्वाश्रमींच्या कम्युनिस्टांचें मत-परिवर्तन व कम्युनिस्ट–विरोधहि आताशा दैनंदिन घटना होऊन बसली आहे. हिंदुस्थानांतहि अशा रंग पालटणाऱ्या सरड्यांचा दुष्काळ नाही. महाराष्ट्रांत प्रभाकर पाध्ये, पु. य. देशपांडे, गाडगीळ आदि विद्वान दहापंधरा वर्षांपूर्वी ज्या कम्युनिझमचा हिरीरीनें प्रचार करीत होते ते आता त्याचे कट्टर शत्रु झाले असून त्यांनी आता जणूं काय कम्युनिस्ट विरोधी अभेद्य व एकजुटीची आघाडीच उघडली आहे. हें मतपरिवर्तन प्रगति की परागतीचें द्योतक आहे, क्रांति की प्रतिक्रांतीचें सूचक आहे याचा अजमास करतां येत नाही. सध्याच्या जगांत कम्युनिझमने अक्राळविक्राळ रूप व शक्ति धारण केल्यामुळे त्याने परंपरागत जगाला राजनीतींत व राजकारणांत जबरदस्त हादरा दिला आहे. कम्युनिझम–मतपरिवर्तनाचीं कारणें राजकीय परिस्थितींत व पलायनवादाच्या उदरीं असतील तर या मतपरिवर्तनाला भीरुतेचा व अप्रामाणिकतेचा वास येतो. कम्युनिझममुळे अंतहीन अशी एक डिक्टेटरशिप निर्माण झाली असून सत्तास्पर्धेमुळे ती एका विशिष्ठ वर्गाची–विशेषतः (Intelligentia) ची मिरास झाली आहे. या स्पर्धेत आपण मागे पडूं की काय या संदेहामुळे हें परिवर्तन झालें असावें अशीहि एक शंका मनाला वाटून जाते! कसेंहि असलें तरी राजकीय क्षेत्रांतील कम्युनिझम–विरोध प्रगतिवादी नसला तरी आकलनीय आहे. पण हे कम्युनिस्ट विरोधक जेव्हा बुद्धिवादांतहि मतपरिवर्तन करून अस्सल सनातन्यांनाहि लाजविणारी, श्रद्धा, ईश्वर, गानवता, वेदांत अशी भाषा बोलूं लागतात तेव्हा मात्र ही खास पुच्छप्रगतिच आहे, वयोमानाप्रमाणें वाढणारी मानसिक विकलता आहे असें वाटूं लागतें !

बुद्धिवाद हा कम्युनिझमच्या पाठीचा कणा आहे. इतर राजकीय सिद्धान्त कसेहि असले तरी कम्युनिझमचा हा गुण अभिलषणीय आहे यांत संशय नाही. तेव्हा बुद्धिवादाला व ज्ञानमार्गाला डावलून निव्वळ श्रद्धेंत गुरफटून जाणें, वेदांताच्या भोवऱ्यांत गरगरणें, ईश्वराच्या अज्ञात स्वरूपांत विलीन होण्यासाठी धडपडणें बुद्धिवादाचा अधःपात होय. आज पाश्चिमात्य जगांत बुद्धिवादाविरुद्ध अशीच प्रतिक्रिया झाली आहे आणि विल ड्यूरंट, जी. डी. एच. कोल, आंद्रे जीद, लेगरव्हिस्ट आदि प्रज्ञावंत बुद्धिवाद व श्रद्धावाद यांच्या जोडरस्त्यावर (Cross Road) किंकर्तव्यमूढ होऊन उभे आहेत, अध्यात्मवादाकडे दृष्टि लावून बसले आहेत, अंधारांत चांचपडत आहेत, 'अंधेनैव नीयमाना यथान्धाः' असे मागे पुढे सरकत आहेत ! धड बुद्धिवादहि नाही, धड श्रद्धावादहि नाही अशा 'न ययौ न तस्थौ' दोलायमान अवस्थेंत पाश्चिमात्य जग आहे. म्हणून बाराब्बासचें चित्रण करण्यांत लेगरव्हिस्ट यशस्वी झाला नाही असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें ! बरेच प्रश्न व बरींच कोडीं त्याला उलगडतां आलीं नाहीत. मनःपटाचें व मानसिक व्यापाराचें चित्रण करीत करीत तो बाराब्बासच्या अंतापर्यंत आला व प्रश्न न सोडवितां 'तदेकं वद' म्हणून कुंठित झाला.

हिंदूंनी ही समस्या केव्हाच सोडविली आहे. बुद्धिवाद की श्रद्धावाद या प्रश्नाचें त्यांनी अगोदरच उत्तर दिलें आहे. त्यांनी दोहोंचा सुंदर समन्वय साधला आहे.

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'

असा त्यांनी निर्वाळा दिला आहे. त्याचप्रमाणे

'श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः
— तेया एकवटलेया प्रेमा ।
जरि पाडें पाहिजे उपमा ।
तरि मी देह तो आत्मा ।
हेंचि होये । '

असें खणखणीत बजावलें आहे. येशूवरील नितान्त भक्तीसाठी प्राणार्पण करणाऱ्या कांतितोष्ठ रमणीला वाचविण्याकरिता येशु ख्रिस्त धाऊन का आला नाही ? पण त्याचें उत्तर हिंदूंनी

गजेंद्राचे हाकेसरिसे । धांवुनिया आलें
प्रल्हादाच्या भावार्थासि । स्तंभीं गुरगुरलें

असें अगोदरच देऊन ठेवलें आहे. एकान्तिकता, निष्ठा, भक्ति, कृच्छ्रसाधन करून निष्काम श्रद्धा ठेवणाऱ्या

भक्ताला भगवान कधीहि अंतर देत नाही ही शिकवण गीतोपनिषदांनी जी दिली आहे ती सामान्य हिंदूंच्या हाडींमासीं खिळलीं आहे. आणि त्याच प्रश्नाचा पाश्चिमात्यांना उकल होत नाही ? ते अजून अंधारांत चाचपडत आहेत. बुद्धिवान श्रद्धावाद ह्या परत टिकिटाचा प्रवास करणाऱ्या पाश्चिमात्यांना व त्यांचें अनुकरण करणाऱ्या आमच्यांतील अर्धवटांना तुकारामादि अशिक्षित संतांनी केव्हांच या समस्येचें उत्तर दिलें आहे.

× × ×

लेगरव्हिस्टची कादंबरी साहित्यिक गुणांमुळें पुरस्कार-योग्य झाली असें नाही. त्याची रचनाशैली साधारण आहे. संवाद-कथन सामान्य आहे. परंतु गांभीर्य व मानसिक परिवर्तनाचें सुंदर चित्रण यांमुळें त्याची कृति अव्वल दर्जाची झाली आहे. त्याकरिता वाचकांनी ती एकदा तरी अवश्य वाचावी.

प्रा. जोगकृत तांबे-काव्यप्रशस्ति (?)

(पान २२ वरून)

यांच्या काव्यांतील सौंदर्याचें दर्शन करून देण्यास त्यांच्यासारखाच सौंदर्यवादी रसिक टीकाकार पाहिजे. तांबे यांनी समाजसुधारणेसाठी कांही लिहिलें नाही व म्हणून मराठी कवितेकरिता कांही जाणीवपूर्वक केलें नाही अशी त्यांच्यावर टीका करणें अरसिकतेचें लक्षण आहे. खऱ्या रसिकाचें कार्य म्हणजे काव्यांतील आनंदाचा अनुभव घेणें होय. तांब्यांनी सामाजिक सुधारणेसाठी कविता लिहिली नाही म्हणून त्यांना दोष देणें, केशवसुतांनी राजकीय जागृतीसाठी कविता लिहिली नाही म्हणून त्यांचा निषेध करणें ही काव्यालोचनाची पद्धत सर्वथैव चुकीची आहे. तांबे यांनी मराठी कवितेंत आपल्या सहजसुंदर काव्याने मोलाची भर टाकली आहे. जगांतील सौंदर्याचा, उदात्ततेचा आपल्या कवनांतून जयजयकार करणाऱ्या या तेजस्वी कवीने मराठी कवितेला 'मधुघटां'ची देणगी दिलेली आहे. जगांतील सुंदर विषयांचें चिंतन करून 'सौंदर्याचें' तत्त्व जाणून त्यांनी सौंदर्यस्तोत्रें लिहिलीं आहेत. जगांतील उदात्त व रम्य गोष्टींनी त्यांचें कविमन उल्हसित होत असे आणि म्हणूनच उदात्त विषयावर त्यांनी आपली कविता रचली आहे. शिशुगीतें आणि प्रेमगीतें त्यांनी गायिलीं आहेत. लोकमान्यांचें व महात्म्यांचें त्यांनी स्तवन केलें आहे, आणि प्रभूची आरती गायिली आहे. आपल्या रुचिर काव्यसंपदेने मराठी कवितेला संपन्न केलें आहे.

परंतु जोगांसारख्या दूषित काव्यदृष्टीच्या टीकाकाराला त्यांच्या काव्यांतील गुणविशेषांचें आकलन होत नाही आणि मग ते तांब्यांच्या काव्यावर भलतेसलते आरोप करूं लागतात. महाराष्ट्रांत स्वतःवर झालेली टीका विसरणारे फारच थोडे गृहस्थ आढळतात. तांब्यांनी जोगांना मम्मट कळला नाही म्हणून टीका केली होती, ती टीका जोग आजतागायत विसरलेले दिसत नाहीत. तांब्यांनी केलेल्या टीकेचा सूड म्हणूनच की काय, जोगांनी ही खोडसाळ प्रस्तावना लिहिली आहे. परंतु या प्रस्तावनेमुळे जाणत्या रसिकांचें तांबे यांच्या काव्यासंबंधी प्रतिकूल मत होत नाही, उलट जोगांचेंच हसूं होतें. ही प्रस्तावना वाचून जोग मराठी टीकावाङ्मयांत जी जाणीवपूर्वक भर टाकीत आहेत व मराठी वाङ्मयाकरिता जें जाणीवपूर्वक कार्य करीत आहेत त्याची कीव करावीशी वाटते. असो, या लेखांत एकादा अधिक उणा शब्द पडला असल्यास प्रा. जोग आम्हांला क्षमा करतील व दुर्मतध्वंसनाचें जें जाणीवपूर्वक कार्य आम्ही करीत आहों त्याला शुभाशीर्वाद देतील अशी आम्हांस आशा आहे.

माझे नाट्यकलाविषयक अनुभव

अनसूया वाडेगांवकर

दहा बारा वर्षांपूर्वी पुरुष-मंडळींबरोबर नाटकांत कामें करण्यास आम्हां स्त्रियांना फार भीति वाटत असे. प्रथमतः मला सुद्धा भीति वाटत असे पण ती एकच नव्हे, अनेक प्रकारची होती. घरचीं माणसें काय म्हणतील, शेजारीपाजारी काय कुजबुजतील, नाटकांत ज्यांच्याबरोबर कामें करायचीं त्या इतर पुरुष-मंडळींची वागणूक कशी असेल, रंगभूमीवर नाटकांतील आपला प्रवेश सुरू होतांच प्रेक्षक मंडळी आपला बोजवारा उडवतील की काय, अशा एक ना हजार शंका मनांत येत असत. आतां आज मात्र मी म्हणूं शकते की, ही सारी भीति जितकी बाळगावी तितकी वाढतच जाते. गृहिणी जर अडीच तीन महिने, दररोज संध्याकाळीं, सहा ते आठ नाटकाच्या तालमीला जाऊं लागली, तर घरच्या सूज्ञ माणसांचीं सुद्धा डोकीं बिघडायची वेळ येते. नाटकाच्या तालमींतला अर्धा पाऊण तासाचा उशीर तर जमेसहि घरतां येत नाही, हें वक्तशीर काम करणाऱ्यांना कधीच पटायचें नाही. बरें, रात्रीं साडे आठ नऊच्या सुमारास मैल दीड मैल रिक्षावाल्याच्या भरवशावर एकटीने जाण्याइतकी हिंमत माझ्यामध्ये होती, असें नाही. रस्ता रहदारी नसलेला आणि अंधाराचा. कुठे कुणी दोघे, चौघे आडव्या रस्त्याने पुढे आले तर, आपल्यावरच हल्ला होतो की, काय असें वाटायचें. तालीम लवकर संपवावी म्हटलें तरी तेंहि कठीणच. जरा कुठे कामाला रंग चढतो न चढतो तोंच बंद करायची वेळ! अशा रीतीने घरची, दारची आणि स्वतःच्या मनांतील भीति बाळगून माझ्या नाटकाच्या तालमी होत असत.

आता दुसरी भीति म्हणजे शेजाऱ्या पाजाऱ्यांची! त्यांना वाटतें की, दोन दोन महिने कसल्या आल्या आहेत तालमी! बसत असतील चहा, चिवडा खात झालें! कुठेतरी क्लबमध्ये जाऊन गप्पा मारायच्या, पत्ते खेळायचे, त्याऐवजीं नाट्यमंडळांत जाऊन बसायचें, ऐवढेंच! जेव्हा पहावें तेव्हा बाई घरांत नाही म्हणजे काय? नाटकाची फारशी आवड नसणारे लोक नाटकांत काम करणाऱ्यांबद्दल काय काय बोलत असतील, याची कल्पनाच केलेली बरी. आपल्याला दिवसभर आपआपलीं कामें असतात. आणि संध्याकाळीं रोज उठून तालमीला गेलें की, नात्यागोत्याच्या माणसांना किंवा स्नेही मंडळींना भेटायचें तरी केव्हा? अशा रीतीने त्यांच्या रोषालाहि सबळ कारण मिळतें. पण त्या भीतीवर मला तरी अजून तोडगा सापडला नाही.

तिसरी भीति, ज्यांच्याबरोबर काम करायचें, तीं माणसें कशी वागतील ही. आम्हां बायकांना, ज्या कांही निष्कारण भीतिदायक गोष्टी वाटत असतात त्यांतलीच ही एक आहे. आजहि नाटकांत काम करण्यासाठी फारशा स्त्रिया मिळत नाहीत, त्याच्या मुळाशीं हीच भीति असते. वास्तविक जितक्या आदराने आपण दुसऱ्यांशीं वागतो, तितक्याच आदराने ते लोकहि आपणाला वागवितात, पण हा अनुभव सर्वांशीं मिळून मिसळून वागणाऱ्यांनाच येतो. आपल्याच घरकुलांत बसून बाहेरच्या लोकांना 'वाह्यात' म्हणणाऱ्या लोकांना हें समजणार नाही.

आता सगळ्यांत मोठी आणि शेवटची भीति म्हणजे नाटक सुरू झाल्यावर समोर दिसणाऱ्या प्रेक्षकांची.

प्रेक्षकांच्या भीतीवरून सहज एक गोष्ट आठवली. आमच्यापैकी बहुतेक मुरलेल्या लोकांना ही भीति मुळीच वाटत नाही. पण मला मात्र अजूनहि, कोणत्याहि नाटकांतील माझा पहिला प्रवेश (Entry) फार भीतिदायक वाटतो. रंगभूमीवर पाऊल ठेवल्यावर पहिले २-४ सेकंद माझी घाबरगुंडी उडालेली असते. दोन महिने केलेली तालीम, दिग्दर्शकांची मेहनत, माझी असली-नसलेली हुशारी, हें सगळें प्रेक्षक-वर्ग पाहतांच

मी विसरून जातें. आमचे दिग्दर्शक म्हणतात की, त्यांचें दिग्दर्शन म्हणजे दगडांतून मूर्ति कोरण्याचें काम आहे. त्यांच्या शिल्पकलेचें लोक कौतुक करीत असतील, पण मला मात्र क्षणभर टाकीच्या घावांचा विसर पडून आपण नुसताच दगड असल्यासारखें वाटतें. पण तें एकच क्षण! नंतर 'फूटलाईट'च्या पलीकडे दृष्टि टाकली की, मी माझ्या भूमिकेंत येतें. ही दोन चार क्षणांपुरतीच प्रेक्षकांची भीति मला कां वाटते, तें मात्र मला अजूनहि समजत नाही. माझी ही भीति प्रेक्षकांच्या लक्षांत येत नाही, असें मला पुष्कळांनी सांगितलें आहे. तरीहि त्या भीतीवर कांही इलाज नाही.

पुष्कळ वेळां, प्रेक्षकांच्या भीतीचा एवढा जबरदस्त पगडा माझ्यावर असतो की, नाटकाची तारीख जवळ येऊं लागली म्हणजे एक स्वप्न मला वारंवार पडूं लागते. थिएटरमध्ये खूप लोक बसले आहेत, तिसरी घंटा होत असून पडदा वर जातो आहे, आणि मला मात्र आपल्या भूमिकेचें एक अक्षरहि आठवत नाही. आजपर्यंत कोणत्याहि प्रयोगांत माझ्या हातून भाषणांची उलटापालट किंवा भाषण विसरणें, भलत्या ठिकाणीं चुकून रंगभूमीवर प्रवेश करणें, किंवा योग्य वेळीं रंगभूमीवर जायचें आहे, हेंच विसरणें, अशा चुका घडल्या नाहीत. मी माझ्या भूमिकेचीं भाषणें नेहमी पाठ ठेवतें. आणि शिवाय मदत करायला 'प्राम्पटर' महाशय असतातच. तरीहि ह्या 'स्टेजफ्राईट' मुळे नाटकाच्या दिवशी मनाला स्वस्थता नसते. आमच्या मंडळांतलीं कांही मंडळी नाटकाच्या पूर्वी पडद्याआड रंगदेवतेची पूजा करून प्रार्थना करतात. पण मी मात्र 'प्राम्प्टर'चा आशीर्वाद घेतल्याशिवाय स्टेजवर जात नाही.

प्रेक्षकांच्या भीतीवरून सहज एक गोष्ट आठवली. आमचे एक स्नेही आहेत. खूप हुशार आहेत. सभेंत भाषण करायला उभे राहिले तर तासभर अस्खलित बोलतात. एकदा त्यांना नाटकांत काम करण्याची इच्छा झाली. त्यांना अनुरूप अशी भूमिका द्यायची म्हणून आम्ही 'दुसरा पेशवा' या नाटकांतील बाजीराव आणि काशीबाईचा एक प्रवेश ठरविला. मी काशीबाईची भूमिका घेतली. आमच्या बाजीरावांचीं भाषणें इतकीं खडखडीत पाठ होतीं की, पडदा उघडल्या बरोबर काशीबाईला एकहि वाक्य न बोलूं देतां, त्यांनी भराभर एका पाठोपाठ एक अशीं आपलीं भाषणें म्हणायला सुरुवात केली. मी दोन चारदां त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. पण बाजीरावचे थरथरणारे हात आणि गुडघे पाहून माझीच बोबडी वळते की काय असें मला वाटूं लागलें. शेवटीं १०००० मराठ्यांनी २५ लाख मुसलमानांचा फडशा पाडून लुटून आणलेल्या संपत्तींतील एक रत्नमाळ, काशीबाईच्या गळ्यांत घालण्यासाठी बाजीरावांनी आपले हात पुढे केले. त्यावेळीं ते वादळांत सापडलेल्या झाडाप्रमाणे थरथर कापत होते. आमच्या प्रेक्षकांची हसून पुरेवाट झाली. आणि बाजीरावांनी पुन्हा नाटकांत काम न करण्याची शपथ घेतली. येथे हें सांगितलें पाहिजे की, हा प्रयोग आमच्या घरींच झाला होता, आणि प्रेक्षकवर्गहि घरचाच होता.

आता, खऱ्या प्रेक्षकांबद्दल एक गोष्ट सांगितली पाहिजे की, आमच्या नाटकांतील सहकाऱ्यांप्रमाणेच आमचे प्रेक्षकहि फार सहानुभूतीने आम्हाला वागवितात. आमच्याकडून पुष्कळ चुका होत असतील, पुष्कळ वेळां त्यांच्या अपेक्षा आमच्याकडून पूर्ण होत नसतील, पण आजपर्यंत कधीहि कोणी आम्हाला निरुत्साही केलें नाही. आमच्या नवशिकेपणावर प्रेक्षकांनी मोठ्या कौतुकानेच पांघरूण घातलें आहे. रंगभूमीवरील आपलें काम पसंत पडलें नाही तर पैसे देऊन नाटक बघायला आलेले प्रेक्षक भर्जी, अंडीं इत्यादींचा मारा करून आरडाओरड करतात, असें ऐकिवांत आहे. नागपूरलाच असे प्रकार घडले होते, असें म्हणतात. पण आजपर्यंत मी ज्या ज्या नाटकांत कामें केलीं, त्या त्या वेळीं प्रेक्षकांनी अत्यंत सहानुभूतीने, अभिनयकलेच्या प्रेमानेच नाटकें पाहिल्याचें मला दिसून आलें. रंगभूमीवरील नटांचीं कामें चांगलीं होत असलीं की, प्रेक्षकांकडून जो स्वयंस्फूर्त प्रतिसाद मिळतो त्यांचा अनुभव घेण्यासाठी तरी रंगभूमीवर काम करून पाहावें! आपण आपल्या भूमिकेशीं तद्रूप होत असतांना प्रेक्षकहि त्या भूमिकेशीं समरस होऊं लागतात. स्टेजवरील प्रसंग आनंदाचा, उल्हासाचा असला तर प्रेक्षकांचे चेहरे देखील प्रफुल्लित

दिसतात. उलट तो प्रसंग जर शोकरसाने परिपूर्ण असेल, तर त्याची छाया प्रेक्षकांवरहि पडलेली आपणाला जाणवूं लागते. आपण जितक्या तन्मयतेने आपली भूमिका करीत असतों, तितकेच प्रेक्षक देखील त्या भूमिकेशीं समरस होतात आणि नाटकहि उत्तरोत्तर रंगत जातें. एखादे वेळीं आम्हांला वाटतें, कालचा प्रयोग चांगला रंगला होता, पण आज कांही तितकासा रंगला नाही. त्यावेळीं बहुधा त्याच्या मुळाशीं हेंच कारण असतें की, कालच्या इतक्या तन्मयतेने आज आम्ही आमची भूमिका वठवूं शकलों नाही. पण नेहमी आम्हींच प्रेक्षकांना आमच्या बरोबर नेतों, असें नाही. तर क्वचित प्रसंगीं प्रेक्षकहि आपला 'मूड' (mood) आमच्यावर लादतात. प्रत्येक नाटकांत कांही कांही प्रसंग असे असतात की ते चालूं असतांना प्रेक्षक त्यावेळीं योग्य तो response देतातच पण भारी किंमतीचीं तिकीटें नाईलाजाने घ्यावीं लागल्याने जे प्रेक्षक येतात ते बहुतेक कोणत्याहि प्रसंगीं 'तटस्थ' असतात. असा प्रेक्षकवर्ग ज्या खेळाला प्रामुख्याने उपस्थित असतो, तो इतर खेळांच्या मानाने कमी दर्जाचाच होतो. मला सर्वांत जर कोणते प्रेक्षक पसंत असतील, तर जे स्वतः नाटकाचें तिकीट विकत घेऊन येतात. ते प्रेक्षक नाटकांतील किंवा अभिनयांतील खुब्या चटकन ओळखतात आणि योग्य ती प्रतिसाद (response) देऊन नाटक रंगवितात. कधी कधी नाटक सुरवातीपासूनच इतकें रंगत जातें की, त्यावळीं घरदाराची, शेजाऱ्यापाजाऱ्यांची व प्रेक्षकांची भीति मनांतून पार उडून जाते. फक्त आपण त्यावेळेपुरते आपल्या भूमिकेंत वावरत असतों. आणि दुसऱ्या दिवशीं पुन्हा ह्या नाटकाचा प्रयोग व्हावा, असें वाटूं लागतें.

समूहाचें मनोविज्ञान

रा. द. दामले

मनोविज्ञानदृष्ट्या समूह कशास म्हणावें–केवळ संख्येने महत्तम असलेल्या जनसमुदायास समूह म्हणतां येणार नाही–मनोधर्म विशिष्ट समुदायांचे असामान्य गुणधर्म अशा समूहांतील व्यक्तींचे विचार व विकार एखाद्या ठराविक दिशेने कलणें—तद्वतच त्यांचें व्यक्तित्व विसर्जन होणें—समूहाला जाणीव नसलेल्या अनेक गोष्टींचा त्यांचे मनावर परिणाम होत असतो—बुद्धीचा प्रभाव लुप्त होत जाऊन मेंदूच कार्यक्षम होणें—प्रज्ञा निष्क्रिय बनून भावनांचें संपूर्ण परिवर्तन होणें—या प्रकारें परिवृत्त झालेल्या समूहाच्या भावना त्यांतील व्यक्तींच्या भावनांपेक्षा उत्तम किंवा निकृष्ट देखील असूं शकतात.—समूह हा अगदी सहज दुष्प्रवृत्त किंवा सद्प्रवृत्त होऊं शकतो.

लौकिक अर्थाने समूह म्हणजे लोकांचा जमाव, मग त्या व्यक्ति कोणत्या का निमित्ताने एकत्रित झाल्या असोत आणि त्यांचा कोणताहि धर्म, जात व व्यवसाय असो. परंतु मानसशास्त्रदृष्ट्या मात्र समूह या शब्दास अगदी विशिष्ट प्रकारचा अर्थ व व्याप्ति असते.

कोणत्याहि, माणसाच्या जमावास मनोधर्म विशिष्ट स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी कशाप्रकारचा व्यापार होत असतो हें पाहूं. केवळ एखाद्या विशिष्ट परिस्थितींतच जमावांतील माणसाच्या वैयक्तिक गुणांपेक्षा अगदी निराळे व नवीनच असे गुणधर्म समूहाला प्राप्त झालेले आढळून येतात. तसेंच त्या समूहांतील सर्वच व्यक्तींच्या भावनांत व विचारांत एकात्मता उत्पन्न होऊन त्यांच्या जाणीव असलेल्या व्यक्तित्वाचा (conscious personality) लोप होतो. अशाप्रकारें सुसंघटित स्वरूप

आल्यावर समूह म्हणजे जणूं काय एकच व्यक्ति बनून त्या जनसंहतीचें नियंत्रण मानसिक एकात्मकतेच्या नियमांनी होऊं लागतें. (the law of the mental unity of crowd) तात्पर्य काय, की केवळ आकस्मिकपणे व्यक्तींच्या एकत्रित जमण्याने जनसमूह बनतो असें होत नाही तर त्यासाठी पूर्वीच कांहीतरी निमित्त किंवा कारण घडलेलें असावें लागतें. या प्रकारच्या कारणपरंपरेचें स्वरूप कसें असतें याचा पुढे विचार करूं.

मनोधर्म विशिष्ट समूहाचें दुसरें एक लक्षण असें दिसून येतें की, अनेक व्यक्ति एकसमयावच्छेदेंकरून संमिलित होण्यानेसुद्धा त्यांचा समूह बनण्यास आवश्यकता असतेच असें नाही, तर राष्ट्रामध्ये विखुरलेल्या असंख्य व्यक्तींमध्ये देखील समूहाचे गुणधर्म उद्‌भूत होणें शक्य असतें. मात्र हें केव्हा घडतें म्हणाल तर ज्यावेळीं देशव्यापी महान घटना भावनोद्रेकजन्य परिस्थिति निर्माण करते त्याच वेळीं. उदाहरणार्थ,९ ऑगस्ट १९४२ रोजीं महात्मा गांधी आणि इतर कांग्रेस पुढाऱ्यांस अचानकपणें ब्रिटिश सरकारने अटक केली, त्याबरोबर देशाच्या कानाकोपऱ्यांतून जी एक भयंकर क्रांतीची ज्वाला हरएक व्यक्तीच्या अंतःकरणांत भडकली व नंतर त्याचाच परिणाम म्हणून जे अनेक उत्पात लोकांनी केले ती रोमांचकारी घटना हेंच सिद्ध करते की, समूहविशिष्ट गुणधर्म देशभर विखुरलेल्या व्यक्तींत परिस्फुटित झालेले होते; व सर्व राष्ट्रच एक समूह बनलें होतें. १८५७ सालच्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास देखील हेंच सिद्ध करतो.

समूहाचे महत्त्वाचे दोन प्रकार

पहिला प्रकार म्हटला म्हणजे विषम धर्मीय, विजातीय किंवा विभिन्न वर्णीय घटक समूह (heterogeneous); आणि दुसरा म्हणजे समधर्मीय, समजातीय किंवा सवर्ण घटक समूह होय (homogeneous). या दोन्ही प्रकारच्या समूहांत आढळणारे उभय सामान्य गुणधर्म तसेंच भिन्न जातिनिष्ठ विशेष गुणधर्म कोणत्या स्वरूपाचे असतात या गोष्टींचा अभ्यास करून त्याचें दिग्दर्शन व विवेचन यानंतरच्या भागांत येईल.

समूहाच्या मनोधर्मांचें विवेचन करणें ही गोष्ट कांही अगदी सोपी नाही. त्याचीं कारणें अशीं की, कोणत्याहि समूहाचे घटकावयव आणि त्यांतील व्यक्तींचा वंश किंवा जाति यांमुळे, तद्वतच समूहाला उद्युक्त करणाऱ्या गोष्टींची तीव्रता व स्वरूप या कारणांमुळे विविध समूहांत भिन्नत्व प्राप्त होत असतें. तात्कालिक उद्रेकाचा झंझावात शमन पावल्याबरोबर समूहांतील रौद्र रूप प्रगट करणाऱ्या व्यक्ति, आपला मूळचा सात्त्विक व सौजन्यशील स्वभाव धारण करितात. याच कारणामुळे नेपोलियन याने फ्रेंच कन्व्हेंशनमधील क्रांतीच्या काळीं क्रौर्य करणाऱ्या लोकांस क्रांतीचें वादळ शांत झाल्यावर आपल्या नोकरींत घेतलें व ते अत्यंत प्रामाणिक व सद्‌गुणी असल्याचें आढळून आलें.

समूह सुसंघटित बनण्याचा मनोव्यापार पूर्णत्वाला पोचल्यानंतरच मग पूर्वी वर्णन केलेले भावना व विचार यांच्या संकरणाचें कार्य घडून येतें व म्हणूनच अशा प्रकारची पूर्णावस्था समूहाला प्राप्त झाल्याशिवाय वंशविशिष्ट स्थायी आणि प्रभावी गुणधर्मांपेक्षा भिन्न स्वरूपाचें असें नूतन किंवा अभिनव आणि अगदीच विशेष स्वरूपाचे गुणधर्म प्रगट होऊं शकत नाहीत.

म्हणूनच आपण प्रथमतः समूहाच्या अशा प्रकारच्या खास (special) वैशिष्ट्यांचाच अभ्यास करूं व त्यांचें स्वरूप कसें असतें हें पाहूं. सामूहिक मनोव्यापारांचें विश्लेषण, विवेचन आणि विवरण करीत असतां मुख्यतः एक गोष्ट आपल्या दृष्टोत्पत्तीस येते ती ही की, कांहीकांही विचार व भावना यांचें कृतींत रूपांतर होण्याची क्रिया केवळ व्यक्तींचा समूह बनला तरच होऊं शकते.

समूहांतर्गत व्यक्ति आणि समूहाबाहेरील व्यक्ति यांमध्ये आढळून येणारें भिन्नत्व कशा प्रकारचें असतें तद्वतच त्या भिन्नत्वाला कारणीभूत असणाऱ्या कोणकोणत्या गोष्टी आहेत याहि मुद्याचा सखोल विचार करावयाचा आहे.

आधुनिक मानसशास्त्राने जे कांही सिद्धान्त याबाबत प्रस्थापित केलेले आहेत त्यावरून हेंच सिद्ध होत आहे की, केवळ सेन्द्रिय जीवनावरचे (Organic life) नव्हे तर बुद्धीच्या व्यापारावर देखील जाणीवरहित मान्सा (unconscious phenomena) फार प्रभावी परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. आपला बव्हंश मनोव्यापार जाणीवरहित होत असतो आणि म्हणूनच एखाद्या सूक्ष्म विश्लेषकास, किंवा तीक्ष्ण निरीक्षकास मानवी क्रियेस कारणीभूत असणाऱ्या असंख्य हेतूंपैकी अगदीच थोडयाशा जाणीवरहित (unconscious) हेतूंचें त्यास ज्ञान होऊं शकेल.

मनुष्याच्या अंतर्मनाची घडण मुख्यतः त्याच्या आनुवंशिक गुणाच्या प्रभावानुसार बनलेली असते आणि त्याचमुळे आपले बुद्धिपुरस्सर केलेले व्यवहार अंतर्मनाच्या साक्षीनेच होत असतात असें दिसून येतें. या दृष्टिकोणांतून विचार करतां एका महान तत्वाचा अविष्कार होतो तो असा की, कोणत्याहि वंश किंवा जातीमधील बुद्धिवैभवाचें (genius of a race) अधिष्ठान अंतर्मनाच्या वंशपरंपरागत चालत आलेल्या असंख्य सर्वसामान्य गुणसमुच्चयानुवर्ती असतें. उदाहरण म्हणून आर्य वंशाच्या बुद्धिशाली व्यक्तींपैकी, अगदी लोकांना अत्यंत परिचित अशा व्यास,मनु, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, रवीन्द्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस यांसारख्या आपल्या बुद्धितेजाने दिपवून टाकणाऱ्या विभूतींच्या अंतर्मनाचे गुणविशेष म्हटले म्हणजे परमेश्वराच्या शक्तिसर्वस्वावरील त्यांची दृढ श्रद्धा, पापपुण्य, सत्यासत्य, पुनर्जन्म आणि ज्वलंत स्वदेशाभिमान इत्यादि गोष्टींवरील पूर्वसंचित अढळ निष्ठा हेच नव्हेत काय !

या सर्व विवेचनावरून एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आढळते ती ही की, आपल्या दैनंदिन व्यवहारांतील बव्हंश भाग प्रच्छन्न हेतुनिष्ठ असतो आणि त्याची सहसा आपल्याला जाणीवसुद्धा होत नसते.

मनुष्याचे बुद्धि व अहंकार लिंपित नसलेले जे वांशिक गुण असतात त्यांवरून त्या वंशांतील व्यक्तींचें साधर्म्य सिद्ध होत असतें आणि (unconscious elements constitute genius of a race) त्याच्याच उलट प्रत्येक व्यक्तींत स्वभावाचें वैधर्म्य उद्भूत होण्यास बाह्य संस्कार व अत्यंत अपवादात्मक आनुवंशिक गुण हे कारणीभूत होतात.

बुद्धिमत्तेच्या बाबतींत कांही कांही व्यक्तींत जरी विषमता असली तरी पण त्याच व्यक्तीमध्ये वासना, विकार व वृत्ति यांबाबत फारच मोठें साधर्म्य आढळून येतें. याचमुळे एक अत्यंत महत्वाचें तत्त्व सिद्ध होतें की, महान विभूति ही भावना, श्रद्धा (धर्म), राजनीति, नैतिक अधिष्ठान, आवडीनीवडी इत्यादि बाबतींत सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा क्वचितच सरस ठरूं शकते.

बौद्धिक दृष्टीने विचार करतां एखाद्या महान गणितशास्त्रज्ञांत व त्याचे बूट साफ करणाऱ्या मोच्यांत महदन्तर आढळून येऊं शकेल, परंतु त्या दोघांच्या स्वभावांत मात्र अगदीच थोडा फरक आढळेल.

कोणत्याहि समूहांत सामान्यतः आढळून येणाऱ्या गुणधर्मांचें स्वरूप अचूकपणें कसें दिसून येतें हें पाहिलें असतां असा प्रत्यय येईल की, ज्या वंशांतील व्यक्तींचा तो समूह बनला असेल त्यांतील बहुसंख्य प्रमाणांत असलेल्या अगदी साधारण (common) माणसांत जे जे गुणधर्म सुप्त व अज्ञात स्वरूपांत असतात ते ते गुणधर्म हेंच समूहाचें वैशिष्ट्य ठरतें. थोडक्यांत असें म्हणतां येईल की, समाजांतील अगदी सामान्य माणूस हा ज्या प्रकारचे गुणधर्म प्रकट करतो तेच त्या समूहाचे वास्तविक गुणधर्म असतात. यावरून हेंच स्पष्ट होतें की, समूहांत कोणत्याहि वंशाचे असामान्य व असाधारण गुणधर्म किंवा मनोधर्मविशेष हे आढळून येऊंच शकत नाहीत. याचें प्रमुख कारण असें की समूहांत समाविष्ट झाल्यामुळे त्यांतील घटकांचा बौद्धिक कल व त्यावर आधारलेलें व्यक्तिमत्व हें दुर्बल होत जातें आणि याचा परिणाम असा होतो की, नेणीवयुक्त गुणांचा प्रभाव पडून असम किंवा विषम धर्मांची जागा समधर्म, जुलमाने बळकावतात. हें विवेचन क्लिष्ट व दुर्बोध वाटणें अगदी साहजिक आहे. कारण हा विषय एकतर

नवीन आहे व कित्येक तत्त्वांचें स्पष्टीकरण करतां येईल अशीं उदाहरणेंहि सापडणें कठीण जातें.

समूहाच्या कृतींत शहाणपणा चुकूनसुद्धा सापडत नाही. याचें कारण असें की, समूहांत मूर्खपणा व औधत्य हेच गुण संकुलित झालेले असतात. आणि याच कारणामुळे श्रेष्ठ प्रकारची बुद्धिमत्ता आवश्यक असलेलीं कामें समूहास कदापि करतां येणें शक्य नसतें.

समूहांत समाविष्ट होतांच व्यक्तिगत विवेक, संयम व तोल सुटून जाऊन माणूस बेजबाबदार बनून संख्याबलाच्या मदाने उन्मत्त होतो. शिवाय दुसरें म्हणजे तो संसर्गशील होतो व त्यामुळे मंत्रमुग्ध होण्याचा मनोधर्म त्यांत उद्भवतो. प्रत्येक भावना व कृति अगदी खूपच संसर्गवाही बनतात. या महत्त्वाच्या मुद्याचा पुढे तपशिलांत विचार करणार आहोंत.

तिसरा परिणाम म्हणजे समूहांतर्गत व्यक्ति संवेदनाक्षम बनून समूहाच्या त्यावेळींच्या ज्या भावना किंवा कल्पना अथवा कृती चालू असतील त्यांचाच परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. आणि मुख्यतः यामुळेच वर वर्णन केलेला संसर्ग उद्भूत होऊन प्रसृत होण्यास फारच सहाय्य होतें. मानसशास्त्राने जीं नूतन गूढें उकललीं आहेत त्यांच्या आधारें विचार करतां समूहांत समाविष्ट झालेल्या व्यक्तीचें व्यक्तिमत्व, इच्छाशक्ति, विवेचकबुद्धि, विचार, विकार आणि तदनुवर्ती कृति या सर्वांवरील त्याचें स्वतःचें नियंत्रण व तोल नष्ट होऊन मंत्रमुग्ध नागाप्रमाणे पुंगीवाल्याच्या इच्छेप्रमाणे तो जसा संदेश देईल त्याप्रमाणे डोलत राहतो; नाचत राहतो.

मनोधर्म विशिष्ट समूहांतील व्यक्तील आपण काय करतों याचें मुळीच भान राहत नाही. मनुष्यांतील कांही शक्ति जशा लोप होतांना आढळतात त्याच्या उलटपक्षीं कित्येक शक्ति पराकोटीला नेणेंहि शक्य व सुलभ होतें; व म्हणूनच मंत्रप्रभावाने त्यांत दुर्दम्य उच्छृंखलपणा उत्पन्न करून त्याच्या हातून कित्येक असंभवनीय व अशक्य गोष्टी घडवून आणतां येतात व सामूहिक संघटनेच्या सामर्थ्याचा प्रभाव पडतो तो निराळाच. या प्रकारें समूह मंत्रमुग्ध झाल्यावर समूहाच्या पुढाऱ्याच्या आदेशाला झुगारून देऊं शकतील किंवा आपलीच इच्छा कायम टिकवूं शकतील इतक्या कणखर वृत्तीचीं माणसें फारच क्वचित आणि अति अल्प प्रमाणांत आढळतात. अर्थात् अशा कांही व्यक्ति समूहांत असल्यास कधी कधी फार मोठे रक्तपात देखील एखाद्या सुयोग्य सूचित संवेदनेमुळे टाळतां येतात.

याप्रमाणे वैयक्तिक गुणविशेष आणि मनोधर्मांचें परिवर्तन समूहनिविष्ट व्यक्तींत ज्यावेळीं होतें त्यावेळीं हें परिवर्तन इतकें उत्कट असतें की एखादा अत्यंत कृपण अगदी कर्णाचा अवतार बनतो, एखादा नास्तिक पूर्णपणें आस्तिक होतो, अति प्रामाणिक माणूस गुन्हे करण्यास उद्युक्त होतो व जणूं काय एखादा वीर पुरुषच बनतो.

जगताच्या अनादि कालापासूनच्या इतिहासाचें केवळ विहंगमावलोकन केलें तरीसुद्धा एक गोष्ट सहज पटेल ती ही की, जे अनेक स्वातंत्र्यसंग्राम झाले, जे असंख्य सांस्कृतिक संघर्ष झाले ज्या ज्या महान क्रान्त्या यशस्वी झाल्या त्या सर्वांची प्रेरक, पूरक आणि प्रवणशक्ति संघटित समूहशक्तिमूलकच होती.

—'समूहाचें मानसशास्त्र'
या ग्रंथांतून.

अनुक्रमणिका

तपस्वी कै. हरिभाऊ नेने

लेखक : ना. रा. शेंडे

समाजांत निष्पाप, निर्व्याज आणि कनवाळु असे फारच थोडे लोक असतात. ते आपल्या सद्गुणांचा कसलाहि गाजावाजा न करतां अव्याहत लोकसेवा साधत असतात. अशा थोर लोकांपैकी कै. हरिभाऊ नेने हे एक होते. त्यांचें विशुद्ध चारित्र्य व साधुशील वृत्ति लक्षांत घेतां ते एक जणुं तपस्वीच होते असेंच प्रत्ययास येईल.

कै. हरिभाऊंचें मला जें प्रथम दर्शन घडलें त्याचें मनोरम चित्र आजहि माझ्या मनश्चक्षूंपुढे तितकेंच स्वच्छ नि स्पष्ट तरळत आहे. माझ्या स्मृतीप्रमाणे तो १९३९ सालचा २१ नोव्हेंबर हाच दिवस असावा. मी अगदी प्रातःकाळीं त्यांचेकडे गेलों तेव्हा ते ध्यानस्थ बसले होते. एक निळसर शाल त्यांनी अंगावर ओढली होती व पुढ्यांत असलेले पांचसहा हस्तलिखित कागद त्यांच्या गंभीर मुद्रेकडे टवकारून पहात होते. मी प्रणाम केला. त्यांच्या तंद्रीचा भंग झाला. 'कोण बरं तुम्ही?' अशी प्रश्नार्थक नजर त्यांनी मजवर रोखली. मी माझं नांव सांगतांच ते ताडकन् उठले आणि दुसरा एक पाट शेजारीं ठेवून, त्यांनी मला प्रेमळपणानं बसायला सांगितलं. आणि मग ते म्हणाले, "तुमच्याचसाठी लिहिला आहे हा लेख, तुमच्याकडे पाठविण्यापूर्वी मी माझ्याच लेखाचं पारायण करीत बसलों होतों. फार बरं झालं तुम्ही आलांत. तुमची ओळख झाली. या ओळखीनं माझ्या माणसांच्या जंत्रींत वाढ झाली." हरिभाऊंनी लेख माझ्या हातीं दिला. लेखाचा मथळा वाचून मी त्याच्या भावार्थानं त्यांचेकडे पाहिलं तेव्हा 'आर्यांचे वेद व पारशांचा अवेस्ता' या लेखासंबंधी जवळपास एक तास त्यांनी मला पाठ शिकविला व नंतर ते उद्गारले, "तुम्ही नारायण आणि मी हरि हें जसं तसंच सर्व जाति-धर्मांत सगळं एक आहे. ही एकता टिकवणं आपणा सर्वांचं कर्तव्य आहे."

"पण हरिभाऊ, आमच्यासारख्या दरिद्री नारायणाचा प्रश्न अतिविकट आहे!"

"हाच तर प्रश्न आहे. दरिद्री नारायणच असे विकट प्रश्न सोडविण्यास समर्थ असतात." क्षणभर ते स्तब्ध झाले आणि नंतर थोड्या विनोदानं म्हणाले, "अहो, म्हणूनच तर माझ्या वडिलांचं नांव नारायण होतं. आता पुन्हा सांगतों, मी 'हरि' आणि तुम्ही 'नारायण'–हरि–नारायण!" केवढा मोठा धडा हरिभाऊंनी मला त्या दिवशीं शिकविला, त्याची विस्मृति कदापि तरी होणं शक्य आहे का?

त्यानंतर हरिभाऊंचा दृढ परिचय झाला, नव्हे घरोब्याचा घनिष्ठ संबंध जुळला. एकदा मी त्यांना विचारलं, 'हरिभाऊ, बरेच जण आपल्या नांवापुढं प्राध्यापक, आचार्य, प्राचार्य इ० उपाधि लावतात आणि तुम्ही डिप्लोमा ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य राहिले असूनहि तशी कोणती उपाधि कां लावीत नाही?" या प्रश्नावर ते हसून म्हणाले, "या कोणत्याहि उपाधी-पेक्षा 'श्री' काय कमी आहे? मी हा आणि तो म्हणवून घेतलं पण माझ्यांत माणुसकी नसेल तर त्या उपाधीला अर्थ तो काय? 'श्री' पेक्षा जगांत कांहीहि श्रेष्ठ नाही. आणि या 'श्री' ला जाणून मी माझं कर्तव्य चोखपणें बजावलं की पुरे!"

कै. हरिभाऊंच्या या असल्या उच्च व उदात्त विचारसरणीप्रमाणेच त्यांची निर्मळ, सोज्वळ व कन-वाळु वृत्ति अनुभवास येऊन त्यांच्यापुढं आदरानं मस्तक विनम्र होत असे. एकदा एक तरुण कडक उन्हाळ्यांत भर दुपारीं डोक्यावर कांही न घालतां जात होता. हरिभाऊ छत्री घेऊन दुसऱ्या बाजूनं येत होते. त्यांची नजर त्या अपरिचित तरुणावर पडून त्यांनी त्याला हाक देऊन ममतेनं हटकलं, "बाबारे, एवढ्या कडक उन्हांत असा कां भटकतोस? डोक्या-वर कांही घ्यायला लाज कसली! असं हिंडूं नये बाळ.

ये वरं माझ्या छत्रींत अन् पुढं लक्षांत ठेव, शिक्षण कितीहि झालं असलं तरी बेपर्वाईनं हिंडूं फिरूं नये." आणि हरिभाऊंनी त्या तरुणाला आपल्या छत्रींत घेऊन त्याच्या स्थळीं पोचता केला. तसंच एकदा वि. सा. संघाचं काम आटोपून रात्रीं बाराच्या सुमारास घराकडे परतलों. पावसाळ्याचे दिवस होते व त्या रात्रीं पाऊस धो धो पडत होता. बर्डीच्या चौकावर रिक्षा ठरवूं लागलो. धरमपेठला जायला तसे रोज दोघांना चार सहा आणे पडत. पण त्या दिवशीं रिक्शावाला तब्बल रुपया मागूं लागला. हो ना करतां करतां शेवटीं १२ आणे ठरले. रिक्शेवाला ओलाचिंब होऊन थंडीनं थरथरत होता. तें पाहून हरिभाऊंचं हृदय द्रवलं. कांही अंतरावर गेल्यावर त्यांनी रिक्शेवाल्यास थांबविलं. आणि सरळ एक रुपया त्याला देऊन ते म्हणाले, "आम्ही इथंच उतरतों. तूं कुठल्या हॉटेलांत जाऊन चहा-कॉफी घे नि घरीं जाऊन हे ओले कपडे काढून टाक."

रिक्शेवाला हात जोडून म्हणाला, "साहेब, पोटासाठी हे श्रम घ्यावे लागतात. गेल्या दोन दिवसांत तर घरीं वाखेच पडले. तुमच्यासारखे गरीबाच्या पोटाला जाणणारे रोज कुठं भेटतात!" रिक्शेवाला हसत मुद्रेनं परतला पण हरिभाऊ उद्गारले, "पोटासाठी श्रम!"

आणि एकदा, धरमपेठेच्या तांगास्टँडवर हरिभाऊ एका दोन वर्षांच्या लहान बालकाला कडेवर घेऊन, त्याला चुचकारीत उभे होते. तोंच मी तेथे पोचलों नि म्हटलं, "हरिभाऊ, कुणाचा बालक आहे?" हरिभाऊ चिंतामग्न होऊन म्हणाले, "अहो, कितीतरी वेळचा रडतो आहे हा! घरच्या माणसाची चुकामूक होऊन बिचारा टाहो फोडतो आहे!" मग हरिभाऊंनी याला विचार, त्याला विचार असं करीत एका गरीब झोपडींत त्या बालकाला त्याच्या आईच्या स्वाधीन केलं. हरिभाऊंच्या असल्या थोर अंतःकरणाचे असे कितीतरी दाखले देतां येतील. हें पवित्र अंतःकरण व निरलस सेवावृत्ति पाहिली की मला हरिभाऊ प्रत्यक्ष श्री एकनाथ महाराजच वाटत. त्यांचेशीं ज्या ज्या गरीब व्यक्तींचे संबंध आले त्या त्या व्यक्तीसाठी हरिभाऊंनी श्रम आणि पैसा कसा खर्ची घातला याचीं जिवंत उदाहरणें तर अनेक आहेत.

हरिभाऊंच्या जीवनांत आडपडदा कधी रहात नसे. ते सरळ मार्गानं जात नि सरळ मार्गानं येत. कूट प्रश्नांना किंवा गुंतागुंतीच्या बाबींना ते थारा देत नसत. मनांत एक आणि बाहेर एक असं ठेवून सद्भावनेचा तंतू अतूट ठेवतां येत नाही, असं त्यांचं प्रांजळ मत असे. गैरसमज वा विरोध होईल अशी आपली वागणूक नसावी व आपलं बरोबर असलं तरी थोडं नमतं घेऊन वाद मिटविण्याचाच ते प्रयत्न करीत. सौजन्य तर त्यांच्या रोमरोमांत भरलं होतं. कोणी आपल्याला कमी प्रतीचा मानला तर चालेल पण हा दुष्ट किंवा निर्दयी होता असं म्हटलं तर तें मात्र माणसाला घातक आहे आणि म्हणून चांगुलपणानंच व्यवहार करावेत यावर ते भर देत. एकदा एका बड्या व्यक्तीकडे जाण्याचा आम्हां दोघांवर प्रसंग आला. ही व्यक्ति अर्थातच थोर मनाची. पण बोलतां बोलतां एका महत्त्वाच्या परंतु गुंतागुंतीच्या प्रश्नावर चर्चा होत असतां ती व्यक्ति हसत म्हणाली, "अहो हरिभाऊ आजच्या जगांत इतकं साधं नि सरळ राहून भागत नाही. आपण आहांत 'भोळे' आणि हे झेंडे आहेत भाबडे!" हास्यविनोदानंतर आम्ही बाहेर पडल्यावर मी हरिभाऊंना गमतीनंच म्हटलं, "चला हरिभाऊ, भोळे-भाबडे यांची ही जोडी मिरवत जाऊं या." त्यावर हरिभाऊ उद्गारले. "अहो महाराज, हें प्रशस्तिपत्र फारच उत्तम आहे. देवांच्या अवतारांत भोळे-भाबड्यांचं महत्त्व कसं आहे, तें पटवीन एखाद दिवशीं." आणि आम्ही चार सहा पावलं दूर गेलों नाहीत तर एक विद्वान् गृहस्थ रस्त्यांत भेटले. त्यांनी असाच एक कूट प्रश्न विचारला. तेव्हा हरिभाऊ विनोदानं म्हणाले, "महाराज, अहो आम्ही भोळे-भाबडे हरि-नारायण! अशा कूट प्रश्नांशीं आमचा काय संबंध? विद्वानांनीच ते सोडवावेत!"

हरिभाऊ आणि मी गेल्या तीन वर्षांपासून विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयांत अगदी नियमितपणें मिळून जायचे, मिळून यायचे. एखाद दिवशीं थोडी चुकामुक झाली की परस्परांना धुंडून काढण्याचा आम्ही

प्रयत्न करूं. माझं घर रस्त्यावर पडत असल्यामुळे हरिभाऊ सकाळीं मजकडे येत. मी नेहमी आरोग्याच्या नियमाला सोडून आठ साडे आठ वाजतां झोपून उठायचा. तोंवर हरिभाऊ माझ्या मुलामुलींना महाभारत—रामायण आदि ग्रंथांतील उद्बोधक पाठ देत. मी उठून हाततोंड धुवून होईपर्यंत कधी कधी हरिभाऊंना चहा होऊन जाई. माझ्या चहाच्या व्यसनाबद्दल हरिभाऊंना फार खेद वाटे. ते माझ्या आग्रहाखातर क्वचितच चहा किंवा कॉफी घेत. पण एकदा त्यांनी माझ्यावर बहिष्कार टाकण्याचं ठरवलं. आमच्या घरच्या सर्व मंडळीलाहि तशी सूचना दिली. बाहेर केवळ एकच कप चहा घ्यायचा असा दंडक घातला. शेवटीं एक थर्मास् भेट देऊन, त्यांत मावणाऱ्या तीन कपांचाच २४ तासांत उपयोग करायचा असं माझ्याकडून शपथेवार कबूल करून घेतलं. त्याचाच सुपरिणाम म्हणजे आज माझं चहाचं व्यसन शेकडा पाच प्रमाणांतहि उरलं नाही. एकदा हरिभाऊंना वि. सा. संघाच्या कार्यासाठी बाहेरगावीं जायचं होतं. ते तयारी करून सकाळींच माझ्याकडे येऊन 'बरं मी जाऊन येतों हं.' असं मला म्हणाले. मी खाटेवरून उठत म्हटलं, "हरिभाऊ, मजकडे येण्याचा उगाच कशाला त्रास घेतला ? काल सायंकाळींच तर तुम्ही मला प्रवासाबद्दल सांगितलं होतं." तेव्हा हरिभाऊ विमल हास्य करीत म्हणाले, "वा ! अहो; काल मी सांगितलं तेव्हा सायंकाळ होती आणि आता सकाळ !" उगवत्या सूर्याकडे बोट करून पुढं ते म्हणाले, "त्या नारायणाचं दर्शन घेतांना म्हटलं याहि नारायणाचं दर्शन घेतलेलं बरं !" हरिभाऊंचा मजवरच काय पण अनेकांवर इतका लोभ होता ! त्यांच्या चांगुलपणाचं वर्णनच करतां येत नाही.

कै. हरिभाऊंचा जन्म सातारा जिल्ह्यांतील पाटण गावी ८ डिसेंबर १८९२ रोजीं झाला आणि मृत्यु नागपूर येथील त्यांच्या खास निवासस्थानीं २२ नोव्हेंबर १९५४ रोजीं पहाटे ३–४५ वाजतां झाला ! ६२ वर्षांच्या या जीवनांत हरिभाऊंनी जे कष्ट घेऊन लोकोत्तर सेवा साधली त्याचा आलेख काढला तर, हरिभाऊंची शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, संशोधनात्मक व साहित्यविषयक थोर कामगिरी उच्चांक गाठते, असं स्पष्ट आढळेल. आदर्श अध्यापक, पट्टीचा संशोधक, जाडा संस्कृतपंडित, निष्ठावंत साहित्यिक व निरलस वृत्तीचा लोकसेवक म्हणून उभ्या महाराष्ट्रांत ते अग्रगण्य होते. आणि म्हणून त्यांच्या आकस्मिक निधनानंतर महाराष्ट्रांतील थोर पुरुषांनी, प्रमुख वृत्तपत्रांनी व अनेकविध संस्थांनी एकमुखानं 'अजातशत्रु' म्हणून त्यांचा गौरव केला; त्यांच्या धवलकीर्तीचें अभिमानास्पद चित्र रेखाटलें. 'भारतीय संस्कृतीचे आदर्श पुरुष' म्हणून तर लोकनायक बापूजी अणे यांनीं उद्गार काढले. त्यांच्या साधुशील वृत्तीचें, त्यागी प्रकृतीचें व अखंडपणे सेवाधर्म पाळणाऱ्या पवित्र मनाचें द्योतक म्हणजे त्यांचें 'तपस्वी जीवन' होय, असें म्हटलें तर तें अत्युक्त होणार नाही.

हरिभाऊ सदैव कार्यांत गढलेले असत. त्यांची व्यासंगी प्रकृति त्यांना घटकाभर स्वस्थ बसूं देत नसे. त्यांचेकडे केव्हांहि जाणें झालें तर चिंतन, मनन आणि संशोधन यांत ते मग्न असलेलेच आढळत. एकदा मी त्यांच्याकडे कांही महत्त्वाच्या कामासाठी गेलों. हरिभाऊ जीर्ण झालेल्या संशोधनाच्या कामाचे छोटे छोटे चिटोरे जुळवीत तल्लीन झाले होते. इतक्यांत थोडा जोराचा वारा सुटला आणि त्यांचे चिटोरे खोलीभर भिरभिरूं लागले. ते धावपळ करीत जमवितां जमवितां हरिभाऊ, घामाघूम झाले. पण त्यांना हवं तें एक चिटोरं कांही मिळेना खिडकीबाहेर गेलेलं तें चिटोरं शेवटी त्यांना मोठ्या प्रयासानं गवसलं. तें छातीशीं धरून हरिभाऊ आंत आले. मी सहज म्हटलं, "हरिभाऊ, एवढ्याश्या चिटोऱ्यासाठी देहाची काय यातायात केली !" त्यावर ते लगेच उत्तरले, "वा महाराज ! लहानसं चिटोर समजतां काय याला ? यांतील दोनच शब्दांनी हिरेमाणिकांचा मुगुट करतां येईल मला !" या एवढ्या उदाहरणावरून हरिभाऊंच्या संशोधनकार्याची सहज साक्ष पटेल. महानुभाव वाङ्मयाचे तर ते प्रवर्तकच होते. त्यांत त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या या सेवेचं मोलच ठरवितां येत नाही, इतकें तें श्रेष्ठ आहे. महाराष्ट्रांतील कांहींना हरिभाऊंच्या दलित समाजाच्या सेवेची कदाचित् माहिती नसेल ! दलित वर्गासाठी

त्यांनी आपला आत्मा कसा झिजविला याची महति दलित जनताच काय ती जाणूं शकते. कितीतरी दलित वर्गाच्या शिक्षणसंस्थांना व विद्यार्थ्यांना हरिभाऊंच्या कुशल मार्गदर्शनाचा व सेवेचा लाभ घडला.

विदर्भ साहित्य संघासाठी तर हरिभाऊंनी आपला देह रात्रंदिवस झिजविला. १९५०–५१ सालींच ते वि. सा. संघाचे अध्यक्ष व्हायचे; पण आपल्या नेहमीच्या त्यागी वृत्तीने त्यांनी त्यावेळीं तें मानाचें पद दुसऱ्यासाठी मुक्त करून दिलें. त्यानंतर १९५२–५३ सालीं ते वि. सा. संघाचे सरचिटणीस व या वर्षी ते अध्यक्षहि झाले. पूर्वसंकेत त्यांना हवा त्याप्रमाणे न झाल्याने व त्यांचं नांव आधीच निश्चित झालं असल्याने अध्यक्षपदाची उमेदवारी त्यांनी निरुपायाने कायम ठेवली होती नाहीपेक्षा श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्यासारख्या तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुरुषासाठी मी खचितच अध्यक्षपद स्वीकारलें नसतें, असं ते मला कळवळ्याने सांगत. निवडणूक झाल्यावर ते तसे जातीने श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांना भेटायला उमरावतीलाहि गेले होते. यावरून त्यांच्या सरळ व स्वच्छ अंतःकरणाची कोणालाहि खात्री पटेल. वि. सा. संघाचे सरचिटणीस व अध्यक्ष म्हणून असतांना हरिभाऊ इतके राबले की, इतकी झीज सहन करून अविश्रांत कष्ट घेणारा पदाधिकारी विरळाच असे प्रत्येक जण उद्‌गार काढी. वि. सा. संघाचा वाढता व्याप व जबाबदारी इमानें इतबारें पार पाडण्यासाठी रात्र रात्रभर जागरण करून हरिभाऊ कार्यालयांतून कितीतरी वेळां रात्रीं २–३ च्या सुमारास घरीं परतायचे. अध्यक्ष झाल्यावर मी त्यांना अनेक वेळां म्हटलं, "हरिभाऊ आपण अध्यक्ष आहांत. लहानसहान कामासाठीहि इतके राबतां ! आम्ही पाहूं कांही राहिलं असेल तर !" तेव्हा ते उत्तर देत, "अध्यक्ष सभेपुरता मानाचा, पण बाकी कांही न करतां नुसता हुकूम सोडणारा अध्यक्ष मी मात्र नाही. सर्वांबरोबर तितकंच काम करणं माझं काम !" खरोखरी असा स्वतः राबणारा अध्यक्ष विरळाच ! मरणाच्या खाटेवर असतांहि हरिभाऊंनी वि. सा. संघाचें कार्य शेवटच्या क्षणापर्यंत करून आदर्श अध्यक्षाची जाणीव करून दिली.

दि. २१ नोव्हेंबर ५४ रोजीं सकाळीं वि. सा. संघाची एक छोटी सभा हरिभाऊंच्या निवासस्थानीं भरली होती व हरिभाऊंनी ती व्यवस्थित पार पाडली. त्याचवेळीं ते मला म्हणाले, "मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये मी उद्या जाणार आहे, कागदपत्र किंवा कांही घटनात्मक बाबी तेथून पार पाडूं शकणार नाही. तुम्ही उपाध्यक्षांना अधिकार प्रदान करण्याचा मसुदा तयार करून आणा. मी सही करून देईन" त्याप्रमाणे मी मसुदा तयार केला व त्याच दिवशीं सायंकाळीं ७ च्या सुमारास मी त्यांचेकडे गेलों. जड पावलांनीच मी आंत प्रवेश केला. हरिभाऊ एका ऊंच पलंगावर तळमळत पडले होते. अंधार घट्ट घट्ट होत जात होता. त्यांत दिव्याचा कृत्रिम प्रकाश भेडसावीत होता. हरिभाऊंची सही घ्यायला मन धजत नव्हतं. कितीतरी वेळ मी तसाच त्यांचे बाजूला विषण्ण मनानं उभा होतों. हरिभाऊंनी मजवर दृष्टि टाकली. 'आणा मसुदा–सही करून देतों' अशी हातानं त्यांनी खूण केली. थरथरत्या हातानं मी मसुद्याचा कागद पुढं केला. हरिभाऊंनी सही केली आणि मग दोन्ही हात जोडून मला प्रणाम केला ! त्यांचे डोळे पाणावले ! हरिभाऊंची तीच शेवटची स्वाक्षरी–तोच अखेरचा प्रणाम आणि तेंच अखेरचं त्यांचं दर्शन !

त्यानंतर, कांही घटकांनीच दि. २२ नोव्हेंबर ५४ रोजीं पहाटे ३–४५ वा. थोर मनाचा चारित्र्यसंपन्न सत्पुरुष–एक तपस्वी आकस्मिकपणें निघून गेला ! मजवर पुत्रवत् प्रेम करणारे हरिभाऊ गेलेत पण त्या 'हरी'नं 'नारायण'ला मात्र सोडून दिलं याचं तीव्र दुःख असह्य झालं ! हरिभाऊ मला हाक देतील म्हणून मी रोज कानोसा घेत आहे पण आता मला त्यांची प्रेमळ हाक ऐकूं येत नाही !

वाचा आम्ही

सं घ वा र्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ५–१२–१९५४ रोजीं दुपारीं ४ वा. केन्द्रीय कार्यालयांत भरली. पण निर्वाह संख्येच्या अभावीं स्थगित झालेली हीच सभा त्याच दिवशीं त्याच जागीं दुपारीं ४–३० वा. उपाध्यक्ष श्री. पुरुषोमत्त दिवाकर ढवळे यांचे अध्यक्षतेखाली भरून खालील कामकाज झालें :

१. प्रथम सभाध्यक्षांनी संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक निधनाबद्दल, खालील दुखवटयाचा ठराव अतिशय जड अंतःकरणाने सभेपुढे मांडला.

दुखवट्याचा ठराव :

" विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, महानुभाव वाङ्मयाचे थोर संशोधक आणि एक संस्कृत-पंडित श्री. हरि नारायण नेने, यांच्या आकस्मिक निधनामुळे विदर्भ साहित्य संघाच्या या कार्यकारी मंडळास अतीव दुःख होत आहे.

मध्यप्रदेशांतील अनेक सार्वजनिक आणि साहित्य संस्थांचे प्रणेते आणि प्रवर्तक व म. प्र. शासन साहित्य परिषदेचे नियुक्त सभासद म्हणून कै. हरिभाऊंनी ज्या निरपेक्ष आणि निरलस वृत्तीने समाजाची सेवा केली त्यामुळे त्यांना मध्यप्रदेशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनांत चिरस्मरणीय अग्रस्थान प्राप्त झालें आहे.

महाराष्ट्राच्या या साधुशील ज्येष्ठ साहित्यिकाचा वि. सा. संघाशी आलेला संबंध म्हणजे त्यांच्या जीवनांतील महान् तपस्या आहे. त्यांच्या निगर्वी, विनोदी आणि मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी वि. सा. संघाला आजच्या भराभटीच्या स्वरूपास आणून सोडलें आहे कै. हरिभाऊंच्या कुटुंबियावर ओढवलेल्या आपत्तींत ही सभा सहभागी आहे.

ईश्वर मृताच आत्म्यास सद्गति देवो, ही प्रार्थना !

पांच मिनिटें काम स्थगित करून ही सभा आपल दुःख व्यक्त करीत आहे. "

दोन मिनिट स्तब्ध उभ राहून वरील दुखवटयाचा ठराव एकमताने मंजूर झाल्यावर, दुखवटया-निमित्त ही सभा पांच मिनिटें स्थगित करण्यांत आली.

२. पांच मिनिटांनतर सभच्या पुढील कामकाजास रीतसर सुरुवात झाली.

प्रथम सरचिटणिसांनी दि. ३१–१०–५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचन दाखविला व तो मजूर झाला.

३. त्यानंतर सरचिटणिसांनी झालेल्या कार्याचें निवेदन व विनंती सभेला सादर केली. त्यांत त्यांनी (अ) संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांनी दि. २१-११-५४ रोजीं उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांना आपले अधिकार प्रदान करून केलेली शेवटची स्वाक्षरी व नंतर दि. २२-११-५४ रोजीं पहाटे त्यांचे झालेलें आकस्मिक देहावसान यांची माहिती; (आ) दि. २१-११-५४ रोजीं सकाळीं ८-३० वा. संघाध्यक्षांच्या संमतीने त्यांच्या निवासस्थानीं मंदिररचना समितीच्या ताब्यांत असलेल्या नोकरांचा प्रश्न सोडविण्यासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या समितीची बैठक भरून, तींत बागायतीचे व कार्यालयाचे इतर कामासाठी परशुरामला दरमहा जास्तींत जास्त ५० रु. पगार व रात्रीचा जागल्या म्हणून दयारामला ४५ रु. पगार देण्याचें ठरून, या दोन नोकरांचा पगार सध्या कार्यालयीन व्यवस्थेच्या खर्चातून देण्यांत यावा; तसेंच मंदिररचना समितीच्या ताब्यांत असलेल्या नोकरांचा १ मे ५४ पासून ३१ ऑक्टोबर ५४ पर्यंतचा पगार वि. सा. संघाने मंदिर-रचना समितीला जें कर्ज दिलें आहे त्यांतून कर्जाची फेड म्हणून वळता करून घ्यावा असा जो निर्णय घेण्यांत आला त्याची माहिती; (इ) हायकोर्ट बेंचने दि. १०-११-५४ रोजीं श्री. ह. ना. नेने यांचें अध्यक्षपद कायम असल्याचा जो निकाल दिला त्याची माहिती; (ई) दि. १४-११-५४ रोजीं मंदिरनिधि समितीची सभा भरून, वि. सा. मंदिराला मदत म्हणून पन्नास हजारांच्या पुढील सरकारी अनुदानासंबंधी झालेला विचारविनिमय व या प्रश्नाबाबत अर्थमंत्र्यांकडे एक शिष्टमंडळ नेण्याचें ठरलें ती माहिती निवेदन केली. तसेंच, सरचिटणिसांनी अलीकडे आपली प्रकृति बरी रहात नसल्याने सरचिटणिसाच्या पदावरून मुक्त करण्याबद्दल सभेला विनंती केली.

४. नंतर सरचिटणिसांनी १ एप्रिल ५४ ते ३० नोव्हेंबर ५४ पर्यंतचा जमाखर्च सभेला सादर केला.

५. त्यानंतर, संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक निधनामुळे रिकामी झालेली जागा घटना नियम १४ (इ) अन्वयें भरून काढण्याचा प्रश्न सभेपुढे आला. सभाध्यक्षांनी अचलपूरचे श्री. श्रीकृष्ण शांताराम गुप्ते यांचें सरचिटणिसाला आलेलें दि. २५-११-५४ चें पत्र, तसेंच श्री. पां. बा. गडकरी यांचें दि. ३-१२-५४ चें पत्र सभेच्या विचारार्थ ठेवलें. या बाबतींत थोडी चर्चा झाल्यावर सभाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी खालील ठराव मांडला :

ठराव : " दि. २२-११-५४ ह. रोजीं संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक व दुःखद निधनामुळे रिकामी झालेली जागा घटना क. १४ (इ) प्रमाणे भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास असल्यामुळे, कार्यकारी मंडळ ही जागा भरण्याचा हा ठराव करीत आहे.

श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांची ही कार्यकारी मंडळाची सभा वि. सा. संघाचे अध्यक्षपदीं एकमताने निवड करीत आहे.

श्री. बा. ग. खापर्डे यांनी या निवडीला आपली संमति देऊन अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारावी, अशी, कार्यकारी-मंडळाची आग्रहाची विनंती आहे."

वरील ठराव एकमताने मंजूर झाला.

६. अचलपूर (परतवाडा) येथील वि. सा. संघाच्या संमेलनासंबंधी विचार होऊन, दि. ८ व ९ जानेवारी ५५ या तारखा सुचविण्याचा निर्णय घेण्यांत आला.

७. सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे आमंत्रक श्री. केशव केळकर यांचें दि. ५-१२-५४ चें पत्र विचारांत घेण्यांत येऊन, डिसेंबर महिन्यांत आचार्य प्र. के. अत्रे यांचीं व्याख्यानें घडवितां आलीं तर तशी कार्यकारी मंडळाने संमति द्यावी, अशी पृच्छा केली. सभेने आपली संमति दिल्यावर ही सभा संपली.

वि. सा. संघाचे नवे अध्यक्ष : श्रीमान् बाबासाहेब खापर्डे

दि. ५-१२-५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने वि. सा. संघाच्या अध्यक्षपदीं तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध श्रीमान् बा. ग. उर्फ बाबासाहेब खापर्डे, अमरावती, यांची एकमताने निवड केली. या निवडीला श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांनी आपली संमति दिली.

* *

श्रीमंत दादासाहेब धनवटे यांचा संकल्प.

श्रीमंत दादासाहेब धनवटे यांनी संघाध्यक्ष कै. हरिभाऊ नेने यांचें एक मोठें छायाचित्र देण्याचा संकल्प जाहीर केला, याबद्दल वि. सा. संघ त्यांचा फार आभारी आहे.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम : कौमुदी उत्सव

सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या ७ व्या मासिक कौमुदी कार्यक्रमांत दि. १०-१२-५४ रोजीं पुण्याचे नामवंत साहित्यिक प्रा. श्री. म. माटे आणि सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी 'मराठी वाङ्मयांतील कांही प्रचलित वादळी प्रश्नां'वर स्थानिक साहित्यिक आणि साहित्यप्रेमी लोकांशी उद्बोधक चर्चा केली. या चर्चेंत डॉ. मा. गो. देशमुख व श्री. पु. मा. भावे ह्या ख्यातनाम साहित्यकांनीहि भाग घेतला.

*

गडकरी स्मारक समित—

दि. १३-१२-५४ रोजीं वि. सा. संघाच्या 'गडकरी स्मारक समिती'साठी मदत म्हणून उदयोन्मुख नाटककार श्री. बाळ कोल्हटकर यांच्या 'एखादाचं नशीब' ह्या प्रभावी नाटकाचा प्रयोग 'मराठी रंगभूमी' पुणें, ह्यांनी 'भारतीय नाट्यगृह' नागपूर येथे केला. ग. स्मा. समिति 'मराठी रंगभूमी'ची अत्यंत आभारी आहे.

* *

श्रीमंत सौ. पद्मावतीबाई चिटणवीस यांचें आश्वासन

श्रीमंत सौ. पद्मावतीबाई चिटणवीस यांनी गडकरीस्मारक समितीसाठी एका आलमारीची किंमत देणगी म्हणून देण्याचें आश्वासन दिलें आहे.

गडकरी स्मारक समिति याबद्दल त्यांची आभारी आहे.

*

दुरुस्ती

डिसेंबर ५४ च्या युगवाणीच्या अंकांत पृ. २८, विशेष साधारण सभेची सूचना, नियम १२ (ज) मध्ये "ज्या बाकींबद्दल उपबंध नाही अशा बाकीं…" या ऐवजीं "…ज्या बाबींबद्दल उपबंध नाही अशा बाबीं…" असें वाचावें.

विदर्भ साहित्य संघ

१९५५–५६ सालाकरिता मताधिकारी सभासदांची यादी १९५४

[घटना नियम १२ (अ) प्रमाणे १५ डिसेंबर ५४ पर्यंत मताधिकारी सभासदांच्या प्रसिद्ध झालेल्या सूचींतील नांवाबद्दल ज्या तक्रारी आल्या त्यांची खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यांत आली आहे.]

दुरुस्त्या

आजीव सभासद (अ) विभाग

१. श्री. रामकृष्ण किसनजी घोटे र. क्र. ४७ पृष्ठ ३. यांचा पत्ता–मुंबई फाईन आर्ट लिथो वर्क्स, १० ससेक्स रोड, व्हिक्टोरिया गार्डन, मुं. २७. आहे.

२. श्री. य. वि. जोशी, सरचिटणीस, सहकारी संस्था, र. क्र. ६०. पृष्ठ २. संगमचाळ, सीताबर्डी नागपूर–१. हें नांव आश्रयदाते या सदरांत आहे असें समजावें.

मताधिकारी सभासद (अ) विभाग

नागपूर जिल्हा

१. श्री. मनोहर केशव देशपांडे र. क्र. १३३ पृष्ठ ७. यांचा पत्ता–C/O डॉ. एस्. व्ही. काळे यांचा बंगला, धरमपेठ एक्स्टेन्शन, नागपूर–१, आहे.

२. श्री. ल. ग. डबीर र. क्र. ८६. पृष्ठ २६. यांचा पत्ता–मामारोड, धरमपेठ, नागपूर–१ आहे. तसेंच हें नांव चुकून (ब) विभागांत पडलें आहे, तें (अ) विभागांत आहे असें समजावें.

भंडारा जिल्हा

१. श्री. जयराम शोवूजी वनसोडे र. क्र. १ पृष्ठ ४२ यांचें नांव श्री. जयराम सोनूजी बनसोडे असें वाचावें.

२. श्री. आकाशानंद र. क्र. ४. पृष्ठ ४२.

३. श्री. रा. वा. काटे र. क्र. ७. पृष्ठ ४२

वरील तिन्ही नांवें चुकून (ब) विभागांत पडलीं आहेत, तीं (अ) विभागांत आहेत असें समजावें.

चांदा जिल्हा

१. श्री. बाळ शामराव पुट्टेवार र. क्र. २८. पृष्ठ ४४. यांचें नांव श्री. बाळ रामराव पुट्टेवार असें वाचावें. तसेंच हें नांव चुकून (ब) विभागांत पडलें आहे तें (अ) विभागांत आहे असें समजावें.

यवतमाळ जिल्हा

१. कु. पूर्णाबाई बोरकर र. क्र. २. पृष्ठ १९ यांचा पत्ता–सहाय्यक अध्यापिका, शासकीय पूर्व-मांध्यमिक कन्या शाळा, यवतमाळ आहे.

अनुक्रमणिका

मताधिकारी सभासद (व) विभाग

नागपूर जिल्हा

१. श्री. कृ. ह. जांभोळकर र. क्र. ४७८ माताटेकडी, इंदोरा, नागपूर-४ यांचें नांव चुकून गळलें गेलें होतें तें (व) विभागांत आहे असें समजावें.

२. श्री. हरिभाऊ उके र. क्र. ४५१ पृष्ठ २५ ऐवजीं श्री. हरिभाऊ डके असें वाचावें.

३. श्री. महादेवराव बोवडे र. क्र. ४५७ पृष्ठ ३० यांचा पत्ता-नवभारत मुद्रणालय, कॉटन मार्केट, नागपूर आहे.

४. श्री. हिरामठा लोणार र. क्र. ४२४ पृष्ठ ३२ ऐवजीं श्री. हिरामण लोणार असें वाचावें.

५. श्री. एस्. एल. साखळे र. क्र. ३१ पृष्ठ ३६ यांचा पत्ता-श्री. संतोष लक्ष्मण साखळे, कोलबाजी खडके यांचे घराजवळ, माळीपुरा, सीताबर्डी, नागपूर-१ आहे.

अमरावती जिल्हा

१. श्री. एन्. व्ही. कोल्हे र. क्र. १५८ पृष्ठ ३४ यांचा पत्ता-सोमेश्वर बुकडेपो, गांधी चौक, अमरावती (म. प्र.)-आहे.

२. श्री. श्रीरामपंत मोतीराव सांगोळे र. क्र. ८५ पृष्ठ ३६ ऐवजीं श्री. श्रीरामपंत मारोतीराव सांगोळे असें वाचावें.

३. श्री. विश्वासराव देवराव काळे र. क्र. ९० पृष्ठ ३७ यांचा पत्ता-मु. मंगरूळ; पो. व ता. दर्यापूर, जि. अमरावती आहे.

अकोला जिल्हा

पृष्ठ ४० वर

१. श्री. बाबुरमल घीसूलाल अग्रवाल र. क्र. ८७ ऐवजीं श्री. बाबुलाल घीसूलाल अग्रवाल;

२. श्री. मदनलाल बाळालाल अग्रवाल र. क्र. ९३. ऐवजीं मदनलाल बाबाराम अग्रवाल;

३. श्री. रामप्रसाद रामबीधन अग्रवाल र. क्र. ९४ ऐवजीं श्री. रामप्रसाद रामनिधान हलवाई;

४. श्री. काशीप्रसाद बचुप्रसाद उपाध्ये र. क्र. १०४ ऐवजीं काशीनाथ बचुप्रसाद उपाध्ये,

आणि पृष्ठ ४१ वर

५. श्री. बचंदसिंग सरदार र. क्र. ११० ऐवजीं बचनसिंग सरदार;

६. श्री. सुखलाल जनुलाल राय र. क्र. १०५ ऐवजीं श्रीं. सुखलाल नन्नुलाल राय;

७. श्री. नारायण येसाजी शितोडे र. क्र. ११६ ऐवजीं श्री. नारायण येसूजी सितोळे

८. श्री. राजाराम कठेदीन हलवाई र. क्र. १०३ ऐवजीं श्री. राजाराम कडेदीन हलवाई असें वाचावें.

भंडारा जिल्हा

१. श्री. वि. दा. अडोणी र. क्र. ३५ पृष्ठ ४३ ऐवजीं श्री. वि. दा. अलोणी असें वाचावें.

प्रांतिक इतर विभाग

श्री. द. कृ. त्रिफळे र. क्र. ७१ पृष्ठ ४२ यांचा भंडारा जिल्ह्यांतून बदललेला पत्ता C/O श्री. कृ. अ. त्रिफळे, नगरपालिका कार्यालयासमोर, पांढुर्णा, जि. छिंदवाडा-आहे.

परप्रांतीय विभाग

श्री, वासुदेवराव किसनजी घोटे र. क्र. ३३५ पृष्ठ २७ यांचा नागपूर जिल्ह्यांतून बदललेला पत्ता c/o डॉ. आर. के. घोटे, ७६७ पारसी कॉलनी, डॉ. घंटी रोड, दादर, मुं. १४–आहे.

(उपाध्यक्षांच्या आदेशानुसार)

दि. १६–१२–५४
केंद्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर-१.

ना. रा. शेंडे
सरचिटणीस
वि. सा. संघ.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिति : समयपत्रिका जानेवारी १९५५

शनिवार	दिनांक १५	दुपारीं २॥ ते ५॥	पारंगत १; स्नातक १.
रविवार	दिनांक १६	सकाळीं ७॥ ते १०॥	पारंगत २; स्नातक २, परिचित १, विनीत, प्रारंभ, प्रवेश लेखी (७॥ ते ९॥) प्रवेश मौखिक (९॥ ते १०॥)
रविवार	दिनांक १६	दुपारीं २॥ ते ५॥	पारंगत ३, स्नातक ३, परिचित २
सोमवार	दिनांक १७	सकाळीं ७॥ ते १०॥	पारंगत ४
सोमवार	दिनांक १७	दुपारीं २॥ ते ५॥	पारंगत ५

परीक्षार्थ्यांना सूचना—आपआपलीं प्रवेशपत्रें दिनांक १० जानेवारी ५५ नंतर आपआपल्या केंद्राधिकाऱ्यांकडून तावडतोब प्राप्त करून घ्यावींत. तसेंच परीक्षास्थानाची माहितीहि मिळवून घ्यावी.

अभ्यासक्रमांत परिवर्तन—साहित्य परिचितच्या परीक्षार्थ्यांना घोषित करण्यांत येतें की, प्रश्न पत्र १ मधील 'विष्णु कृष्ण चिपळूणकर' हें पुस्तक गाळण्यांत आलें असून त्याऐवजी निबंध परिमल हें पाठ्य करण्यांत आलें आहे.

पां. कृ. सावळापूरकर,
संचालक

माणिक के. बंतुले,
कार्यवाह

कै. ह. ना. नेने यांच्या निधनाबद्दल दुखवट्याचे ठराव व शोकसंदेश

संघाध्यक्ष श्री. हरिभाऊ नेने यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता कळतांच महाराष्ट्रांत सर्वत्र शोकछाया पसरली. खालील साहित्यसंस्था, शाळा आणि व्यक्तींकडून केंद्रीय कार्यालयाकडे दुखवट्याचे ठराव आणि शोकसंदेश आलेले आहेत :

वि. सा. संघाच्या भंडारा, गोंदिया, खामगांव, अमरावती आणि वर्धा शाखा; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें; म. प्र. हिन्दी साहित्य संमेलन; अभिनव नाट्य मंदिर, नागपूर; विवेकसिंधु अध्यात्म मंडळ, सावनेर; 'पराग' पाक्षिक, नागपूर; मराठवाडा साहित्य परिषद, हैद्राबाद; थिऑसॉफिकल लॉज, नागपूर; म. प्र. संशोधन मंडळ, नागपूर; विदर्भ साहित्याध्ययन मंदिर, नागपूर; सुविचार व्याख्यानमाला, नागपूर; गडकरी स्मारक समिति, नागपूर; सहकारी संस्था, नागपूर; महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, नागपूर; राजाराम वाचनालय, नागपूर; मराठी साहित्य संघ, जबलपूर; नागपूर नाट्य मंडळ, नागपूर; विदर्भ नाट्य मंदिर, अमरावती; म. प्र. शासन साहित्य परिषद, नागपूर; भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर; 'गुरुदेव' सेवा मंडळ, गुरुकुंज, मोझरी; नवयुग विद्यालय, माजी विद्यार्थी मंडळ, नागपूर; पूर्व माध्यमिक शाळा, उमरखेड; शासकीय प्रशिक्षण विद्यालय, चांदा; लोकांची शाळा, नागपूर; कहाते गोखले व्यायाम शाळा, नागपूर; भिडे कन्या शाळा, नागपूर; अनाथ विद्यार्थी गृह आणि विनायकराव देशमुख हायस्कूल, नागपूर; श्रीराम विद्यालय, रामटेक; भारत महिला विद्यालय, नागपूर :

लो. ना. बापूजी अणे, म. म. द. वा. पोतदार, पुणें; श्री. काकासाहेब गाडगीळ, नवी दिल्ली; श्रीमंत दादासाहेब घनवटे, नागपूर; श्री. भा. ल. भांबूरकर, दिल्ली; श्री. चिं. ग. कर्वे, पुणें; श्री. तु. ना. काटकर, चांदा; श्री. श्री. पुं. कठाळे, धामणगांव; श्री. म. ना. अदवंत, जळगांव; श्री. म. बा. खेडकर, आकोट; श्री. म. दा. साठे, पुणें; श्री. के. रा. सालफळे, देवळी; श्री. द. ना. ठाकुर, अमरावती; श्री. तांबुळेशास्त्री, यवतमाळ; श्री. ना. क. तांबी, अमरावती; श्री. देशपांडे, अमरावती; श्री. ना. रा. बामणगांवकर, अमरावती; प्रा. भ. श्री. पंडित, अमरावती; श्री. शं. ना. सहस्रबुद्धे, अमरावती; श्री. ब. ता. एकबोटे, उमरखेड; डॉ. न. अ. बरवे, तळेगांव दाभाडे; श्री. मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी.

या शिवाय, महाराष्ट्रांतील अनेक प्रमुख वृत्तपत्रें व साप्ताहिकें यांनीहि कै. हरिभाऊ नेने यांच्या निधनाबद्दल गौरवपर अग्रलेख व स्फुटें लिहून आपली श्रद्धांजलि अर्पण केली.

वि. सा. संघ सर्वांचा आभारी आहे.

दि. १५-१२-५४

बा. रा. मोडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

१९५५–५६ सालासाठी

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीविषयी सूचना

१. निवडणुकीसाठी मतदानाची शेवटची तारीख १९-२-५५ निश्चित झाली आहे. या तारखेस मतपत्रिका सायंकाळीं ६ वाजपर्यंत कार्यालयांत पोचल्या पाहिजेत.

२. मतदार सभासदांची 'अ' आणि 'ब' विभागांची यादी 'युगवाणी'च्या डिसेंबर १९५४ च्या अंकासोबत सर्व मतदार सभासदांकडे पाठविली आहे.

३. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार, सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें असेल अशाच सभासदांना आहे. अशीं नांवें 'अ' विभागाच्या यादींत आहेत. तेव्हा मतदारांच्या 'अ' विभागांतील कोणत्याहि व्यक्तीस निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहण्यास पात्र असलेल्या कोणत्याहि व्यक्तीचें नांव तिच्या लेखी अनुमतीसह कोणाहि मताधिकारी सभासदाला सुचवितां येईल.

४. निवडणुकीसाठी उमेदवारांचीं नांवें २०-१-१९५५ रोजीं सायंकाळीं ६ वाजण्याच्या आंत केन्द्रीय कार्यालयाकडे सरचिटणिसांच्या पत्त्यावर पोचलीं पाहिजेत.

५. २२-१-१९५५ रोजीं उमेदवार-पत्रिकांची छाननी दुपारीं ४ वाजतां केन्द्रीय कार्यालयांत होईल. त्यावेळीं उमेदवारांनी स्वतः अगर प्रतिनिधीद्वारा हजर रहावें.

६. २४–१–१९५५ रोजीं सायंकाळीं ६ च आंत कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घेतां येईल.

७. कार्यकारी मंडळासाठी एक अध्यक्ष व सोळा सभासद यांची निवडणूक होईल.

(उपाध्यक्षांच्या आदेशानुसार)

दिनांक १९-१२-५४
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता,
सीताबर्डी, नागपूर १.

ना. रा. शेंडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

कै. हरि नारायण नेने-स्मारकाची योजना
हरि नारायण-पारितोषिक

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध वाङ्मयसंशोधक, महानुभाव वाङ्मयतज्ज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष कै. प्रा. ह. ना. नेने यांचें योग्य असें स्मारक करण्याच्या हेतूने त्यांच्या कांही स्नेह्यांनी व चाहत्यांनी एक स्मारकनिधि उभारला असून, वि. सा. संघाच्या येत्या अचलपूर संमेलनापर्यंत हा निधि कमींत कमी रु. ५००० पर्यंत करावा असा संकल्प केला आहे. संकल्पित निधीच्या वार्षिक व्याजांतून दरवर्षी सुमारें २०० रुपयांहून कमी नसलेल्या रकमेचें पारितोषिक विदर्भांतून विदर्भ साहित्य संघाकडे येणाऱ्या सर्वोत्कृष्ट जुन्या मराठी वाङ्मयविषयक वा संशोधनात्मक भाषाविषयक प्रबंधास देण्यांत यावें अशी योजना केली आहे. स्मारकनिधीची संपूर्ण रकम वि. सा. संघाच्या स्वाधीन करून तींत प्रतिवर्षी येणारें व्याज मिळविण्यांत येईल. वि. सा. संघाची कार्यकारिणी प्रस्तुत समितीच्या सल्ल्यानुसार ठरवील त्या नियमांनुसार व त्या पद्धतीप्रमाणे दरवर्षी संमेलनाध्यक्षांच्या हस्तें पारितोषिक-वितरण करण्यांत येईल.

अखिल महाराष्ट्रभर पसरलेल्या कै. हरिभाऊंच्या असंख्य चाहत्यांनी, विद्यार्थ्यांनी, वाङ्मयप्रेमींनी व वाङ्मयीन संस्थांनी प्रस्तुत निधीचा संकल्प पुरा करण्यास साहाय्य करावें अशी आमची आग्रहाची विनंती आहे. शक्यतों २५ हून कमी नाही एवढी रकम कोषाध्यक्ष, वि. सा. संघ अथवा कार्यवाह, निधिसमिति, यांच्याकडे पोचती करून पावती घ्यावी, ही विनंती.

१ ए. जे. मोहरीर, ॲडव्होकेट, [२०१ रु.]
अध्यक्ष, निधिसमिति

२ विष्णु भिकाजी कोलते [५१ रु.]

३ माधव गोपाळ देशमुख [५१ रु.]

४ पांडुरंग नारायण बनहट्टी [५१ रु.]

५ सुरेश म. डोळके [५१ रु.]
कार्यवाह, निधिसमिति

श्री. मनोहर हरि नेने यांचे आभार

माझे पूज्य वडील श्री. हरि नारायण नेने, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, यांच्या आकस्मिक निधनाबद्दल प्रांतांतील तथा प्रांताबाहेरील शैक्षणिक, संशोधनात्मक, सार्वजनिक, साहित्यविषयक इ. विविध संस्थांनी; तसेंच अनेक लहानथोर व्यक्तींनी आणि वृत्तपत्रांनी दुखवट्याचे ठराव व शोक-संदेश पाठवून माझ्या वडिलांप्रति आपली निष्ठा व प्रीति व्यक्त केली आणि त्यांना मानाची श्रद्धांजलि अर्पण केली. त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें. सर्वच संस्थांना व हितचिंतकांना आभाराचें प्रतिपत्र पाठविण्यास मी असमर्थ आहें; म्हणून या पत्रकाद्वारेंच मी आपली सद्भावना व्यक्त करतों. माझ्या पूज्य वडिलांबद्दल सर्वांनी जसा लोभ राखला होता तसाच तो मजवरहि कायम राहील, अशी अपेक्षा आहे. पुन्हा एकदा मी माझी आत्या वेणूताई आणि माझें कुटुंब यांच्यातर्फे सर्व संस्थांचे, वृत्तपत्रांचे व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानतों.

दि. ११-१२-५४
धरमपेठ, नागपूर

सर्वांचा नम्र,
मनोहर हरि नेने

युगवाणीचा हा अंक "कै. ह. ना. नेने विशेषांक" म्हणून प्रसिद्ध होत आहे. कै. हरिभाऊंच्या आकस्मिक निधनाने त्यांचा सुहृद्वर्ग इतका स्तंभित होऊन गेला की त्यामुळे त्यांच्याविषयी लेखन करणें कांही काळ त्यांना सुचेचना, त्यामुळे बरेच लेख उशीरा हातीं आल्यामुळे (अजूनहि कांही लेख येत आहेतच) ते या अंकांत समाविष्ट करणें शक्य झालें नाही. याबद्दल त्या त्या लेखकांनी आम्हांस क्षमा करावी अशी विनंती आहे. शक्यतोंवर पुढील अंकांत ते देण्याचा प्रयत्न करूं.

ता. २९-१२-५४

—संपादक

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * **सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये**

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे उपाध्यक्ष, वि. सा. संघ यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें)

युगवाणी

संपादक-मंडळ
संपादक : पु. य. देशपांडे
सदस्य : गो. रा. दोडके
प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

जानेवारी १९६०

* *